Date 1.11.2013

जया नावडे नाम त्या येम जाची।
विकल्पे उठे तर्क त्या नर्क ची ची॥
म्हणोनी अती आदरे नाम घ्यावे।
मुखे बोलता दोष जाती स्वभावे॥१०१॥

अर्थ - ज्याला भगवंताचे नाम आवडत नाही त्याला यमराज कष्ट देतो. नामाबद्दल संशय घेऊन भलताच तर्क काढणे म्हणजे नर्कासारखी घाणच होय. म्हणून अत्यंत पूज्यभावाने नाम घ्यावे. असे नाम घेतले असता देहबुद्धीचे दोष आपोआप नाहीसे होतात.

स्पष्टीकरण - ज्याला भगवंताच्या नामाची आवड नसते असा मनुष्य सर्व बाजूंनी आसक्त असतो. त्यामुळे त्याचा अंतकाळ दुःखकारक असतो. सर्वस्व मानलेल्या गोष्टी त्याला इथेच ठेवून जायला लागते. भगवंताच्या नामाविषयी त्याला विश्वास नसतो. असे कुतर्क आत्मघातास कारण ठरतात. संत किंवा साक्षात्कारी पुरुषांच्या सांगण्यावर विश्वास ठेवून तरी सामान्य माणसाने नाम घेण्याचा अभ्यास करावा. नामाची सत्ताच अशी विलक्षण आहे की भगवंताच्या आड येणारे दोष ते बाहेर काढते आणि भगवंताला आवडणारे गुण ते करून वाढीला लावते.

माणसाला एखादी गोष्ट करायची नसली म्हणजे तो नाना प्रकारचे तर्क आणि विकल्प निर्माण करतो. वास्तविक नामाला सोवळे ओवळे, स्नान, कर्मकांड आहारविहार, जात, वर्ण, पंथ यापैकी कशाचेही बंधन नाही. तरीसुद्धा ज्याला नाम घ्यावेसे वाटत नाही त्याला यम जाचतो. याचा अर्थ त्याचा शेवट दयनीय होतो. आदरपूर्वक नाम घेतल्यास दोषांची क्रमशः निवृत्ती होऊन जीवन धन्य होते.

नाममहात्म्याचा उपसंहार करताना समर्थ निक्षून सांगत आहेत की ज्याला नामस्मरणाची आवड नाही त्याला यमाचा जाच सहन करावा लागतो. जे तर्कटे रचत बसतात त्यांना नर्कात जावे लागते. ते अत्यंत वाईट परिस्थिती ओढवून घेतात. समर्थांची जनकल्याणाविषयीची तळमळ यातून दिसून येते.

खरे तर नामासारखी दुसरी सोपी गोष्ट नाही.

© www.madhavvedagruveer.com

त्यासाठी धन वेचावे लागत नाही. कष्ट करावे लागत नाहीत.
जाचक असे कोणतेही नियम नाहीत त्यासाठी विशेष योग्यता
पात्रता लागत नाही. परंतु फळ मात्र फार अनमोल मिळते.
मनुष्याचे अनेक विकारांनी भरलेले जीवन नामाच्या योगाने
हक्कहक्क पण निश्चितपणे सुधारत जाते. पण इतके साधे, सोपे
नाम घेण्याचाही लोक आळस करतात, त्याविषयी अश्रद्धा
दाखवतात. हे पाहून संतांना अतीव दुःख होते. कळवळ्याने
वात्सल्याने ते संतापतात व आईने नाठाळ मुलाला रागवावे,
शिव्या घालाव्या तसे रागावून बोलतात.

यम नावाची कुणी देवता नाही किंवा नर्क नावाचा
कोणता लोक नाही असे बुद्धिवादी मानतात. कारण हा विषय
थोडा अनुमानाचा आणि पुष्कळसा शब्द पांडित्याचा आहे. कर्म-
विपाकाच्या सिद्धांताचाच हा आनुषंगिक भाग आहे.
पुराणासारख्या वाङ्मयामध्ये या नरककल्पनेचा विस्तार आहे.
अर्थात पुराणे रोचनार्थ आहेत. त्यामुळे त्यात अनेक गोष्टी
प्रचारासाठी किंवा परिणामकारकतेसाठी रचून, फुलवून सांगितल्या
आहे. असे बुद्धिवादी मानतात. (पुष्पिता वाचः) पण तरीसुद्धा
पुराणे निराधार किंवा असत्य गोष्टींचा पाठपुरावा करतात
असे मात्र म्हणू नये. आपल्या तत्त्वज्ञानातील शास्त्रीय सिद्धांत
पुराणांनी लोकांना पटावेत म्हणून आकर्षकपणे, परिणामकारक
रीतीने सांगण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे पुराणे रंगवून
सांगतात पण खोटे सांगत नाहीत हे निश्चित!

तसेच उपनिषदांसारख्या प्राचीन वाङ्मयात किंवा
अगदी ब्रह्मसूत्रात पातकी जीवाला मरणोत्तर नरकवास भोगावा
लागतो असे सांगितले आहे.

संयमने त्वनुभूयेतरेषां आरोहावरोहौ तद्गतिदर्शनात्॥
कठोपनिषदातही उन्मत्त झालेले मूर्ख लोक पुन्हा पुन्हा यमाच्या
तावडीत सापडतात असे वचन आहे. गीता - १६. १९, २०.

तात्पर्य नर्काची कल्पना तुच्छ मानून फेकून देण्यासारखी
नाही. तिला गंभीर अर्थ आहे. आजकाल इहलोकीच्या समृद्ध जीवनाला
अस्वस्थतेच्या व अशांततेच्या रूपाने नरकवासाची कळा आलेली आहे.
यातून सुटायचे असेल तर धर्मशास्त्राने आखलेल्या मार्गाने जायला हवे.

अती लीनता सर्व भावे स्वभावे।
जना सज्जनालागि संतोषवावे।
देहे कारणी सर्व लावीत जावे।
सगुणी अती आदरेसी भजावे॥१०२॥

__अर्थ__– माणसाने मनापासून व अकृत्रिमपणे अतिशय नम्र असावे. अशी सहज लीनता पाहून सत्पुरुषांना संतोष होतो. सर्व चांगल्या कार्यासाठी आपण आपला देह कष्टवावा. तसेच मोठ्या आनंदाने व आदराने सगुणोपासना करावी.

__स्पष्टीकरण__– लीनता हा परमार्थाचा प्राण आहे. व्यवहारातही ती आवश्यक आहे. लीनता व दीनता या दोहोंमध्ये अंतर आहे. दीनतेमध्ये हीनता असते. लाचारी असते.

लीन माणसाच्या अंगी कर्तेपणा असला तरीसुद्धा कर्तेपणाचा अभिमान नसतो. असा निरभिमानी पुरुष संतांना विशेष आवडतो. असा लीन पुरुष भगवंताच्या दर्शनाला पात्र ठरतो. मात्र भगवंत जसा बेहद्द (निःसीम) आहे तशी लीनता निःसीम असावी. शिवाय तिचा उगम अंतर्यामी खोल असावा. तिच्यात कृत्रिमतेचा लवलेश नसावा. आणि ती सहजपणे आचरली जावी. लीनता हा देहस्वभाव बनावा.

भगवंताचे दर्शन घडण्यासाठी देहाचे ममत्व नाहीसे व्हावे लागते. दुसऱ्यांसाठी देह कष्टवला तर त्यावरचे ममत्व क्षीण होत जाते. म्हणून दुसऱ्यांसाठी व चांगल्या कामासाठी देह झिजवावा, असा समर्थांचा आग्रह आहे. शिवाय ज्या समाजात दुसऱ्यांच्या उपयोगी पडण्याची वृत्ती आहे तो समाज लवकर संघटित होतो.

वाळूच्या कणाचे कवच कठीण असते त्यामुळे वाळूचा ढीग एकसंध नसतो. मातीचा ढीग एकसंध असतो.

सगुणोपासनेत भगवंतासाठी देह झिजवला जातो. उत्सवाच्या व इतर समारंभाच्या निमित्ताने जो कोणी भाविकांसाठी कष्ट करतो त्याचा देहस्वार्थ आपोआप कमी होत जातो. प्रथमतः देहाने केलेली सेवा सकाम असली तरी ती कालांतराने आपोआप निष्काम होत जाते. भगवंताबरोबरच त्याच्या भक्तांचीही सेवा घडते. देह आपोआपच झिजू लागतो.

लीनतेचा देखावा नको. उगीच कमरेत वाकणे, हात जोडणे, मस्तक लववणे, नकली हास्य हे उपरे / खोटे असते.
समोरच्याची तोंड भरून स्तुति करणे, मानपत्र अर्पण करणे हे सारे वरवरचे असते. सहेतुक असते. त्याच्या मोबदल्यात काही तरी मिळवायचे असते. माणसाचा अहंकार फार जागृत असतो. त्यामुळे स्वतःखेरीज दुसऱ्या कुणाकाही मोठे मानायला सहसा कोणी तयार नसतो. बहुतेक ठिकाणी हीच परिस्थिती असते. स्वतःजवळ विशेष काही नसताना जर ही अवस्था असेल तर मग ज्याच्याजवळ कला कौशल्य, साहित्य, विद्वत्ता, वक्तृत्व, शक्ती, सत्ता, संपत्ति, सौंदर्य असेल त्यांच्या बाबतीत तर विचारायलाच नको. अशा व्यक्तींना अहंगंड (Superiority Complex) असतो.
ज्यांच्याजवळ काही नाही त्यांची नम्रता ही कदाचित लाचारी असू शकते. परंतु ज्यांच्याजवळ काही विशेष आहे ते जर नम्र होतील तर त्यांना परमेश्वर भेटतो.
'विद्या विनयेन शोभते।' 'नम्र झाला भूता। तेणे कोंडिले अनंता।' व्युत्पत्ती / विद्वत्ता असली तरी ती विसरता आली पाहिजे
म्हणोनि थोरपण पऱ्हां सांडिजे। व्युत्पत्ती अवघी विसरिजे।
जैं जगा धाकुटें होईजे। तैं जवळीक माझी॥
जो स्वतःकडे धाकटेपणा / कमीपणा घेतो तोच मला आवडतो. परंतु व्यवहारात मात्र सगळीकडे खोटेपणाच भरलेला दिसतो. मात्र खरे सज्जन निःस्पृह असतात. सत्ता, संपत्ति, स्तुति त्यांना मोहवू शकत नाही. केवळ सद्गुणांनी / सदाचरणाने त्यांना आपलेसे करता येते. निष्काम बुद्धीने केलेली सेवा सज्जनांना संतोष देऊ शकते. म्हणूनच समर्थ म्हणतात. देहेकारणी सर्व लावीत जावे. शरीर हे एक साधन आहे. समाजसेवेसाठी परोपकाराची कामे देहाने झटून करावी. जिथे जिथे मनुष्यबळाची गरज आहे तिथे तिथे प्रतिष्ठा दूर ठेवून अंग मोडून काम करावे. श्रीकृष्णाने राजसूय यज्ञात उष्टी काढली. युद्धप्रसंगी घोड्याला खरारा / चंदी / जखमा / सर्व केले
यज्ञयाग, उत्सव-समारंभ, देवपूजा, देवळाची व्यवस्था ही सर्व कामे करताना देहाला थोडे तरी कष्ट द्यावे.

१०८
९५६

हरीकीर्तने प्रीति रामी धरावी।
देहेबुद्धि नीरूपणी वीसरावी।
परद्रव्य आणीक कांता परावी।
येदर्थी मना सांडि जीवी करावी॥ १०३॥

अर्थ - भगवंताच्या सगुण स्वरूपाविषयी प्रेम वाढावे यासाठी त्याचे गुणानुवाद सारखे कथन करावे. त्याच्या निर्गुण स्वरूपाचे आकलन व्हावे यासाठी देहबुद्धी कमी करणारी तात्विक चर्चा करावी. त्याचबरोबर परद्रव्य आणि परस्त्री यांचा अगदी मनापासून त्याग करावा.

स्पष्टीकरण - परमात्मस्वरूप जसे निर्गुण नसे सगुणदेखील आहे. आपण देहबुद्धीने जगात वावरतो त्यामुळे आपल्याला सगुणाचे प्रेम अधिक असणार हे निश्चित। सगुणाचे प्रेम वाढवण्यासाठी त्याचा अखंड सहवास करणे हा राजमार्ग आहे. म्हणून आपल्या इष्टदेवतेचे सतत गुणगान करत रहावे त्याचे लीलाचरित्र सांगत जावे. पण निर्गुणामुळे सगुणाला दिव्यपणा येतो हे विसरता कामा नये. निर्गुणस्वरूप हे अतींद्रिय असते, ज्ञानप्रधान असते. त्याच्या बोध होण्यासाठी तात्विक युक्तिवाद कामाला येतो. म्हणून सगुणाचे प्रेम डोळस असण्यास निरूपणाची अतिशय गरज असते. त्यातून भावना व बुद्धि यांची समसमान वाढ होते. व साधकाचे व्यक्तिमत्व समतोलपणे विकास पावते.

कामवासना व पैशाचा लोभ या दोन गोष्टी नेहमी भगवंताच्या आड येतात. म्हणून त्यांच्यापासून सावध रहावे. साधकाने त्यांच्यावर मालकी गाजवल्याखेरीज परमार्थ साधना येत नाही.

सगुण उपासनेचा अत्यंत सोपा मार्ग म्हणजे कीर्तन होय. सर्व संतांनी कीर्तनसेवेचा अवलंब केला आहे. संत नामदेव, एकनाथ आणि तुकाराम यांनी प्राधान्याने कीर्तन केले. श्रीमत् दासबोधामध्ये कीर्तनभक्तीचे पाच समास आले आहेत.

मन ठेवोनि ईश्वरी। जो कोणी हरिकथा करी।
तोचि ये संसारी। धन्य झाला॥

कीर्तनाने भगवंत लवकर प्रसन्न होतो. कीर्तन करणारा

आणि कीर्तन ऐकणारा हे दोघेजण जेव्हा हरिकथेत रंगून जातात तेव्हा देहबुद्धीचे विस्मरण होते. देहबुद्धी कमी झाली म्हणजे आपोआप ईश्वरबुद्धी वाढीस लागते. भगवंताच्या चिंतनाने अष्टसात्त्विक भाव जागृत होतात.

कीर्तनभक्तीने परमार्थमार्गाविषयी वाटचाल झपाट्याने होते. परंतु कीर्तनभक्तीची वाट मोठी निसरडी आहे. म्हणून कीर्तनापाठोपाठ समर्थ सावधगिरीचा इशारा म्हणून परद्रव्य व परदारा आपापासून दूर रहावे. त्यांची अभिलाषा मनातून पूर्ण काढून टाकावी. अनेकदा श्रीमंत मंडळी कीर्तनाला येऊन बसतात कीर्तनकाराची सेवा करतात. अशा वेळी साधकाच्या मनात - यांनी आपल्याला भरपूर धन द्यावे - अशी इच्छा होऊ शकते. किंवा कधी कधी भाविक तरुण स्त्रियांच्या सेवेच्या निमित्ताने कीर्तनकाराशी जवळून संबंध येतो. जर एकांत लाभला तर कीर्तनकाराच्या मनात परस्त्रीची अभिलाषा निर्माण होऊ शकते. आणि जे मन द्रव्यदारेमध्ये अडकेल ते भगवंतावर प्रेम कसे करू शकेल? संत कबीर म्हणतात - जहाँ काम तहाँ राम नहीं। म्हणून या अभिलाषा सोडून भगवद्भक्तीत बुडून जावे.

कीर्तनामुळे स्वतःची प्रगती होते व श्रोत्यांनाही कल्याणाचा मार्ग दिसू लागतो. मात्र कीर्तन हे करमणुकीचे स्वस्त साधन नाही हे कीर्तनकाराने व श्रोत्यांनी लक्षात ठेवले पाहिजे. श्रीहरीची मूर्ती अंतरंगात ठसावी यासाठी कीर्तन असावे.

कीर्तनात आचरट विनोद व अश्लील शृंगार यांचे वर्णन असू नये. कीर्तनात कोणताही रस वर्ज्य नाही पण सर्व रस ईश्वरभक्तीची अंगोपांगे असली पाहिजेत. आणि कीर्तनाच्या शांत पवित्र उदात्त भूमिकाला शोभणारे हवेत. पोषक ठरणारे हवेत. पंचपक्वान्नाच्या भोजनातील चटणी कोशिंबीरी सारखे असावेत.

ईश्वरकथा ऐकताना मन रमून जायला हवे. सर्वांगाचे जणू कान करून ऐकावे अशी ओढ निर्माण व्हायला हवी. अंतःकरण उचंबळून यायला हवे. देहबुद्धीची पकड ढिली झाली तर ईश्वरा विषयी प्रेम उत्पन्न होईल. रणक, कठीण भूमीत बीज अंकुरत नाही. त्यासाठी शेत नांगरून भुसभुशीत करावे लागते. हे काम निरूपण करते.

© www.madhavcharuhuwe.com

निरूपणातून स्वैरवर्तनाचे दुष्परिणाम आणि सदाचरणाचे महत्त्व, सृष्टीचे स्वरूप, जगातील माझे स्थान असे अनेक विषय चर्चिले जातात. वक्ता अनुभवी, जाणता आणि श्रोता अवधान देऊन ऐकणारा व विचार करणारा असला म्हणजे मग त्याला एकेक गोष्टी उमगू लागतात. उदाहरणांनी त्या पटतात, अनुभवाने विवेकाने ठसतात आणि मग निष्ठेने आचरणात उतरू लागतात. देहधारण हे साध्य नसून साधन आहे. इंद्रियांवर संयमाचे बंधन असावे, मनाला विकारांच्या हातातील खेळणे होऊ देऊ नये. बुद्धीला नेमके हिताचे आणि स्थिर निर्णय घेता आले पाहिजेत. हे कळले आणि वळले म्हणजे मग देहबुद्धी उरत नाही. अंतःकरणाच्या क्षितिजावर ईश्वरी प्रेमाचा पूर्णचंद्र उगवतो आणि त्याच्या आल्हाददायक प्रकाशात साधक चित्ताची प्रसन्नता अनुभवू शकतो. कीर्तनातील निरूपणाने हे सर्व व्हावे अशी समर्थांची अपेक्षा आहे.

परद्रव्य आणि परनारी यांच्याविषयी अभिलाषा असू नये असा धोक्याचा इशारा समर्थ देतात. धन मिळवूच नये किंवा विषयोपभोग घेऊच नये. संसारात रमू नये. बायको टाकून द्यावी असे समर्थ सांगत नाहीत. देहधारणेसाठी प्रकृतिभेदाने उण्या-अधिक प्रमाणात विषयांचे सेवन करावे. त्यामुळे शरीराचे रक्षण होते, मनाला प्रसन्नता लाभते. न्यायनीतीची मर्यादा त्यासाठीच आहे. संतमहंतांची त्याला मान्यताही आहे. त्यांनी नाकारली आहे ती आसक्ती! निषेध केला आहे तो अतिरेकाचा आणि त्यांना त्याज्य वाटते ती स्वैरता!

शरीराने दुर्वर्तन करणारे थोडे असतात. बहुसंख्य लोक सज्जनच असतात. पण संतांची अपेक्षा यापेक्षा सूक्ष्म आहे. परद्रव्य व परस्त्री याविषयीची अभिलाषा मनातसुद्धा येता कामा नये. तरच परमार्थ मार्गात प्रवेश करता येईल.

सौंदर्याला दाद देणे चूक नाही पण ती वस्तु/व्यक्ती मला मिळावी असे वाटणे हे पाप आहे. त्यामुळे त्याची अभिलाषा मनात निर्माणच होऊ देऊ नये.

शत्रुसैन्याची रसद तोडणे हा युद्ध जिंकण्याचा एक महत्त्वाचा मार्ग आहे. असे युद्धशास्त्र आहे.

क्रियेवीण नानापरी बोलिजेते।
परी चीत दुश्चीत ते लाजवीते।
मना कल्पना धीट सैराट धावे।
तया मानवा देव कैसेनि पावे॥१०४॥

अर्थ - सामान्यपणे माणूस पुष्कळ बोलतो पण त्याप्रमाणे त्याचे आचरण नसते. त्याचे अपात्र मनच त्याला आतून लाजवते. बरोबरच आहे, प्रत्यक्ष आचरण न करता जो माणूस नुसत्या स्वैर कल्पना करतो त्याला भगवंताचे दर्शन शक्य नसते.

स्पष्टीकरण - दृश्याच्या व्यवहारात आचरणाला प्रथम स्थान आहे. जो स्वत: क्रिया करतो आणि मग त्याच्याबद्दल बोलतो त्याच्या बोलण्याला लोक किंमत देतात. तसेच जो माणूस आत्मप्रचीतीशिवाय गप्पा ठोकतो त्याचे वक्तृत्व उत्तम असले तरीसुध्दा त्याचे बोलणे केविलवाणे ठरू शकते. बोलण्याने लोक फसतील कदाचित पण आपण आपल्या मनाला फसवू शकत नाही. म्हणून खऱ्या साधकाने जेवढी प्रचीति असेल तेवढेच बोलण्याचा नियम ठेवावा. कल्पनेला घटनेचा पाया असावा. उगीच भ्रमात राहू नये. त्याने परमार्थ व व्यवहार दोन्हीही साधत नाही.

समर्थांचा स्पष्टवक्तेपणा या श्लोकात व्यक्त होतो. सत्य जाणून घ्यायचे असेल तर प्रत्यक्ष, अनुमान आणि शब्द या तिन्ही प्रमाणांचा स्वीकार करावाच लागतो. प्रत्यक्ष हे प्रामाणिक असावे, अनुमान यथार्थ असावे आणि शब्द हा विश्वसनीय असावा लागतो. यात वाद नाही.

विज्ञानातील लहान मोठ्या गोष्टींमागचे नियम कळण्यासाठी फार कष्ट करावे लागतात. आर्किमिडिज, न्यूटन, मादाम मेरी क्युरी यांनी ध्यास घेऊन काम केले. या कष्टांनाच तप म्हणतात. तपासाठी देहबुध्दी सोडून ध्येयनिष्ठा अंगिकारावी लागते. नुसत्या बोलघेवडेपणाला साध्याची प्राप्ती होण्याच्या दृष्टीने काहीही मूल्य नाही. परमेश्वर हे तर अत्यंत सूक्ष्म, विज्ञानाच्या दृष्टीने फार दूरचे असे परम सत्य आहे. त्याची प्राप्ती सुखलोलुप बोलघेवडेपणाने कशी होणार?

माणूस नुसते बोलतो. असे करावे, तसे करावे, हे

श्रेष्ठ आहे, ते महत्त्वाचे आहे असे नुसते बोलतो. प्रत्यक्ष करत काहीच नाही. याचे कारण मनाला ती ओढ नसते. मन शुद्ध नसते, प्रसन्न नसते, एकाग्र नसते. ते भलत्याच कल्पनात रंगलेले आणि उगीच धावपळ करणारे असते.

हृष्टं कदापि रुष्टं शिष्टं दुष्टं च निन्दति लोलि।
चित्तं पिशाचमभवत् राक्षस्या तृष्णया व्याप्तम्॥

हे शंकराचार्यांनी केलेले मनाचे वर्णनच समर्थांना इथे अभिप्रेत आहे. दुश्चित आणि सैराट धावे या शब्दांनी ते हेच सुचवतात. मनाचे व्यापार खरेखरच लाज वाटावी असे असतात. अत्यंत चंचल आणि आडदांड मनाला आवरणे खरोखरच कठीण आहे. अर्जुनालाही हा प्रश्न पडला तर मग सामान्यांची काय कथा?

त्यादृष्टीने अहर्निश प्रयत्न केल्यावाचून सर्वकाळी, सर्वस्थळी, सर्व दिशांनी सावध राहिल्यावाचून मनाला योग्य ते वळण लागणे शक्य नाही.

कीर्तन प्रवचनकाराला देव भेटतो असा लोकांचा भ्रम आहे. तो बोलतो कसा, सांगतो काय यापेक्षाही तो वागतो कसे आणि करतो काय हे जास्त महत्त्वाचे आहे आणि हे ज्याचे त्याला नेमके समजते. ज्याचे मन चंचल आहे, वासना गेल्या नाहीत. वैराग्य बाणले नाही, कामक्रोध आवरले नाहीत, अहंकार उणावला नाही. म्हणूनच मन शांत, निर्मळ, प्रसन्न झाले नाही. त्याचे भाग्य कधी उदयास येणार नाही आणि देव भेटण्याची शक्यताच नाही.

Date 5.11.13
Page 175

विवेके क्रिया आपुली पालटावी।
अती आदरे शुध्द क्रीया धरावी।
जनी बोलण्यासारखे चाल बापा।
मना कल्पना सोडि संसारतापा॥१०५॥

अर्थ - माणसाने नीट हिताहित विचार करून आपल्या आचरणात बदल घडवून आणावा. शास्त्राला व संतसज्जनाना मान्य असे शुध्दाचरण स्वीकारावे. आपण जसे बोलतो तसे आपले वागणे असावे. मना! संसार दुःखमय आहे हे खरे! परंतु त्याविषयी उगीच कल्पना करीत रहाणे सोडून द्यावे.

स्पष्टीकरण - मानवी जीवनात विवेकाला परमोच्च स्थान आहे आणि समर्थांचा संपूर्ण भर विवेकावरच आहे. विवेकातून ज्ञान निर्माण होते आणि ज्ञानातून सामर्थ्य हाताशी येते. ज्याच्याजवळ उत्तम आचार, विचार आणि उच्चार यांनी संपन्न असलेले व्यक्तिमत्व आहे, तो सर्वांना प्रिय होतो. विवेकाने माणसाला तसे बनता येते.

माणूस अज्ञानामध्ये जीवन जगत असतो त्यामुळे त्याला पुढे काय घडणार याबद्दल काही कळत नाही. एकीकडे आपल्या मनासारखे घडून यावे असे वाटते मात्र दुसरीकडे तसे घडेल याची खात्री नसते. मग तो भविष्याबद्दल उगाच कल्पना करत बसतो. अशा कल्पना करत बसल्याने भविष्य उलगडत नाही. म्हणून कल्पनांचे जाळे पसरू नये.

योग्यता ही काही आकाशातून पडणारी वा खाणीत सापडणारी गोष्ट नव्हे. ती क्रमाक्रमाने, पायरीपायरीने आणि प्रयत्नपूर्वक त्या त्या कार्यासाठी योग्यता प्राप्त करून घेता येते. मनाची चंचलता इंद्रियांना अधिक स्वैर बनवते. एकमेकांपासून पोषण घेत दोन्ही वाढत असतात. शरीर आवरणे त्यातल्या त्यात अधिक शक्य आहे. म्हणून क्रिया पालटण्यावर समर्थांनी भर दिला आहे. काय करावे व काय करू नये याची जाणीव माणसाला असते. तसे वर्तन मात्र घडत नाही. बुध्दिपुरस्सर विवेकाने असा पालट घडवून आणावा.

शरीराला लागणाऱ्या सवयी व मनाला वाटणारे हेवेदावे यांचा बारकाईने विचार करून त्यातील ... क्रमाक्रमाने

टाळत गेले पाहिजे आणि इष्ट ते हळूहळू साधत गेले पाहिजे.
चांगली भूक लागली असली तरी पानात वाढलेल्या कढत खिचडीत मध्येच हात घालून मोठा घास घेणे इष्ट नसते. पानात वाढलेली खिचडी कडेकडेने, लहान लहान घास उचलून खाणेच शहाणपणाचे ठरते. काय करावयाचे आहे हे निश्चित झाले तरी ते कसे व कुठे व किती करावे याविषयी तारतम्य बाळगणे म्हणजे विवेक.
केव्हा, आळस जसा चांगला नाही तसा अति उत्साहही चांगला नाही. दीर्घसूत्रीपणा टाळणे जसे आवश्यक तसेच फार घाई करणेही घातक ठरते. कितीही भूक लागली तरी घासाघासाने अन्न खावे लागते. प्रत्येकाची प्रकृति, परिस्थिती भिन्न असते. दुसऱ्याचे पाहून तसे वागून चालत नाही. दुसऱ्याचे उदाहरण प्रेरक म्हणून उपयोगी पडते. पण ज्याची त्याने व्यसने सोडायची असतात. दुर्वर्तन टाळायचे असते व क्रिया पाळायची असते यालाच विवेक म्हणतात.
विषयोपभोग घेताना आरोग्यशास्त्र लक्षात ठेवावे. पूजा पाठ करताना प्रेमाने व निष्ठेने करावेत. दानधर्म करताना प्रामाणिकपणे उदारता असावी. सामाजिक कार्य करताना निःस्वार्थीपणे करावीत. कुटुंबात वागताना सरळपणा व कर्तव्यबुद्धी ठेवली पाहिजे. स्वाभिमान असावा पण अहंकार नसावा. दुःखितांविषयी कळवळा असावा. दीनांच्या मदतीला धावून जावे. कर्तव्यात कसूर करू नये. ईश्वरावर श्रद्धा असावी
हे वाक्य कीर्तनकार, प्रवचनकार, पुढारी यांना उद्देशून नाही तर सामान्य माणसे व्याख्यान देत नसली तरी प्रसंगानुसार चर्चा, वादविवाद, थट्टा, टिंगल, निंदा करतच असतात. ते सर्व बोलणेच आहे. त्यातून येणारा विचार स्वतः वागताना लक्षात ठेवायचा आहे. माणसाजवळ सुप्त सामर्थ्य अलौकिक आहे. त्याचा योग्य वापर करता आला तर नरचा नारायण होऊ शकतो. संत बोलल्याप्रमाणे वागतात आणि परमेश्वराच्या पात्रतेत जाऊन बसतात. वर्तनात उतरत नाही ते बोलणे समर्थांना मान्य नाही.

© www.madhaveeraghuveer.com

घरी स्नानसंध्या करी येकनिष्ठा।
विवेके मना आवरी स्थानभ्रष्टा।
दया सर्वभूती जया मानवाला।
सदा प्रेममू भक्तिभावे निमाला॥१०६॥

अर्थ - माणसाने स्नानसंध्यादि शास्त्रविहित नित्यकर्मे संपूर्ण श्रद्धा ठेवून करावीत. जाऊ नये तिथे जाणारे आपले मन विवेकाने आवरावे. ज्याला सर्व प्राणिमात्राबद्दल दया बुद्धि असते आणि ज्याच्या मनात भगवंताबद्दल खरे प्रेम असते तो माणूस समाधान पावतो.

स्पष्टीकरण - श्री समर्थांच्या काळी हिंदूंची जीवनपद्धती परंपरागत शास्त्रांना अनुसरून चालत होती. कालांतराने त्यात आपोआप बदल घडतो. परंतु किरकोळ बदल झाला तरी जीवनपद्धतीचा मूळ धारा बदलू नये असा त्यांचा हेतु आहे. मूळ ध्येय बदलू नये.

आचाराचा संबंध जीवनाच्या बहिरंगाशी असतो. भगवंताच्या दर्शनासाठी अंतरंग तयार झाले पाहिजे. त्यासाठी ते आधी स्वच्छ असावे. मन जाऊ नये तिथे जाते, करू नये त्याचे चिंतन करते. विवेकाने त्याला आवर घालून भ्रष्ट होऊ देता कामा नये. यामधेच परमार्थाचे रहस्य आहे.

माणसाच्या अंतर्यामी दया, क्षमा, शांती यांचा वास असावा. केवळ कर्तव्यापोटी नव्हे तर भक्तीमधून या सद्गुणांचा जन्म व्हायला हवा. माणसाने आपले जीवन विकसित करून घ्यावे व ते अधिकाधिक पारमार्थिक करावे.

इथे स्वच्छतेकरता स्नान व शुद्धतेकरता संध्या असा क्रम आहे. एक शरीराकरता तर एक मनाकरता आहे. स्वच्छतेची जाणीव आपण व्यवहारात बऱ्यापैकी ठेवतो. पण त्याचा क्रम लक्षात घेणे आवश्यक आहे.

आजकाल स्वयंपाकानंतर स्नान करण्याची पद्धत रूढ होत चालली आहे. अस्वच्छ शरीराने केलेल्या स्वयंपाकाला अस्वच्छता येते. निदान अशुद्धता तरी येतेच येते.

वडीलधाऱ्यांचा धाक म्हणून, रूढी म्हणून, परंपरा म्हणून संध्या वा तत्सम कृत्ये केली जातात. त्यात निष्ठा नसते.

स्नान झाले नसेल तर कोणत्याही धार्मिक कृत्यात भाग घेण्याचा अधिकार प्राप्त होत नाही अशी आपली धारणा आहे. स्नान हे व्रत आहे. त्रिकालस्नान करणे धार्मिकतेच्या दृष्टीने प्रशस्त मानले जाते.

संध्या ही सूर्याची उपासना आहे. सर्व चैतन्याचा आणि सृष्टीच्या व्यापाराचा प्रेरक सूर्य आहे. तो परमेश्वराचे मूर्त प्रतीक आहे. संध्येच्या माध्यमातून त्याच्याशी संबंध प्रस्थापित होतो आणि मग चैतन्याचे प्रेरक अंश आपल्यालाही लाभू शकतात. संध्येचा प्राणभूत असलेला गायत्रीमंत्र हा सर्व मंत्रांचा चक्रवर्ती सम्राट आहे. त्याचे अनुष्ठान जितक्या निष्ठेने होईल तितके लाभदायक होते.

या संध्यापूजादि गोष्टी करण्यात आस्था असावी. श्रद्धा हवी. करण्यामागे आवड, प्रेम हवे. जे करायचे ते मनापासून लक्ष लावून, सावध राहून करायला हवे. हे सगळे लक्षात घेऊन करणे म्हणजेच एकनिष्ठतेने करणे आहे.

श्रवण, पूजा, स्तोत्रपठण, पोथीवाचन हे सर्व माणूस करतो पण खरे करत नाही. अंतःकरणात खरी निष्ठा, प्रेमादर नसतो. हा आपल्या उद्धाराचा मार्ग आहे हे मनापासून पटलेले नसते. करतो ते गतानुगतिक म्हणून! नाही केले तर पाप लागेल; संकटे सोसावी लागतील म्हणून! या कृत्यामध्ये मन लागत नाही; बुद्धि स्थिरावत नाही मुसळी हात डोळे, जीभ यांची हालचाल होत रहाते.

माला तो करमें फिरै जीभ फिरे मुखमाहि।
मनुवा तो दस दिसि फिरै यह तो सुमिरन नाहि॥

मनबुद्धिची केंद्रे वरच्या पातळीवरची, सूक्ष्म आहेत. समर्थ दुसऱ्या ओळीत विवेकाने स्थानभ्रष्ट मनाला आवरायला सांगतात. त्यासाठी वरचेवर मनाला वळवण्याचा प्रयत्न करावा लागतो. सर्वश्रेष्ठ कलाकार, गायक, शास्त्रज्ञ, गणितज्ञ पुन्हा पुन्हा सराव करतात. मन फार चुकार आहे. त्याच्या नाठाळ-पणाला कधी कधी ऊत येतो. पण एकदा गोडी लागली की मन रमते, स्थिरावते. जप ध्यान पूजा यांची परिणती एकाग्रतेत झाली पाहिजे. त्यासाठी मन हे साधन आहे.

मना कोप आरोपणा ते नसावी।
मना बुद्धि हे साधुसंगी वसावी।
मना नष्ट चांडाळ तो संग त्यागी।
मना होई रे मोक्षभागी विभागी॥१०६॥

अर्थ- अरे मना ! आपल्या ठिकाणी क्रोधाचा उद्भव होऊ नये. बुद्धीला संतांच्या संगतीत ठेवण्याचा प्रयत्न कर. आपला नाश करणारी अशी वाईट संगती सोडून दे. मोक्षाचा वाटेकरी होऊन जा.

स्पष्टीकरण - मनाला पूर्ण शांती मिळवण्यासाठी भगवंताची उपासना करायची. क्रोधाचा परिणाम शांतीच्या बरोबर उलट असतो. सहा विकारांपैकी क्रोध हा अतिशय घातक असतो. जीवनात क्रोध येण्यासारखी अनेक कारणे येतात. परंतु किती व केव्हा रागवायचे हे आपल्या हातात असावे. त्यासाठी सुद्धा संगतीला महत्व आहे. साधुसंगतीमुळे आपल्या बुद्धित पालट होत जातो. सत्संगतीने ती भगवत्स्वरूप बनते. सत्संगतीने बुद्धि स्वच्छ व ईश्वरनिष्ठ झाली की अज्ञान निवृत्त होते व मोकळेपणा प्रचीतीस येतो.

राग, संताप येऊ देऊ नये हा पहिला उपाय. पण संसारात तशी परिस्थिती बहुतेक वेळा येतेच. जे हवे असते ते मिळत नाही आणि जे घडू नये असे वाटते नेमके तेच वाट्याला येते. प्रतिकूल प्रसंग घडत असतात. संबंधित लोक जे बोलू नये ते बोलत असतात. अशा वेळी शांत रहाण्याचा अभ्यास केला पाहिजे. काही वेळा थोडे रागावणे आवश्यक असते मात्र ते कर्तव्यबुद्धिने हवे. क्रोध आलेला असू नये, आणलेला असावा. रागावून बोलणे हे ओठातून असावे. पोटातून नसावे. म्हणूनच कोप आरोपणा ते नसावी. म्हणजे राग उपजू देऊ नये. उत्पन्न होऊ देऊ नये. तसेच रागाला चढू देऊ नये. डोक्यावर बसू देऊ नये. संतापाच्या आधीन होऊ नये. तसेच प्रसंगविशेषी कर्तव्यबुद्धिने क्रोध आणता आला पाहिजे हेही खरे ! इथे समर्थांना तेच अभिप्रेत आहे.

रागाच्या आधीन झाल्याने माणसाचे तारतम्य सुटते. प्रकृतीवर दुष्परिणाम होतात. आणि परिस्थितीत तर काही सुधारणा होत नाहीच. त्यासाठी क्रोधाला आपला सेवक बनवावे.

दुसरा उपाय म्हणजे नेहमी संत सज्जनांच्या संगतीत राहावे. संतांचे आचार - विचार - उपदेश यांचा परिणाम परमार्थाच्या दृष्टीने फार चांगला होतो. मात्र त्यासाठी माणसाचे मन संस्कारक्षम आणि नम्र साधकाचे असावे लागते त्यासाठी समर्थ म्हणतात- बुद्धि ही साधूंच्या संगतीत राहावी. संगतीचा, वातावरणाचा परिणाम निश्चित होत असतो. सज्जनांच्या ~~संस्कारामुळे~~ सहवासामुळे वाईट संस्कारांचे भय टळते आणि चांगल्या संस्कारांचा संभव वाढतो. तिथे सुसंस्कार रुजू शकतात.

त्यासाठी त्या व्यक्तीची वृत्ती अनुकूल असावी. ध्येय निश्चित असावे. प्रगती करून घेण्याची उत्कट इच्छा असावी. विवेक जागृत असावा. जे ऐकले, पाहिले त्याचे मूल्य मापन करता यावे. उपदेशाप्रमाणे वागण्यासाठी सदा प्रयत्नशील असावे. ही बुद्धी नसेल तर सज्जनांच्या संगतीचा विशेष काही लाभ होणार नाही.

मोठमोठ्या गुरुंच्या, संतांच्या समोर किंवा माघारी संपत्तीसाठी, अधिकारपदासाठी त्यांच्या शिष्यांमध्ये झालेल्या भांडणांची, कलहाची उदाहरणे काही कमी नाहीत.

सत्संगतीचा महिमा आधी कळावा लागतो मग तो मुरावा लागतो. नाहीतर सहवासात येऊन सुद्धा माणसे तीर्थामधल्या गोट्यासारखी कोरडीच राहतात. यासाठी निषेध रूपाने समर्थ तिसरा उपाय सांगतात. विषयांचा संग आसक्ती अत्यंत घातक आहे, ती टाळावी. त्यासाठी मात्र प्रयत्नांची पराकाष्ठा करावी. संग हाच बुद्धिनाशापर्यंत पोहोचवतो त्यासाठी त्याला चांडाळ म्हटले आहे. संग घातक असला तरी त्याचे स्वरूप घातक वाटत नाही. उलट लोभनीय, आकर्षक वाटते. संगाचा कपटीपणा घातक आहे. विषयसंग सुरुवातीला निरुपद्रवी वाटतो पण त्यातूनच अनर्थ ओढवतो.

काम क्रोध, लोभ मोह अशी सर्वनाश करणारी कारणे आरंभी लहान वाटली तरी संगामुळे पुढे ती समुद्रासारखी प्रचंड होतात व माणसाला बुडवतात. त्यापासून अलिप्त राहून प्रगती केली तर मनुष्य मोक्षाचा अधिकारी होतो. शुद्ध चित्त हाच मोक्ष आहे.

© www.madhaveeraghuveer.com

सदा सर्वदा सज्जनाचेनि योगे।
क्रिया पालटे भक्तिभावार्थ लागे।
क्रियेवीण वाचाळता ते निवारी।
तुटे वाद संवाद तो हीतकारी॥१०८॥

<u>अर्थ</u>- मना! सत्पुरुषांच्या संगतीने नेहमीच आपल्या आचरणामध्ये बदल घडतो आणि भगवंताच्या अस्तित्वाची जाणिव निर्माण होऊन त्याचे प्रेम लागते. स्वतः आचरल्याशिवाय उगाच बडबड करू नये. तत्त्वानुकूल संभाषण होऊन जी चर्चा निकालात निघते ती परमार्थाला अनुकूल ठरते, उपकारक ठरते.

<u>स्पष्टीकरण</u> - सत्संगतीचे दोन परिणाम होतात. एक म्हणजे आपल्या आचरणात आमूलाग्र बदल होतो आणि दुसरे म्हणजे भगवंताच्या अस्तित्वाची खरीखरी जाणीव होऊन त्याच्यावर प्रेम करण्याची कला साधते. संतांच्या सहवासाने देवाच्या असण्याबद्दल विकल्प उरत नाही. शिवाय आपण स्वतःवर जितके प्रेम करतो तितकेच प्रेम संत भगवंतावर करतात. ते प्रेम कसे करावे ही विद्या संतांपाशीच शिकायला मिळते.

तत्त्वज्ञानामध्ये एखाद्या समस्येचे उत्तर मांडण्यासाठी तिच्या सर्व अंगांची चर्चा करण्याचा प्रघात आहे. चर्चा करताना आपण जो पक्ष मांडतो त्यावरील सर्व आक्षेपांचा विचार करावा लागतो. पक्ष मांडणे व त्यावरील आक्षेपांना उत्तर देणे याला वाद म्हणतात. वादामध्ये अर्थातच दोन बाजू असतात. तत्त्वाचा निर्णय करण्यासाठीच वाद होतात. तेव्हा त्यामध्ये संवादाचे प्रसन्न वातावरण रहाते. अशा वादाने मनाचे समाधान होते; संशयाची निवृत्ती होते व सिद्धांत पटतो. पण जेव्हा त्वेषाने किंवा अभिमानाने वाद खेळला जातो तेव्हा त्यातून कटुता निर्माण होते. व तत्त्वनिर्णय बाजूलाच रहातो. ज्याला भगवंताचे दर्शन हवे त्याने संवादरूपी वाद किंवा चर्चा करावी पण शुष्क वाद करू नये अशी स्पष्ट सूचना इथे समर्थ देत आहेत.

संत सज्जन मोजके आणि हिताचे बोलतात. त्यांचे संभाषण ऐकल्यावर माणसांच्या वागण्यात बदल होतो. परंतु विद्वानांच्या भाषणात भाषेचा फुलोरा असतो परंतु त्यातून

© www.madhaveeraghuveer.com

समाजपरिवर्तन घडणार नाही. कलियुगात अज्ञानी माणसे खूप अहंकारी आणि वाचाळ झाली आहेत तर सत्पुरुष नम्र आणि शांत आहेत. क्रियेविण वाचाळता नेहमीच वादाकडे घेऊन जाते. सांगणारा आचरणात आणत नसल्याने त्याचा लोकांवर काहीही परिणाम होत नाही.

About religion let us ~~talk~~ act more and talk less. A drop of action is better than an ocean of talk. असे स्वामी विवेकानंद म्हणतात.

आज शेकडो वर्षांनंतर संतांच्या वाणीचा प्रभाव कायम आहे. कारण संत जसे जगले तसे बोलले. वाद हा अहिताचा असून संवाद हितकारक आहे.

मनुष्य जात्याच बुद्धिमान असल्याने तो विचार करतो. ऐकणे, वाचणे, पहाणे, अनुभवणे यामुळे त्याच्या विचारांना चालना मिळते. बुद्धीची मर्यादा, प्रकृति, स्वभाव यातील भिन्नता, परिस्थितीचे स्वरूप यामुळे विचारांना निरनिराळ्या दिशा मिळतात. वेगवेगळी मते बनतात. ती कधी सत्याच्या जवळ तर कधी सत्यापासून दूर असतात. कधी असत्याला सत्य तर कधी सत्याला असत्य मानणारी अशी भ्रांत असतात. कधी निश्चित, कधी आग्रही, कधी दुराग्रही, कधी चंचल (डळमळीत), कधी सरड्याप्रमाणे रंग बदलणारी अशी असतात. त्यामुळे दोन भिन्न मतांच्या व्यक्ती एकत्र आल्या तर चर्चा होते आणि प्रकृतिभेदाने या चर्चेला वादविवादाचे रूप प्राप्त होते. या वादविवादातून बुद्धीला चालना मिळते. विचाराला नेमकेपणा येतो. आपले मत मांडण्याचे कौशल्य लाभते, वाढते. असे अनेक लाभ होतात. परंतु त्याचबरोबर हट्टीपणा, दुराग्रह, प्रतिपक्षावर मात करण्याचा अभिनिवेश हे अनिष्ट गुणही वाढीस लागतात. नुसताच बोलघेवडेपणा वाढतो.

समाजहिताच्या दृष्टीने समर्थांना सदाचारी, सद्वर्तनी माणूस अपेक्षित आहे. त्याचे विचार निश्चित असावेत. तो निष्ठावंत असावा. संतांच्या संगतीत राहून क्रिया पालटते. वर्तन सुधारते.

प्रामाणिक जिज्ञासा आणि निरहंकारी नम्र वृत्ती ही जर चर्चेची अंगे असतील तर हा वाद सुखसंवाद (हितकारी) ठरतो.

जनी वादेवाद सोडूनि द्यावा।
जनी सुखसंवाद सुखे करावा।
जगी तो चि तो शोकसंतापहारी।
तुटे वाद संवाद तो हीतकारी॥१०९॥

अर्थ - उलटसुलट प्रश्नोत्तरे करणारा वादविवाद माणसाने सोडून द्यावा. पण एखाद्या तात्त्विक प्रश्नाची सर्वांगिण चर्चा करणारा संभाषणात्मक संवाद मनाने करावा. अशा संवादाने बुद्धीचे समाधान होते आणि मनाचे क्लेश दूर होतात आणि तत्त्वानुकूल संभाषण होऊन जी चर्चा निष्कर्षात निघते ती परमार्थाला उपकारक ठरते.

स्पष्टीकरण - समाजजीवनामध्ये निरनिराळ्या कालखंडामध्ये निरनिराळ्या समस्या असतात. त्या समस्यांवर चर्चा करण्यासाठी त्यांचे सर्वांगिण ज्ञान असावे लागते. तिला समाधानकारक उत्तर मिळावे म्हणून होणारी चर्चा श्रेष्ठ दर्जाची समजावी. परंतु आपल्या मनाप्रमाणे उत्तर मिळावे म्हणून होणारी चर्चा कनिष्ठ दर्जाची ठरते. पुढे ती वादाच्या हीन पातळीवर उतरते नंतर त्याचे रुपांतर शाब्दिक मारामारीत होते. वितंडवाद, अतिवाद, शुष्कवाद, हीनवाद, कुटवाद, वध्यावाद हे सर्व टाळायला हवेत.

मात्र माणूस हा बुद्धिप्रधान प्राणी आहे. आपल्याला जे समजले नाही त्याबद्दल तज्ञांशी संवाद केला तर आपल्या कल्पना स्पष्ट होत जातात व आपले गैरसमज दूर होतात. संतांबरोबर सुखसंवाद केला तर आपल्या शंकाकुशंकांचे निराकरण होते व समाधान प्राप्त होते. माणसाच्या सर्व शंका शांत झाल्या की भगवंताचे प्रेम निर्माण होते.

सुखसंवाद हा अतिशय गोड व समर्पक शब्द आहे. सुखसंवादामध्ये एखाद्या प्रश्नाच्या विविध बाजू समजावून घेतल्या जातात. त्यामुळे आपली प्रगती होऊन व्यापकता वाढते. मात्र जर आपले मत बदलण्याची तयारी नसेल किंवा आपल्याच मताला चिकटून रहाण्याचा दुराग्रह असेल तर प्रगती खुंटते. विज्ञानामध्ये नवीन शोध लागला की जुना शोध कालबाह्य ठरतो. तद्वत माणसाने उच्चतर सत्याचा लाभ झाल्यानंतर आपले मत बदलण्याची तयारी ठेवावी.

Flexible Rigid

सुखसंवादामध्ये मन लवचिक असते. ताठर नसते. सुखसंवादामध्ये शोक व संताप यांचे हरण करण्याचे सामर्थ्य असते. स्वामी विवेकानंदांनी आपले गुरु रामकृष्ण परमहंस यांच्याशी दीर्घकाळ वाद घातला परंतु जसजसा सत्याचा लाभ होत गेला तसतसे त्यांनी आपले सर्व जुने आग्रह सोडून दिले. पुढे त्यांचा सुखसंवाद सुरु झाला. मूर्तिपूजेवर विश्वास नसलेले विवेकानंद मूर्तिपूजा मानू लागले स्वतःमध्ये त्यांनी बदल घडवून आणला.

वादामध्ये मनाचे कवाड बंद होते. तर सुखसंवादात विचारांचे नवे वारे स्वीकारण्यास मनाचे कवाड खुले असते. सुखसंवाद हिताचा असतो कारण तो माणसाला अध्ययनशील व नम्र बनवतो. वाद माणसाला अहंकारी बनवतो व अहंकारी मनुष्य पुढे काहीच शिकू शकत नाही.

खरे तर शंकानिरसनासाठी जिज्ञासू बुध्दीने सुखसंवाद अवश्य करावा पण गंमत अशी की माणसे नियेच मौन पाळतात. एरवी व्यर्थ वादविवादात मात्र त्यांना उत्साह असतो. अशा वादविवादामुळे डोके उगीच तापते; कंठशोष पदरी पडतो. तत्वबोध तर होतच नाही. म्हणून असे वादविवाद करु नयेत.

जिज्ञासू वृत्तीने सुखसंवाद करावा. ऐकले, वाचले, पाहिले तर शंका आल्या पाहिजेत. तसे प्रश्न उत्पन्न होतात. ते घोटाळ्यातही पाडतात. म्हणून संकोच न करता जाणकाराकडून त्यांचे निरसन करुन घ्यावे. अशा प्रामाणिकाशी बोलताना ज्ञात्यालाही आनंद होतो. अर्जुनाचे जिज्ञासुबुध्दीने प्रश्न विचारणे भगवंतांनाही आवडत होते.

संवादाने विषय हलका होतो.

तुटे वाद संवाद त्याते म्हणावे।
विवेके अहंभाव याते जिणावे।
अहंतागुणे वाद नाना विकारी।
तुटे वाद संवाद तो हीतकारी ॥११०॥

अर्थ - ज्या चर्चेमध्ये समस्या सुटते त्या चर्चेला संवाद म्हणतात माणसाने विवेकाच्या सहाय्याने अहंकार नाहीसा करावा. अभिमान बाळगून वाद केला तर अनेक विकार प्रगट होतात. तत्वानुकूल संभाषण होऊन जी चर्चा निकालात निघते ती परमार्थाला उपकारक ठरते.

स्पष्टीकरण - कोणत्याही विषयावर चर्चा करताना चर्चेतील मुद्यांना महत्व दिले पाहिजे व व्यक्तींना गौण स्थान असावे. व्यक्ती गौण झाली की चर्चेची पातळी उच्च रहाते आणि प्रश्नाचे उत्तर मिळाले की चर्चा आपोआप विराम पावते. अशी चर्चा त्यात भाग घेणाऱ्या सर्वांना सुखदायक होते. आणि त्याला संवाद हे नाव शोभते.

चर्चेत भाग घेणाऱ्या व्यक्तींना आपल्या विद्वत्तेचा किंवा कर्तृत्वाचा अभिमान असेल तर सत्यशोधन बाजूला राहून प्रतिपक्षाला फजीत करण्याकडे सगळा कल राहतो. प्रतिपक्षाला क्षुद्र दाखवण्याच्या प्रयत्नामध्ये क्रोध, द्वेष, मत्सर, गर्व, निंदा, अवहेलना, खोटे दोषारोप इ० सर्व विकार धुमाकूळ घालतात. दोन्हीकडील विद्वान घाणीत उतरतात व एकमेकांवर चिखलफेक करतात. विद्वत्तेचा अहंकार नाहीसा झाल्यावाचून खरा संवाद होणे शक्य नाही. अशा वादातून केवळ असमाधानच पदरात पडते.

अहंकारी मनुष्य अर्ध्या हळकुंडाने पिवळा होतो. असा मनुष्य आपल्या गुरुशीसुद्धा वाद घालायला कचरत नाही. स्टर्डी आणि मूलर हे विवेकानंदांचे शिष्य! त्यांनी स्वामीं-जवळ योगाचा अभ्यास केला पण पुढे ते स्वतःला श्रेष्ठ योगी समजायला लागले व त्यांनी स्वामीजींना नावे ठेवायला सुरुवात केली.

एकाच मापाचा सदरा सगळ्या माणसांना येणार नाही. त्याप्रमाणे प्रत्येक व्यक्ती आणि प्रकृती भिन्न असल्याने

© www.madhaveeraghuveer.com

प्रत्येकजण भिन्न विचारधारेतून जात असतो. मात्र अहंकारी माणूस आपले विचार सगळ्यांवर लादण्याचा प्रयत्न करतो.

संत ज्ञानी असतात. पण त्यांनी अहंकारावर विजय मिळवला असल्याने ते कोणाशी वाद घालत नसीत. विचारांच्या विविध रचना त्यांना ठाऊक असतात. सदाशिवशास्त्री येवलेकर- समर्थांनी त्यांचा मोळीविक्याकडून पराभव करवला व त्यांना त्यांची जागा दाखवून दिली. ते पुढे समर्थांचे निःसीम भक्त झाले व वासुदेवशास्त्री गोसावी या नावाने ओळखले जाऊ लागले कण्हेरी येथील मठाचे मठपती झाले. समर्थांशी सुखसंवाद वाढल्यावर त्यांचा अधिकार एवढा वाढला की शिवछत्रपतींना काही कारणाने समर्थ भेटले नाहीत तर ते प्रतिसमर्थ म्हणून वासुदेव गोसावींना भेटत असत. असा हा सुखसंवाद हितकारी आहे.

विद्वानांचा अहंकार हा अधिक उग्र असतो.

© www.madhaveeraghuveer.com

हिताकारणे बोलणे सत्य आहे।
हिताकारणे सर्व शोधूनि पाहे।
हिताकारणे बंड पाखांड वारी।
तुटे वाद संवाद तो हीतकारी॥११०॥

अर्थ - तुझ्या आत्मकल्याणासाठी जे खरे आहे ते तुला मी सांगतो. विचाराने सर्वांचा शोध घे आणि मग आत्महिताचा मार्ग निश्चित कर. देवाधर्माच्या विरुद्ध असणारे हीन नास्तिक मत आणि तर्कदुष्ट थोतांड पोसणारे आचारविचार बाजूला सार. तत्त्वानुकूल संभाषण होऊन जी चर्चा निकालात निघते ती परमार्थाला उपकारक ठरते.

या दृश्य जगाला सांभाळणारे एक अदृश्य आणि अतींद्रिय तत्त्व आहे. या तत्त्वाचे नाव आत्मा असून त्याचा साक्षात्कार करून घेणे हेच मानवी जीवनाचे परम कल्याण आहे. आत्मज्ञानातच आत्महित साठवलेले आहे. याचा विचाराने शोध घ्यावा. दुसऱ्याच्या सांगण्यावर श्रद्धा बसणे अनेकदा कठीण जाते. तेव्हा माणसाने स्वतः सरळ विचाराने जीवनावर प्रकाश टाकावा. स्वतः विचार करून निश्चित झालेल्या मतांना मोठी स्थिरता लाभते. त्यातून ध्येयप्राप्तीचा मार्ग सापडतो.

आपले विचार उत्तमप्रकारे मांडण्याची कला पुष्कळांना अवगत असते. परंतु आत्मतत्त्वाचा साक्षात अनुभव घेऊन त्या पार्श्वभूमीवर विचार करणारे फार थोडे विचारवंत असतात आणि स्वरूपानुभवाचा पाया नसलेले विचार कोठे भरकटतील याचा नेम नसतो. यातूनच सदोष नास्तिक मते उदयाला येतात मात्र अशा तर्कदुष्ट सदोष मतांच्या आहारी जाऊ नये.

महाभारतात सत्याची व्याख्या करताना 'जे हिताचे आहे ते सत्य' असे म्हटले आहे. मुलाचे दात खराब होऊ नये म्हणून आई चॉकोलेट संपले असे सांगते. पण ते खोटे असले तरी खोटे नसते. संत समाजाच्या हितासाठी बोलत असतात. ते प्रिय आणि हितकारक बोलतात.

सुलभाः पुरुषाः राजन् सततं प्रियवादिनः।
अप्रियस्य च पथ्यस्य वक्ता श्रोता च दुर्लभः।

विषयी माणसाला हित आणि अहित यातील सीमारेषा दिसत नाहीत. इंद्रियांचा दास असल्यामुळे त्याला अयोग्य गोष्टीच योग्य वाटू लागतात रजतमाने मलिन झालेली बुद्धी स्वार्थाचा विचार करते, हिताचा विचार करत नाही.

पुढे समर्थ सांगतात की मी सांगतो म्हणून केवळ विश्वास ठेवू नकोस. मी सांगतो त्यात तुझे हित आहे की नाही ते शोधून पहा. आज समाजामध्ये व्यसनांना, अभक्ष्य भक्षणाला, अनैतिकतेला प्रतिष्ठा मिळत आहे. या सर्व गोष्टी खरोखर हिताच्या आहेत का? अश्लीलता, हिंसाचार (Sex & Violence) यांनी भरलेले चित्रपट यशस्वी ठरतात, लोकप्रिय ठरतात. परिणामतः समाजात खून आणि बलात्कार यांचे प्रमाण वाढत आहे. तेव्हा कोणत्या गोष्टी नेमक्या हिताच्या आहेत याचा साधकाने शोध घेतला पाहिजे. धर्मसंस्थापनेची जबाबदारी असणारे संत समाजात रूढ होऊ पहाणाऱ्या अहिताच्या गोष्टींचे बंड मोडून काढतात त्यालाच समर्थ इथे 'बंड पाखांड' वारी म्हणतात. संतांच्या या खंडनाला वाद म्हणता येणार नाही.

धर्मद्रोही भालचंद्र नेमाडे यांनी 'हिंदू धर्म एक अडगळ' असे पुस्तक लिहिल्याबद्दल सरकारने त्यांना बक्षिसी दिली. अशा फालतू पुस्तकामुळे तरुणांचा बुद्धिभेद होऊ शकतो. आपल्या लेखनाने वक्तृत्वाने जनतेची दिशाभूल करू नये. संतांनी, उपनिषदकालीन ऋषींनी जगाच्या कल्याणासाठी काही गोष्टी हिताच्या सांगितल्या आहेत. त्यांच्याविरुद्ध बोलणारे पाखंडी लोक हे स्वार्थी व संधिसाधू आहेत. त्यामुळेच पाखंड्यांचे बंड माजते.

स्वामी विवेकानंदांनी अमेरिकेत ठिकठिकाणी व्याख्याने देताना ख्रिश्चन मिशनरीजनी हिंदू धर्माचे जे चुकीचे चित्र उभे केले होते त्याचे कठोर शब्दात खंडन केले आणि जागतिक स्तरावर हिंदू धर्माला न्याय मिळवून दिला. त्यासाठी करावी लागणारी वादावादी हितासाठी असल्याने समर्थनीय आहे.

जनी सांगता ऐकता जन्म गेला।
परी वादवेवाद तैसाचि ठेला।
उठे संशयो वाद हा दंभधारी।
तुटे वाद संवाद तो हीतकारी॥११२॥

अर्थ - मानवीसमाजाच्या जीवनात सांगणारे सांगत गेले व ऐकणारे ऐकत गेले. तरीपण वादविवाद निर्माण करणारे तात्त्विक मतभेद कायमच टिकले. माणसांना अनेक प्रकारचे संशय आल्याखेरीज रहात नाहीत. ते निरसन करण्यासाठी मग पोकळ वाद होतात. तत्त्वानुकूल संभाषण होऊन जी चर्चा निकालाला निघते, ती परमार्थाला उपकारक ठरते.

स्पष्टीकरण - प्रत्येक कालखंडामध्ये कोणत्या ना कोणत्या विषयावर समाजात वादविवाद चालूच असतात. माणसाला ईश्वर, धर्म व नीति हे विषय अधिक आवडतात. या विषयांवर बोलणाऱ्या माणसांना कधीच तोटा नसतो. तसेच ते ऐकणारेही बरेच असतात. हजारो वक्ते या विषयांवर आपली मते ठामपणाने मांडून गेले, तरी त्याच बाबतीत अजूनही वाद विवाद चालू आहेत व ते तसेच चालू रहाणार हे निश्चित. पण तत्त्व शोधणाऱ्या माणसाने त्यांच्या नादी लागू नये. दृश्यातून निर्माण झालेली मानवी बुद्धी ही दृश्याचे ज्ञान मिळवू शकते पण दृश्य ओलांडून जेव्हा ती अतींद्रियात उडवूड करते तेव्हा तिला निश्चित निर्णय देता येत नाही. त्यामुळे प्रत्येकजण आपापल्या बुद्धीच्या संस्कारानुसार कल्पनाविलास करतो. त्यातूनच अनेक शुष्क वाद प्रसार पावतात.

पढतमूर्खाची लक्षणे सांगताना समर्थ म्हणतात.

रात्रंदिवस करी श्रवण। न सांडी आपुले अवगुण।

आपण देह नसून ब्रह्म आहोत असे शंकराचार्यांपासून ते विवेकानंदांपर्यंत सगळे संत सांगत आले आहेत तरी आपली देहबुद्धी काही कमी होत नाही. सर्व संतांचे एकच दुःख आहे. कितीही सांगा लोक आमचे ऐकत नाही.

ऊर्ध्वबाहु विरौम्येष न कश्चित शृणोति मे।
धर्मादर्थश्च कामश्च स किमर्थं न सेव्यते।

© www.madhaveeraghuveer.com

असे महाभारतात व्यासदेवांनी म्हटले आहे.

वादात दांभिकता असली म्हणजे संशयात भर पडते. संतांनी परोपरीने समजावून सांगितले तरी शंका प्रश्न, वादविवाद आहे तसेच राहिले जर सांगणाऱ्याला अनुभव नाही आणि ऐकणाऱ्याला जिज्ञासा नसेल तर असे हे सांगणे - ऐकणे काय कामाचे? सांगणारा जर नुसता पुस्तकी पंडित असेल आणि विचारणारा नुसता शंकेखोर असेल तर त्यातून काहीच निष्पन्न होत नाही.

सांगणारा जर भगवान श्रीकृष्णासारखा असेल —

अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः।

आणि ऐकणारा जर अर्जुनासारखा असेल, जो पुन्हापुन्हा जिज्ञासुपणे प्रश्न विचारेल अगदी फटकळपणाने विचारेल पण शंकानिरसन झाल्यावर म्हणेल की

स्थितोऽस्मि गतसन्देहः करिष्ये वचनं तव।

तर हा खरा संवाद आणि तोच हितकारी आहे.

© www.madhaveelaghuveer.com

जनी हीन पंडीत सांडीत गेले।
अहंतागुणे ब्रह्मराक्षस जाले।
तयाहूनि वित्पन्न तो कोण आहे।
मना सर्व जाणीव सांडूनि राहे॥११३॥

अर्थ - मोठमोठे विद्वान स्वत:चे आत्मकल्याण करुन घेत नाहीत. विद्येच्या अभिमानापायी पुष्कळ विद्वान मेल्यावर ब्रह्मराक्षस बनतात. त्यांच्याहून अधिक विद्वान सापडणे कठीण म्हणूनच मना, आपल्या ज्ञानाचा अभिमान ठेवू नकोस.

स्पष्टीकरण - भारतामध्ये काही वर्षांपूर्वी म्हणजे साधारणपणे सातव्या शतकानंतर विद्येच्या निरनिराळ्या क्षेत्रातील सृजनशीलता आटून गेली. आणि केवळ शब्दज्ञानाची उपासना उरली. त्यातून समाजामध्ये शास्त्रपंडितांचा एक नवीनच वर्ग उदयाला आला. हा वर्ग सनातनी व अहंकारी होता. तसेच वादप्रियही असल्याने आपल्या विद्वत्तेचे प्रदर्शन करत व अजिंक्यपत्रे गोळा करत ते देशभर हिंडत. मात्र असे पंडित आत्मज्ञानापासून दूर असत.

केवळ शब्दज्ञानामध्ये बुडालेल्या पंडिताची वादवासना त्याला अंतकाळीदेखील सोडत नाही. म्हणून मेल्यावर तो ब्रह्मराक्षस होतो. विद्येच्या दुरभिमानामुळे त्यांची अशी दयनीय अवस्था होते. त्यामानाने आपली विद्वत्ता कमीच असणार. तेव्हा आपण विद्येचा सारा अभिमान दूर ठेवून रहावे.

अति विद्वान माणसे पांडित्याच्या अहंकारामुळे पुढच्या जन्मी ब्रह्मराक्षस होतात. समर्थांच्या काळात वामन पंडीत नावाचे विद्वान ब्राह्मण संस्कृतमध्ये रचना करत असत. त्यांना त्यांच्या पांडित्याचा अत्यंत अहंकार होता. समर्थांनी त्यांना सामान्य जनांसाठी प्राकृतमध्ये रचना करायला सांगितले. पण त्यांना ते पटले नाही. उलट समर्थांनीच संस्कृत रचना कराव्यात असा त्यांनी सल्ला दिला. हे वामन पंडित एकदा प्रवास करत असताना रात्री मुक्कामासाठी एका झाडाखाली थांबले होते. त्या झाडाला दोन मोठ्या फांद्या होत्या. त्यावर बसलेल्या एका ब्रह्मराक्षसाने दुसऱ्या ब्रह्मराक्षसाला सांगितले की या फांदीवर तू बसू नकोस. कारण ती फांदी मी वामनपंडितासाठी ठेवली आहे.

हे एकनाथ वामनपंडित बेचैन झाले पुढच्या जन्मी आपण ब्रह्मराक्षस होणार या कल्पनेने ते रात्रभर झोपू शकले नाहीत. सकाळी उठताच चाफळला जाऊन त्यांनी समर्थांचे पाय धरले आणि प्राकृतात रचना करण्याचे मान्य केले. त्यांनी रचलेला समर्थांवरचा श्लोक लोकप्रिय ठरला.

शुकासारिखे पूर्ण वैराग्य ज्याचे।
वसिष्ठापरी ज्ञान योगेश्वराचे।
कवी वाल्मीकासारिखा मान्य ऐसा।
नमस्कार माझा सद्गुरु रामदासा॥

समर्थ संप्रदायात तो रोज म्हटला जातो.

समर्थांच्या मते परमात्म्यापेक्षा अधिक ज्ञानी कोण आहे? मी खूप ज्ञानी आहे ही जाणीव माणसाला अहंकारी बनवते. म्हणून समर्थ ज्ञानाची जाणीव टाकून द्यायला सांगतात.

नवल अहंकाराची गोठी। विशेष न लगे अज्ञानापाठी।
ज्ञानियाचे सांगे कंठी। नाना संकटे नाचवी॥

असे माऊली म्हणतात. तर समर्थ म. श्लोकात म्हणतात.

म्हणे जाणता तो जनी मूर्ख पाहे।
अतर्कासी तर्की असा कोण आहे॥

जाणतेपणाचा अहंकार माणसाला उर्मट बनवतो. तुकाराम महाराज म्हणतात — बरा देवा कुणबी केलो।
नाही तरी दंभेचि असतो मेलो॥

इथे विद्वत्तेशी विरोध नाही, तर अहंकार, गर्व, ताठा यांच्याशी विरोध आहे. विद्वानाने खरे तर नम्र असायला हवे. मीच एकटा काय तो पंडित असे म्हणणे म्हणजे डबक्यातल्या मासोळीने प्रचंड देवमाशाचे अस्तित्व नाकारण्यासारखे आहे. माणसाने आपल्या पायांचा उपयोग स्वतःच्या मार्गाने चालण्यासाठी करायचा असतो. दुसऱ्यांना लाथा मारण्यासाठी नाही. विद्वत्तेच्या प्रदर्शनाला लोकेषणेचे स्वरूप येऊ नये.

© www.madhaveeraghuveer.com

फुकाचे मुखी बोलता काय वेचे।
दिसेंदिस अभ्यंतरी गर्व साचे।
क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे।
विचारे तुझा तू चि शोधूनि पाहे ॥११४॥

<u>अर्थ</u> - तोंडाने उगीचच ज्ञान बडबडल्याने काही पदरात पडत नाही त्यामुळे उलट दिवसेंदिवस अंतर्यामी अहंकार मात्र वाढत जातो. आपण जसे बोलतो तशी कृती केल्याशिवाय नुसते बोलणे कुचकामाचे ठरते. ही गोष्ट खरी आहे की खोटी हे तू स्वतः विचाराने शोधून पहा.

<u>स्पष्टीकरण</u> - जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात प्रचीतिला फार महत्त्व आहे. प्रचीतीशिवाय ज्ञानाला मूल्य येत नाही. प्रचीतीशिवाय सर्व तर्क लटके पडतात. निरूपणकार प्रचीती नसताना वाटेल तसा तर्क लढवून हवा तो अर्थ वेदांतग्रंथातून काढतात. त्यातून निरूपणकाराच्या अहंकाराची वाढ होत जाते. हाच त्यातील मोठा धोका आहे. अहंकारामुळे तो आत्म्यापासून दूरदूर सरकतो. विज्ञानामुळे बाह्य जगतात तर आत्मज्ञानाने माणसाच्या अंतरंगात बदल घडून आला पाहिजे. माणसाच्या आचरणात फरक पडणे, विकारांवर स्वामित्व येणे हे वेदांत कृतीमध्ये उतरल्याचे खरे गमक समजावे. जो मी आज देहाला आपलेपणाने पाहतो तोच मी ज्ञानानंतर आत्म्याला आपलेपणाने पाहू लागतो. अर्थात पहिला मी दिवसेंदिवस क्षीण होणे हे वेदांत प्रत्यक्षात उतरल्याचे चिन्ह आहे. आपण स्वतः विचाराने शोध घेऊन हे निश्चित करावे.

प्रचीत सोहळे ते शब्दे

माणूस जेवढे जास्त बोलतो तेवढे त्याचे चित्त विचारांच्या स्पंदनांनी भरलेले असते. एखाद्या पाटीवर खूप गिचमिड गिचमिड शब्द लिहिले असावेत तसे त्याचे चित्त अशांत असते. सारे आयुष्य उधार व उसनवार ज्ञानात निघून जाते. पैसा मिळतो पण भगवंत हातातून निसटून जातो. आचार्य रजनीश म्हणतात — जो जीना नहीं चाहता वह प्रचारक बन जाता है। लोग गीताके पंडित बन जाते है और कृष्णसे वंचित रह जाते है॥

ज्याच्याकडे अनधिकारी माणसाला पैसे फेकून ग्रंथ

© www.madhavveeraghuveer.com

मिळवता येतात. सादरीकरणाची कला असेल तर लोकांवर मोहिनी टाकता येते. त्यातून समाजाची अवनती होते. एक जुने भजन आहे.

रामचंद्र कह गये सिया से ऐसा कलयुग आयेगा।।
हंस चुनेगा दाना-धुंगा कौआ मोती खायेगा।।

खरे संत अप्रकाशित रहातात आणि बाजारी संत मिरवत रहातात. धार्मिक गुरु आणि गुन्हेगार यांच्या सीमारेषा अस्पष्ट असतात. माणसाने स्वतःला तपासत रहावे. लोकांच्या खोट्या स्तुतीने स्वतःला मोठे समजण्यापेक्षा आत्मपरीक्षणाने स्वतःचा खरा चेहरा समजावून घ्यावा. अटलबिहारी वाजपेयी यांच्या एका कवितेचा आशय असा-

त्यादिवशी लोकसभेत माझे भाषण खूप गाजले. खूप टाळ्या पडल्या. लोकसभेनंतर अनेकांनी माझी पाठ थोपटली. रात्री झोपताना माझे मन मला सांगत होते की आज तू लोकांना फसवण्यात तर यशस्वी झालास.

थोडे बरे बोलता आले, काही पाठांतर असले, संतवचनांचे पुरावे एकामागोमाग एक दिले की सामान्यजन आकृष्ट होतात, वाहवा मिळते, लौकिक वाढतो, प्रवचनांची आमंत्रणे मिळतात. लोक भजनी लागतात. मानसन्मान मिळतो. महती वाढते. हा सर्व व्यवहार घडतो. परंतु पारमार्थिकदृष्ट्या काहीच पदरात पडत नाही. उलट हानि होते. कारण अहंकार पुष्ट होत जातो. आणि साधेपणा व सरळपणाचा लोप होतो. सौजन्य हरपते. उर्मटपणा वाढतो

चारी वेद मुखोद्गत असलेल्या अहंकारी ब्राह्मणापेक्षा केवळ एक गायत्री मंत्र येत असलेला सदाचारी ब्राह्मण श्रेष्ठ आहे असे मनूने म्हटले आहे.

सत्य असत्याशी मन केले ग्वाही
मानियेले नाही जनमता।।

तुटे वाद संवाद तेथे करावा।
विवेके अहंभाव हा पालटावा।
जनी बोलण्यासारखे आचरावे।
क्रियापालटे भक्तिपंथे चि जावे॥११५॥

अर्थ - ज्या ठिकाणी तत्वनिर्णयाच्या जिज्ञासेने चर्चा चालते तेथे संभाषणात भाग घ्यावा. आत्मानात्मविचाराने आपल्या अहंकाराचे रूपांतर करून टाकावे. आपल्या जीवनामध्ये आचार आणि उच्चार यात संगती असावी. आणि आपल्याला समूळ बदलून टाकणाऱ्या भक्तीमार्गाने भगवंताकडे वाटचाल करावी.

स्पष्टीकरण - भगवंताच्या दर्शनासाठी प्रयत्न करणाऱ्या माणसाचे व्यक्तिमत्व सर्व अंगांनी संपन्न असावे - क्रिया, भावना, बुद्धी! बुद्धीची योग्य वाढ होण्यास सत्संगतीतील संभाषण फार उपयोगी पडते. श्रवणाला परमार्थात प्रथम स्थान आहे.

बुद्धि तयार झाली की तिचा अंमल दोन दिशांनी होतो जे खरे नाही ते ती निश्चयाने बाजूला सारते व जे खरे आहे ते स्वीकारते. आपला अहंकार खरा नाही हे एकदा पटल्यावर त्याचा पिच्छा पुरवून त्याला मृतवत करून टाकते. आचरणामध्ये संपूर्ण बदल घडवून आणते. विवेकशील माणूस जसे बोलतो तसे वागतो. किंबहुना आपल्याला वागता येईल तितकेच तो बोलतो. बोलण्याचालण्यात विसंगती नसते.

बोले तैसा चाले त्याची वंदावी पाउले।

बुद्धीने मार्गदर्शन केलेला माणूस रुक्ष बनण्याची शक्यता असते. तसा होऊ नये यासाठी त्याच्या अंगी भावनेचा ओलावा असावा लागतो. आणि तो भक्तीमार्गाने लाभतो.

भक्तिपंथाने चालत असताना जो सहज क्रियापालट घडतो तो भगवंताला आवडतो. ∴ भगवंताची भक्ती ही ज्ञानाची जननी आहे आणि दुसरीकडे नैतिक आचरणाची जन्मभूमी आहे. अहंभाव क्षीण झाल्याशिवाय आणि संपूर्ण सदाचरणी झाल्याशिवाय भक्ति करताच येत नाही. हे भक्तीचे खरे रहस्य आहे.

बोलण्याचालण्यात एकवाक्यता असावी. प्रवचनात पैशाचा मोह टाकून द्यायला सांगायचा आणि ते प्रवचन करण्यासाठी पैशाची घासाघीस करायची ही केवढी आत्मवंचना!

शब्दज्ञानाचा हा धोका टाळण्यासाठी समर्थ भक्तिमार्गाने जायला सांगतात. भक्तिभावात दास्यभाव महत्त्वाचा आहे. त्यामुळे अभिमान वाढण्याचा धोका कमी असतो. सारे श्रेय भगवंताला द्यायचे असते.

मागील ८ श्लोकांचा उपसंहार या श्लोकात केला आहे. सर्व प्रकरणाचे सार या श्लोकात आहे.

आपले बोलणे आणि आचरण यात मेळ असावा. दुसऱ्याशी वागताना आपण लक्षात ठेवून नीट वागावे. त्यात आत्मौपम्य बुद्धि असावी. मातृवत् परदारेषु परद्रव्येषु लोष्ठवत्।
आत्मवत् सर्वभूतेषु यः पश्यति स पश्यति ॥

असे जो वागतो त्याचेच ज्ञान साक्षात्काराला येते. परमार्थमार्गात कोणत्याही दिशेने प्रगती करून घ्यायची असली तरी क्रियेमध्ये पालट व्हावा लागतो. वर्तन सुधारावे लागते. प्रदर्शनाकडून आत्मदर्शनाकडे जावे लागते.

क्रियेन पालट होऊन, वर्तन सुधारून भक्तिमार्गाला लागावे असे सांगितल्यानंतर भक्तीची थोरवी कळण्यासाठी त्यामार्गाचे आकर्षण उत्पन्न व्हावे म्हणून समर्थ निरनिराळ्या अवतारलीला वर्णन करतात. आणि भक्तांच्या रक्षणासाठी देव कसा तत्पर असतो हे पुढील ३० श्लोकात सांगतात.

© www.madhavveeraghuvee.com

बहु शापिता कष्टला अंबऋषी।
तयाचे स्वये श्रीहरि जन्म सोशी।
दिल्हा क्षीरसिंधू तया उपमानी।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी॥११६॥

<u>अर्थ</u> - अंबरीष राजाला शापामुळे फार कष्ट झाले. त्याच्यासाठी भगवंताने गर्भवास सोसला. भगवंताने उपमन्यूला क्षीरसागर दिला. तात्पर्य देव भक्तांचा कैवारी आहे. तो भक्तांची कधीहि उपेक्षा करत नाही.

<u>स्पष्टीकरण</u> - अंबरीश राजाने कार्तिकी एकादशीचे व्रत केले. व्दादशीच्या दिवशी आलेल्या दुर्वास ऋषींना त्याने जेवायला ठेवून घेतले. दुर्वासांना स्नानसंध्या आटोपून नदीवरुन येण्यास उशीर लागला. तेवढ्यात व्दादशीचा काल संपत आला म्हणून राजाने तीर्थ घेऊन पारणा केली. याचा दुर्वासांना राग आला व जटेतील एका केसाची कृत्या निर्माण करुन त्यांनी राजावर सोडली. पण भगवंताच्या सुदर्शनचक्राने त्या कृत्येला जाळले व ते चक्र दुर्वासांच्या मागे लागले. जेव्हा दुर्वास भगवंताला शरण गेले तेव्हा ते थांबले. अंबरीषाला दुर्वासाच्या शापातून सोडवण्यासाठी भगवंताने आनंदाने जन्म घेतले. भक्तासाठी गर्भवासाचे कष्टदेखील त्याने सोसले.

व्याघ्रपाद ऋषींचा मुलगा उपमन्यू एकदा दुसऱ्या ऋषींच्या आश्रमात खेळायला गेला. तिथे त्याने गाईचे धारोष्ण दूध प्यायले. त्यानंतर आईने पाण्यात पीठ कालवून केलेले दूध त्याला आवडेना. तो रुसून बसला. त्याने मनापासून भगवंताची उपासना केली. भगवंताने प्रसन्न होऊन त्याला क्षीरसागरच बक्षीस दिला. शिवाय त्याला दीर्घायुष्य दिले. पुराणामध्ये उपमन्यु उत्तम शिवभक्त म्हणून प्रसिद्ध आहे.

उपमन्यूने श्रीकृष्णाला शिवसहस्रनामाचा उपदेश केला.

भगवंत उदार आहे. - अगणित हस्ते कमलाकरांने
देता किती घेशील दो करांनी।

© www.madhaveeraghuveer.com

ध्रुव लेकरू बापुडे दैन्यवाणे
कृपा भाकिता दीधली भेटि जेणे।
चिरंजीव तारांगणी प्रेमखाणी।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥११८॥

अर्थ - दीनवाणा बिचारा ध्रुव लहान बालक होता. त्याने भगवंतापाशी करुणेची याचना केली. भगवंताने त्यास दर्शन दिले. इतकेच नव्हे तर त्यास भक्तीने भरून तारांगणामध्ये कायमचे स्थान दिले. तात्पर्य देव भक्तांचा कैवारी आहे. तो भक्तांची उपेक्षा करत नाही.

स्पष्टीकरण - सूर्यवंशामध्ये उत्तानपाद नावाचा थोर राजा होऊन गेला. त्याला सुरुचि आणि सुनीति अशा दोन राण्या होत्या. सुनीतिपासून ध्रुव नावाचा पुत्र झाला होता. एकदा ध्रुवाला वडिलांच्या मांडीवर बसायचे होते पण सुरुचिने त्याला बसू दिले नाही. उलट त्याला हाकलून दिले. लाडक्या राणीच्या आधीन झालेला राजा काही बोलू शकला नाही. ही अगतिकता ध्रुवाला फार बोचली. तेव्हा आईकडे गेल्यावर तिने त्याला भगवंताचा शोध घ्यायला सांगितले. पाच वर्षांचा ध्रुव आईला नमस्कार करून निघाला. पुढे श्रीनारदांच्या उपदेशानुसार मंत्रानुसार त्याने नारायणाची आराधना केली. ॐ नमो भगवते वासुदेवाय। कठोर तपश्चर्या केली. नारायण प्रसन्न झाले. श्यामसुंदर चतुर्भुज अशा रूपात ते त्याच्यापुढे प्रकट झाले. ध्यानमग्न असलेल्या ध्रुवाच्या गालाला श्रीनारायणाने आपल्या दिव्य शंखाचा स्पर्श केला. ध्रुवाने हात जोडले, मस्तक नमविले, पाय धरले. भगवंतांच्या शंखाच्या स्पर्शाने त्याला काव्यस्फूर्ति झाली. त्याच्या जीभेवर जणू काही प्रेमभक्तीने न्हालेली सरस्वती प्रगट झाली.

योऽन्तः प्रविश्य मम वाचमिमां प्रसुप्ताम्।
संजीवयत्यखिलशक्तिधरः स्वधाम्ना।
अन्यांश्च हस्तचरणश्रवणत्वगादीन्।
प्राणान् नमो भगवते पुरुषाय तुभ्यम्॥

भागवतकारांनी संग्रहित केलेली ही ध्रुवस्तुती उदात्त भक्ति-भावाने ओथंबलेली आहे. भगवंताने चरणी लीन झालेल्या ध्रुवाला उचलून धरले. वात्सल्याने त्याचे मुख कुरवाळले.

त्याच्या मस्तकाचे अवघ्राण केले कपाळाचे चुंबन घेतले. आणि मधुरवाणीने त्याला म्हणाले - बाळा, तुला काय हवे ते माग. तुझ्या भक्तीने मी संतुष्ट झालो आहे. मी तुला वर देतो आहे. परंतु ध्रुव यावर म्हणाला - "भगवन् आपण प्रसन्न झालात. मला दर्शन दिले. आपल्या कोमल वरदहस्ताने मला कुरवाळले. याहून मागण्यासारखे काहीच उरले नाही. माझे जीवन कृतार्थ झाले, धन्य झाले. आता मला काहीही नको."

या निष्काम भक्तीने परमात्मा नारायण अधिकच संतुष्ट झाले. ध्रुवाला आवश्यक वाटत नव्हते तरीही सुरुची-सारख्या स्वार्थी अहंकारी लोकांना जाणवावे म्हणून, ध्रुवाची योग्यता म्हणून किंवा ध्रुवाच्या भक्तीच्या ऋणातून थोडे तरी उतराई व्हावे म्हणून देवांनी त्याला समुद्रवलयांकित पृथ्वीचे साम्राज्य आणि नंतर नक्षत्रमंडळातील केंद्रस्थानी असलेल्या सप्तर्षींनीही त्याच्याभोवती प्रदक्षिणा घालावी अशा अढळ ध्रुवपदाचे वरदान दिले.

काहीजण या कथेचा रूपकात्मक अर्थ लावतात. उत्तानपाद म्हणजे परब्रह्मपद. सुरुची म्हणजे प्रेयस तर सुनीति म्हणजे श्रेयस. ध्रुव म्हणजे मोक्ष. मोक्षाला उत्तमपदावर बसायचे असेल तर त्याने प्रेयसाचा त्याग केला पाहिजे आणि श्रेयसाचा स्वीकार केला पाहिजे.

© www.madhaveeraghuveer.com

नकळत संस्कारमात्राद्धि गजेन्द्रस्यापि कर्माणि।
शुनापि परिमुच्यते॥



गजेंद्रू महासंकटी वास पाहे।
तयाकारणे श्रीहरी धावताहे।
उडी घातली जाहला जीवदानी।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी॥१७८॥

अर्थ - गजेंद्रावर जीवावरचे संकट आले. त्याने भगवंताला हाक मारली व तो त्याची वाट पाहू लागला. त्याच्यासाठी भगवंत धावत आले. वेगाने उडी घेतली व त्याचे प्राण वाचवले. तात्पर्य देव भक्तांचा कैवारी आहे.

स्पष्टीकरण - पांड्य देशाचा राजा इंद्रद्युम्न एकदा पूजासाधनेत ध्यानस्थ असताना अगस्ती ऋषी तिथे आले. राजा साधनेत निमग्न असल्याने त्याने ऋषींचे आतिथ्य केले नाही. तेव्हा ऋषी रागावले व त्यांनी राजाला - तू उन्मत्त झाला आहेस तेव्हा तू मदोन्मत्त हत्ती होशील असा शाप दिला. राजाने नंतर प्रार्थना करून ऋषींची क्षमा मागितली तेव्हा ऋषींनी उःशाप दिला की तू काही संकटात सापडून भगवंताचा धावा करशील तेव्हा भगवंत धावून येतील आणि तुझा उद्धार करतील. देवल ऋषींच्या शापामुळे हूहू नावाचा गंधर्व हा मगर झाला होता. त्यालाही उद्धाराचा उःशाप मिळाला होता. एकदा त्रिकूटाचल पर्वतावरील सरोवरात हा गजेंद्र आपल्या परिवारासमवेत क्रीडा करत होता. अनेक हत्ती व हत्तिणी त्याच्या बरोबर होत्या. बराच वेळ ते जलक्रीडा करत होते. आनंद लुटत होते. इतक्यात गजेंद्राचा पाय मगराने पकडला. गजेंद्राने आपला पाय सोडवून घेण्याचा खूप प्रयत्न केला. पण त्याला यश आले नाही.

त्याच्याबरोबर क्रीडा करणारे सर्वजण सरोवरातून बाहेर पडले. त्याला तसेच संकटात सोडून सर्व कळप निघून गेला. आपले म्हणण्यासारखे कोणीही उरले नाही. ज्यांच्या रक्षणासाठी गजेंद्राने यापूर्वी झुंजी दिल्या होत्या ते सर्व त्याला सोडून गेले. गजेंद्र थकला. हताश झाला आणि शेवटी कळवळून त्याने भगवंताचा धावा केला. त्याला भगवंताचे स्वरूप, त्याची नावे काहीच माहीत नव्हते. परंतु पूर्वजन्माच्या संस्काराने या जगताचा कोणी धनी आहे व

© www.madhavvelaguveer.com

दीन अनाथांचा त्राता असणार या कल्पनेने गजेंद्राने त्याही स्थितीत सरोवरात फुललेल्या कमळांपैकी एक कमळ तोडून उपटले आणि भगवदर्पण बुद्धीने ते आकाशामध्ये फेकले आणि अत्यंत आर्ततेने ईश्वराचा धावा सुरु केला. त्यासरशी भगवान विष्णु धावून आले. त्यांनी सुदर्शन चक्र फेकून त्या नक्राला ठार केले. त्याच्या पाशातून गजेंद्राचा पाय निघाला.

हत्ती आणि मगर या दोघांचीही पशुदेहातून मुक्तता झाली. वैकुंठलोकामध्ये भगवंताचा सेवक म्हणून रहाण्याचे भाग्य इंद्रद्युम्नाला लाभले. पद्मपुराणात आणि भागवतात ही कथा सविस्तारपणे आली आहे.

एक रूपक म्हणूनही या कथेकडे पहाता येते.

राजा मूर्तिपूजेत रममाण झाल्यामुळे ऋषींकडे त्याचे दुर्लक्ष झाले. तो जड अशा मूर्तिपूजेत रममाण झाल्याने त्याच्या हातून प्रमाद घडला. आणि म्हणून पुढचा जन्म जड अशा हत्तीचा आला. प्रकृति ही त्रिगुणात्मिका आहे. देह हा त्रिकूटाचलच आहे. त्रिगुण, त्रिदोष, तीन अवस्था या देहाला असतात. मगर हे काळाचे रूप आहे. आपण सर्वजण या काळाच्या तडाख्यात सापडलो आहोत. पण काळापुढे कुणाचे काहीच चालत नाही. बरोबर चालणारे, आप्तस्वकीय कोणीही आपल्या बरोबर येत नाहीत. मृत्युच्या वाटेवर जीव एकटाच असतो. मृत्यु समोर दिसायला लागतो तेव्हा जीव खडबडून जागा होतो. परंतु अंतकाळी मुखात भगवंताचे नाम येणे हे काही भाग्यवंताच्या बाबतीतच घडते. संकटातून मुक्तता हवी असेल तर शाश्वताचा आधार घ्यायला हवा. त्यासाठी अशाश्वताचा आधार घेऊन काही उपयोग नाही. कारण तोच मुळात अस्थिर आहे. या जगाचे उपादान कारण व निमित्त कारण परमात्मसत्ता आहे.

गजेंद्रमोक्षाचे हे आख्यान अनेक कीर्तनकार फार भावतन्मयतेने रंगवतात. ज्ञानेश्वरीमध्ये याचे सुंदर वर्णन आहे.

© www.madhaveeraghuveer.com

अजामेळ पापी तया अंत झाला।
कृपाळूपणे तो जनी मुक्त केला।
अनाथासि आधार हा चक्रपाणी।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी॥११८॥

अर्थ - पापी अजामेळाचा जेव्हा अंतकाळ आला तेव्हा अत्यंत कृपाळूपणे भगवंताने त्याला मुक्त केला. ज्याला कोणाचा आश्रय नसतो त्याला भगवंत आधार देतो. तात्पर्य, देव भक्तांचा कैवारी आहे. तो भक्तांची उपेक्षा करत नाही.

स्पष्टीकरण - नाममहात्म्यासाठी अजामेळाची कथा अनेकदा सांगितली जाते. हा दुर्वर्तनी ब्राह्मण होता. त्याला अनेक व्यसने होती. अनेक स्त्रियांशी त्याचे संबंध होते. विवाहबाह्य संबधातून त्याला काही संतती झाली होती. त्यातील अखेरच्या बालकाचे नाव नारायण होते. नारायणाचे त्या मुलावर जीवापाड प्रेम होते. तो सतत त्याचे चिंतन करी. अंतकाळी आजारपणात कुळतीला घेऊन नारायणाला हाका मारीत असे. देह वतानाही "नारायणा, धाव रे बाबा!" असे म्हणत होता. याला नेण्यासाठी यमदूत आणि त्याला वाचवण्यासाठी विष्णु ते एकाच वेळी आले. विष्णुच्या दूतांनी आपल्या प्रभावाने यमदूतांना परतवून लावले. या घटनेने अजामेळ पूर्ण बदलला. तो सदाचारी झाला. निष्ठेने भगवन्नाम घेऊ लागला पुढे काही वर्षांनी त्याने भगवंताच्या नामातच देह ठेवला.

अजामेळाला पश्चात्ताप झाला. त्याच्या वागण्यात बदल झाला. राहिलेले सगळे आयुष्य त्याने उपासनेमध्ये घालवले ण्न तो मुक्त झाला. त्यामुळे अंतकाळी एकदाच भगवंताचे नाम घेऊन मुक्त होता येईल असा गैरसमज करून घेऊ नये.

झालागी दुष्कृति जरी जाहला। तरी अनुतापतीर्थी न्हाला।
न्हाउनी मजआंतु आला। सर्वभावे॥ ज्ञा. ९.४२०

ही ओवी सावधपणे लक्षात घेतली पाहिजे. अजामेळासारखे वरे परिवर्तन झाले असेल तर देव भक्ताची उपेक्षा करतनाही.

विधीकारणें जाहला मत्स्य वेगी।
धरी कूर्मरूपें धरा पृष्ठिभागी।
जना रक्षणाकारणें नीच योनी।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी॥१२०॥

अर्थ – ब्रह्मदेवासाठी भगवंत चटदिशी मासा बनला. तसेच कासवाचे रूप घेऊन त्याने पाठीवर पृथ्वी सांभाळली. लोकांच्या संरक्षणार्थ त्याने क्षुद्र योनीत जन्म घेतला. तात्पर्य देव भक्तांच्या कैवारी आहे. तो भक्तांची उपेक्षा करत नाही.

स्पष्टीकरण – विश्वाचा प्रलयकाळ आला तेव्हा ब्रह्मदेवाची रात्र सुरु झाली. ब्रह्मदेव झोपी गेला. त्याच्या मुखातून वेद निघत होते. ते हरण करावे या हेतूने हयग्रीव नावाचा दैत्य तेथे गेला. त्याने वेद घेतले व तो पळून जाऊ लागला इतक्यात ब्रह्मदेव जागा झाला. वेद पळवले जात आहेत असे पाहिल्यावर किंकर्तव्यमूढ होऊन त्याने विष्णूची प्रार्थना केली. त्याप्रमाणे तातडीने श्रीविष्णूने मत्स्यावतार धारण करून हयग्रीव दैत्याचा नाश केला व वेद सोडवून आणले. अशी कथा आहे.

समुद्रमंथनाच्या वेळी क्षीरसागर घुसळण्यासाठी देव आणि दैत्यांनी मंदराचल पर्वताची रवी केली होती. पण घुसळताना तो स्थिर राहीना. बुडू लागला. तेव्हा देवांनी प्रार्थना केल्यावरून विष्णूने कासवाचे रूप धारण केले आणि तो पर्वत आपल्या पाठीवर धारण केला. वर आणला.

हिरण्याक्ष आणि इतर दैत्यांचा पृथ्वीला समुद्रात बुडवून टाकण्याचा विचार होता. अशा संकटप्रसंगी ब्रह्मदेवाच्या नाकातून एक प्रचंड वराह उत्पन्न झाला. त्याने हिरण्याक्षाचा वध केला आणि आपण विराटस्वरूप होऊन पृथ्वीला वर काढले. हा वराहावतार आहे.

संतसज्जनांच्या रक्षणासाठी भगवंताने मत्स्य, वराह, कूर्म अशा क्षुद्र योनीमध्ये देखील प्रवेश करून त्यांना सांभाळले. जगतकल्याणासाठी परमेश्वर अगदी तत्पर असतो.

क्षितिरति विपुलतरे तव तिष्ठति पृष्ठे
धरणिधरणकिण चक्र गरिष्ठे
केशव धृतकच्छपरूप, जय जगदीश हरे॥ जयदेव अष्टपदी

© www.madhaveeraghuveer.com

महाभक्त प्रल्हाद हा कष्टविला।
म्हणोनी तयाकारणे सिंह झाला।
न ये ज्वाळ वीशाळ सन्नीध कोण्ही।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी॥१२१॥

अर्थ - प्रल्हाद मोठा भक्त होता. त्याचा जेव्हा छळ झाला, तेव्हा त्याच्यासाठी भगवंत नरसिंह झाले. त्याच्या अंगातून प्रचंड ज्वाळा निघत होत्या. म्हणून त्याच्याजवळ कोणी गेले नाही. तात्पर्य देव भक्तांचा कैवारी आहे.

स्पष्टीकरण - हिरण्यकश्यपु या दैत्याने मोठी तपश्चर्या करून वर प्राप्त करून घेतला होता. तो उद्दाम झाला होता. त्याचा पुत्र प्रल्हाद! त्याला जितकी भगवंताची आवड होती तितकी हिरण्यकश्यपुला नावड होती. प्रल्हाद जितका निरहंकारी तितकाच हिरण्यकशिपु अहंकारी, लोभी, भोगी, विलासी होता. अगदी बाळपणापासून प्रल्हादाला नामस्मरणाचा छंद लागला होता. मुलाच्या डोक्यातील हे वेड जावे म्हणून हिरण्यकशिपुने त्याचा फार छळ केला. भक्ताच्या कष्टाची सीमा झाल्यावर भगवंत नरसिंहाच्या रूपाने प्रगटला आणि त्याने दैत्याचा वध केला. भगवंताने हिरण्यकशिपुचा कोथळा बाहेर काढल्यावर देखील त्याचा हात तलवारीकडे गेला. नमस्कार करण्याकडे गेला नाही. अहंकाराचा मद हा असा असतो.

१. भगवंताने गीतेमध्ये आपल्या विभूति सांगताना दैत्यांमध्ये मी प्रल्हाद आहे असे सांगितले. वस्तुतः प्रल्हाद दैत्यकुळात जन्माला आला आहे. प्रतिकूल परिस्थितीतही तो अनन्यभावाने भगवंताची भक्ती करतो. म्हणून त्याला इथे महाभक्त म्हटले आहे.

२. पित्याने प्रल्हादाला इतका त्रास दिला पण तरी कोमेजून न जाता तो भक्ती करत राहिला.

३. भगवंताजवळ वरदान मागताना त्याने फक्त स्वतःची मुक्ती मागितली नाही तर सर्व आर्त जीवांच्या मुक्तीसाठी नरसिंहाजवळ प्रार्थना केली.

४. भगवंताने धारण केलेले नरसिंहाचे रूप एवढे उग्र होते, त्याच्या अंगातून ज्वाळा निघत होत्या. कोणीही त्याच्या

भागवत १३२

© www.madhaveeagnihotri.com

जवळ जायला धजावत नव्हते परंतु भक्त प्रल्हाद मात्र निर्भयतेने व प्रसन्नतेने हात जोडून भगवंताच्या जवळ जातो आणि त्याची स्तुती करतो. भगवंत प्रसन्न होतात. प्रल्हादाचे रक्षण करतात कारण देवाला भक्ताबद्दल अभिमान आहे. प्रल्हाद ज्ञानी भक्त असल्याने त्याला भगवंत सर्वत्र दिसतो. भागवतात तो म्हणतो.

सर्वत्रासि सदासि किं बहु गिरा त्वय्यासि मय्यासि च ।

प्रल्हदाच्या मनात अपार करुणा होती. संसारसुखाच्या मोहात गुरफटून तुला अंतरलेल्या या दीन जनांचाही उध्दार व्हावा अशी माझी इच्छा आहे.

© www.madhaveeraghuveer.com

कृपा भाकिता जाहला वज्रपाणी।
तयाकारणे वामनु चक्रपाणी।
द्विजांकारणे भार्गवे चापपाणी।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी॥१२२॥

अर्थ - इंद्राने करुणा भाकली तेव्हा त्याच्यासाठी भगवंत वामन झाला. द्विजांच्याकरिता तोच भगवंत धनुर्धारी परशुराम झाला. तात्पर्य देव भक्तांचा कैवारी आहे.

स्पष्टीकरण - प्रल्हादाचा नातू आणि विरोचनाचा मुलगा बलि मोठा पराक्रमी निघाला. इंद्रपद प्राप्त व्हावे म्हणून त्याने शंभर यज्ञ करण्याची प्रतिज्ञा केली. त्यापैकी नव्याण्णव यज्ञ पूर्ण झाले. तेव्हा इंद्र अतिशय घाबरला व विष्णूला शरण गेला. विष्णूने अदितीच्या पोटी वामन म्हणून जन्म घेतला. वामनाने बलीला त्रिपाद भूमी दान मागितली. दैत्यगुरु शुक्राचार्य यांनी दान देण्यास विरोध केला. पण उदार मनाच्या बलीने वामनाच्या हातावर उदक सोडले. लगेच वामन विस्तार पावला. एका पावलाने त्याने पृथ्वी व्यापली व दुसऱ्या पावलाने आकाश व्यापले. तिसरे पाऊल त्याने बलीच्या मस्तकावर ठेवले व त्याला पाताळात ढकलले. एखाद्या राक्षसाने इंद्र होणे हे सृष्टी-रक्षणाच्या दृष्टीने हिताचे नव्हते.

बलि हा धार्मिक असला तरी तो निष्काम भक्त नव्हता. यज्ञयागादि धार्मिक कृत्याने सामर्थ्य मिळवावे आणि त्याचा उपयोग सत्ता संपत्ति मिळवण्याकडे करावा असे त्याचे धोरण होते. परंतु तो प्रल्हादाचा नातू होता. बलीस तिसरे पाऊल कुठे ठेवू असे विचारताच त्याने सर्व जाणले आणि आपले मस्तक वाकवून तिथे तिसरा पाय ठेवण्यास सांगितले. विष्णू प्रसन्न झाले व पुढच्या मन्वंतरात तू इंद्र होशील असा वर त्याला दिला. विष्णू स्वत: बलीचे द्वारपाल होऊन राहिले. असेही वर्णन आहे.

आजच्या राज्यकर्त्यांप्रमाणे आपल्या माणसांना संतुष्ट करण्यासाठी अधिकारपदे वाढवण्याचे तंत्र देवांनी वापरले नाही. नाहीतर दोन इंद्र नेमून दोघांनाही संतुष्ट करता आले असते.

© www.madhaveeraghuveer.com

नमो परशुरामाय लोक पीडाऽपहारिणे।
मन भूपाल संहार दीक्षिताय नमो नमः॥

पण ईश्वरी राज्य न्यायाने चालते. तिथे कोणाच्या तरी स्वार्थासाठी घटनेत पालट केला जात नाही. ईश्वराने इंद्राचे रक्षण केले आणि बळीचेही कल्याण केले. कोणत्याही पातळीवरच्या भक्ताची उपेक्षा होत नाही. मग तो भक्त आर्त असो की अर्थार्थी!

परशुराम हा जमदग्नीचा मुलगा. कार्तवीर्य राजाने एकदा जमदग्नीच्या आश्रमातील गाय हरण केली. त्यावेळी परशुराम तिथे नव्हते. परत आल्यावर त्याने कार्तवीर्याशी युद्ध केले व त्यास ठार केले. कार्तवीर्याच्या मुलांनी याचे उट्टे काढण्यासाठी जमदग्नीला एकटे गाठून ठार मारले हा प्रकार पाहून परशुरामाने असा भयंकर पण केला की— "मी साऱ्या क्षत्रियांचा संहार करेन." एकवीस वेळा पृथ्वी निःक्षत्रिय करून त्याने आपला पण सिद्धीला नेला. पुढे दाशरथी रामाने त्याचा गर्व हरण केला. शेवटी कश्यपांच्या सांगण्यावरून परशुराम सागरतीरी गेला व कोकणप्रांतात राहिला.

काहींच्या मते सत्ता संपत्तीने उन्मत्त झालेल्या क्षत्रियांनी शांत तपस्वी, विद्याव्यासंगी ब्राह्मणांवर अनन्वित अत्याचार केले. त्यांच्या पारिपत्यासाठी भगवान विष्णूने जमदग्नीच्या पोटी परशुरामाच्या रूपाने अवतार घेतला व उन्मत्तांचा संहार केला. मात्र अलीकडे दुर्दैवाने या परशुराम-कथेचे विकृतीकरण झाले आहे. कुणी त्याला ब्राह्मण/क्षत्रिय असे जातीयवादाचे रूप दिले तर कोणी परशुरामाच्या कथेचे राक्षसीवृत्तीने घेतलेला आंधळा सूड असे मूल्यमापन केले. या दोन्ही प्रकारचे वर्णन ही विकृती आहे.

यात जर ब्राह्मणांचा अहंकार असता तर क्षत्रिय रामाने ब्राह्मण परशुरामाला पराभव केल्याचे वर्णन परंपरेत सन्मान पावले नसते. परशुरामाच्या कृत्याला सूडाचा प्रवास म्हणणे हे अविवेकाचे आहे. राष्ट्रीय पातळीवर सोशिकपणा हा दुर्गुण आहे. अन्यायाचा प्रतिकार आपल्या सर्व शक्तिनिशी उग्रपणाने केला पाहिजे. समर्थांसारख्या राष्ट्रीय विचाराने भारलेल्या, समाजकल्याणाची तळमळ असलेल्या, निःस्पृह महापुरुषाला, सतत शस्त्र उगारून उभा असलेला परशुराम आदरणीय वाटतो.

©www.madhaveeraghulee.com

Date 30-11-2013
Page 209

अहिल्ये सतीलागि आरण्य पंथे।
कुढावा पुढे देव बंदी तयाते।
बळे सोडिता घाव घाली निशाणी।
नुपेक्षी कदा देव दासाभिमानी॥१२३॥

अर्थ - अरण्यातून जात असताना वाटेवर साध्वी अहल्येचा श्रीरामाने उद्धार केला. नंतर रावणाने बंधनात टाकलेल्या देवांना त्याने सोडविले. त्यासाठी त्याला युद्ध करुन आपले सामर्थ्य वापरावे लागले. तात्पर्य देव भक्तांचा कैवारी आहे.

स्पष्टीकरण - गौतममुनींची पत्नी अहल्या फार मोठी साध्वी होती. इंद्राने कपटवेष धारण करुन तिला भ्रष्ट केले. पतिच्या शापाने ती अरण्यामध्ये शिळा होऊन पडली होती. श्रीराम आणि लक्ष्मण विश्वामित्र मुनींच्या बरोबर सीतास्वयंवरासाठी मिथिलेला चालले होते. वाटेत विश्वामित्रांच्या सांगण्यावरुन श्रीरामाने त्या शिळेला पायाने स्पर्श केला. भगवंताच्या चरणाचा स्पर्श होताच अहल्या पूर्ववत झाली आणि मोकळी झाली.

रावण काही सामान्य नव्हता. मोठी तपश्चर्या करुन त्याने अनेक शक्ती प्राप्त करुन घेतल्या होत्या. त्या जोरावर त्याने अनेक देवतांना बंदिवान केले होते. श्रीरामाने युद्ध पुकारुन निशाणी घाव घालून आपल्या सामर्थ्याच्या जोरावर रावणाचा नाश केला आणि देवांना मुक्त केले.

ईश्वराच्या 'भक्तसंरक्षक' या ब्रीदाचा सर्व इतिहास पुराणातून डंका वाजतो आहे. हे जाणून माणसाने तो आपली उपेक्षा करणार नाही या भरवशाने भक्तिमार्गाला लागावे.

केवळ रामावताराचेच नव्हे तर परमात्म्याचेच भक्तांची उपेक्षा न करण्याचे ब्रीद आहे असे समर्थांना सांगावयाचे असल्यामुळे या प्रकरणात राम हे विशिष्टवाचक नाम टाळून त्यांनी देव हे सर्वसाधारण ईश्वरवाचक नाव स्वीकारले आहे.

© www.madhaveeradhuvaer.com

classmate
Date
Page

तये द्रुपदीकारणे लागवेगे।
त्वरे धावतु सर्व सांडुनी मागे।
कळीलागि जाला असे बोध्य मौनी।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी॥१२४॥

अर्थ - त्या द्रौपदीने हाक मारली तेव्हा भगवान श्रीकृष्णाने आपले सर्व सोडले आणि तातडीने चटदिशी तो तिच्या-साठी धावून आला. या कलियुगामध्ये भगवंताने काही काळ मौनव्रत घेतले आहे. देव भक्तांची कधीहि उपेक्षा करत नाहि.

स्पष्टीकरण - धर्मराज द्यूतामध्ये हरला आणि दुःशासनाने द्रौपदीला भरसभेत आणले. प्रथम तिला वाटले की आपले पाच पती आपले रक्षण करतील परंतु त्या सर्वांनी खाली माना घातल्या. तेव्हा तिने जगाची आस सोडली व आर्ततेने भगवंताला हाक मारली. ती हाक ऐकताच श्रीकृष्णाने सगळे मागे टाकले आणि कौरवसभा गाठली. तिथे जाऊन त्याने द्रौपदीची लाज राखली.

मोहाला बळी पडून युधिष्ठिर सद्यूतात सर्वस्व हरला. वैभव, राज्य गेले. भावांना व स्वतःलाहि त्याने पणाला लावले. पांडव कौरवांचे दास झाले. द्यूताचा अभिनिवेश युधिष्ठिराच्या डोक्यात चढला. शकुनीने खिजवल्यामुळे त्याने द्रौपदीला पणाला लावले. तो पुन्हा हरला. दुर्योधनाचा उन्मत्तपणा शिगेला पोहोचला. कुत्सित भाषण करून कर्णाने अधमपणाने त्यात भर घातली. रजस्वला एकवस्त्रा द्रौपदीला फरफटत सभेत आणले. स्वसंरक्षणासाठी द्रौपदीने बुद्धिवाद केला पण त्या तेजस्विनीचे चातुर्य निष्फळ ठरले. भीष्म द्रोण उत्तर देऊ शकले नाहीत. विदुर व विकर्णाचे भाषण अरण्यरुदन ठरले. दुःशासनाने तिच्या वस्त्राला हात घातला तेव्हा खाटकाच्या सुऱ्याखाली गाय हंबरावी तशी द्रौपदी हंबरली तिने कृष्णाचा धावा केला. भगवान धावत आले त्यांनी जणू वस्त्रावतार धारण केला.

आता कलियुग असल्याने ईश्वर बौद्धावतार धारण करून मौन धरून बसला आहे. कलियुगामध्ये दांभिकपणा वाढला। निष्ठा उणावली म्हणून उत्कटता उरली नाही म्हणून तो मौन धरून बसला आहे असे काहींना वाटते. परंतु वस्तुतः तसे नाही. भक्तांचा ईश्वर आहे तसाच आहे. पालिता गोपसुंदर्यः स कृष्णो नवापि न गतः।

© www.madhaveeragiuveer.com

अनाथा दीनाकारणे जन्मताहे।
कलकी पुढे देव होणार आहे।
जया वर्णिता सीणली वेदवाणी।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी॥

अर्थ – हे दहा अवतार प्रसिद्ध असले तरी परमेश्वर दीन अनाथांच्या रक्षणासाठी अवतार घेताच. आजपर्यंत नऊ अवतार झाले आहेत. कल्की / कलकी हा अवतार झालेला नाही परंतु कलियुगाच्या अखेरीस तो होणार आहे असे मानले जाते. जेव्हा अनाचाराची परिसीमा होईल, तेव्हा या आर्य संस्कृतीच्या, वैदिक आचरणाच्या विरोधी वर्तन्य करणारे अत्याचारी म्लेंच्छ नाश पावतील. दुर्जनांचे निर्दालन करणे व सज्जनांचे रक्षण करणे हे भगवंताचे ब्रीद ते निश्चितपणे राखतील. खर तर वेदविहित आचरण हे आदर्श जीवनशैलीचे गमक आहे त्यात स्वैराचाराला, उच्छृंखलतेला स्थान नाही. सर्व भोग घ्यावेत पण शास्त्राच्या चौकटीत राहून! असे वेदाचे प्रतिपादन आहे. त्याप्रमाणे आचरण असेल तर जगात शांतता, सुव्यवस्था नांदेल. परंतु आज परिस्थिती मात्र विपरीत आहे.

बाईट नितुके इथे पोसले।
भलेपणाचे राज्य नासले।

परंतु वेदवाणी देखील जिथे शीणली, निष्प्रभ झाली आहे त्या परब्रह्मस्वरूप भगवंताचे वर्णन कोण करू शकणार? भगवंताचे उज्ज्वल चरित्र, षड्ऐश्वर्यगुणांचे वर्णन करणे व्यासासारख्या अलौकिक प्रतिभेच्या महापुरुषाला देखील शक्य झाले नाही. वेदानाही ते साधले नाही.

तेव्हा श्रुति-स्मृति, सद्ग्रंथ, संत महात्मे यांनी जो बोध केला आहे, त्यावर विश्वास ठेवावा, त्या भक्तिमार्गाने जावे. भगवंत कोणत्याही भक्ताची उपेक्षा करणार नाही. हे संतवचन नीट ध्यानात ठेवावे.

जनांकारणे देव लीळावतारी।
बहुतां परी आदरे वेषधारी।
तया नेणती ते जन पापरूपी।
दुरात्मे महा नष्ट चांडाळ पापी॥३२॥ श्रीराम॥

अर्थ - भक्तांच्या साठी भगवंत सहज देह धारण करून पृथ्वीवर प्रगट होतो. मोठ्या प्रेमाने तो नाना प्रकारच्या देहात वेष घेतो. अशा त्या भगवंताला जे ओळखत नाहीत ते बुध्दीहीन, वाईट, सद्‌भाव नसणारे व पापमय समजावे.

स्पष्टीकरण - भगवंत भक्ताची उपेक्षा करत नाही याचे वर्णन मागील काही श्लोकात करून झाल्यावर या श्लोकात समर्थ भक्तजीवनातील एक महत्त्वाचा अनुभव सांगतात. समर्थांच्या म्हणण्यानुसार भगवंत लोककल्याणार्थ जन्माला येतात. भक्ताची काळजी वाहणे हे व्यसन भगवंताला लागते म्हणून तो पुन्हापुन्हा येत रहातो. करुणेपोटी भगवंत येत रहातो ही त्याची लीला आहे. समर्थ म्हणतात -

राघवाचा वर। पावलो सत्वर।
जनाच्या उद्धार। करावया॥

तर तुकाराम महाराज म्हणतात -

बुडती हे जन। न देखवे डोळा।
म्हणोनि कळवळा। येतो आम्हा॥

भगवंत लीलावतारी आहेत म्हणजे त्यांचे येणे जाणे हे त्यांच्या स्वाधीन आहे. कुठे अवतार घ्यायचा, कसा जन्म घ्यायचा हे भगवंत ठरवतात. या बाबतीत सामान्य मनुष्य अगतिक असतो. अनेकदा भक्तासाठी वेडा होऊन भक्ताला पाहण्यासाठी भगवंत येतात.

कोणते रूप धारण करावे याची भगवंताला मुळीच अडचण नाही. कधी नामदेवांसाठी तो कुत्रा होऊन भाकरी पळवतो तर कधी गाढवाच्या रूपात नाथांची परीक्षा घेतो. कधी मोलकरीण होऊन जनाबाईची लुगडी धुतो दळण - कांडण करतो तर कधी श्रीखंड्या होऊन पैठणमध्ये पाणी भरतो. अनंत रूपे अनंत वेष देखिले मी त्यासी॥ असे ज्ञानदेव त्याचे वर्णन करतात.

भगवंत जर माणसासाठी येत असेल तर माणसाने त्याला ओळखायला हवे. नाही का? पण मनुष्य इतका कृतघ्न आहे की त्याच्या कल्याणासाठी असलेल्या भगवंताला तो ओळखत नाही. उलट त्याला तुच्छ समजतो, त्याचा द्वेष करतो. अशा माणसांना समर्थ दुष्ट, चांडाळ, नष्ट आणि पापी असे अपशब्द वापरतात. मला हे विशेषण या चारही शब्दांना लावता येईल.

समर्थांची भाषा रोखठोक आहे. समर्थ संतापण्याचे कारण इथे असे आहे की अशी कृतघ्न माणसे नवोदित साधकांचा बुद्धिभेद करतात. किंवा सामान्य जनांची अध्यात्मिक घडी विस्कळित करतात. ज्यांना भक्ती करायची नसेल त्यांनी नाही केली तरी चालेल पण काही अभक्त समाजात नास्तिकतेचा प्रचार करतात म्हणून समर्थ कठोर शब्दात त्यांची हजेरी घेतात. हे लोक भगवंताला जाणत नाहीत म्हणून पापी आहेत असे नाही तर ते पापी आहेत म्हणून भगवंताला जाणू शकत नाहीत. त्यांचे पापच भगवंताला जाणण्याच्या आड येते. दुर्योधन शेवटपर्यंत श्रीकृष्णाला गवळ्याचे पोर म्हणून हिणवतो. त्याचे खरे रुप त्याला शेवटपर्यंत समजत नाही. अवजानन्ति----

परमेश्वर सर्वार्थाने पूर्णकाम आहे. तरी त्याला अनन्य ज्ञानी भक्तांची ओढ आहे. त्याला कोणत्याही रुपाने प्रगट होण्याची आणि भक्तासाठी कोणतेही काम करण्यासाठी त्याला हौस असते. गोपाळनाथांची परीक्षा पहाण्यासाठी तो वाघाच्या रुपात, दामाजी साठी महार होऊन, संत सखूसाठी तिच्या सासरी सखूच्या रुपात नांदला. आई मुलासाठी कष्ट करते तरी शिणत नाही. तेच वात्सल्य भगवंताच्याही हृदयात आहे. ईश्वराची अनेक रुपे आहेत. त्यासाठी त्याचा प्रिय भक्त व्हायला हवे.

पण हे सर्व सामान्य जनांना समजत नाही. समर्थांसारखे संत रागावतात, कळकळतात, शिव्या घालतात. सामान्य माणूस हा भोळाभाबडा असतो त्यात तर्कटी, अश्रद्ध लोक त्यांची दिशाभूल करतात. ते ढोंगी, स्वैराचाराचे, अनाचाराचे एक फसवे तत्वज्ञान उभे करतात. आणि सामान्यांना भुरळ पाडून विनाशाच्या मार्गाला नेतात. गीता अ. १६ अशा आसुरी संपत्तीच्या लोकांचे वर्णन करते.

© www.madhaveeragniveer.com

classmate
Date 1.12.2013
Page

जगी धन्य तो रामसुखे निवाला।
कथा ऐकता सर्व तल्लीन झाला।
देहेभावना रामबोधे उडाली।
मनोवासना रामरूपी बुडाली॥१२६॥ श्रीराम॥

अर्थ - भगवंताच्या दिव्य गोष्टी ऐकता ऐकता जो त्याच्याशी तादात्म्य पावतो आणि भगवंताच्या दिव्य आनंदाने जो समाधान पावतो तो या जगात खरोखर धन्य होय. भगवंताच्या ज्ञानप्रकाशाने मी देह आहे ही त्याची भावना नाहिशी होते आणि त्याच्या अंतर्यामातील साऱ्या वासना भगवंताच्या स्वरूपात विलीन होऊन जातात.

स्पष्टीकरण - माणसाच्या सुखाला काहीतरी आलंबन लागते. ज्या वस्तू किंवा व्यक्तीपासून हे सुख मिळेल असे वाटते तिच्या चिंतनात माणूस रमतो. भगवंतापासून मिळणारे सुख चिरंतन आहे. म्हणून भगवंताला आपल्या सुखाचे, चिंतनाचे आलंबन करावे. भगवंत आनंदस्वरूप असल्याने त्याच्या चिंतनात जो तल्लीन होतो तो आपोआप समाधान पावतो. त्याचे जीवन धन्य होते.

भगवंत चिन्मय आहे. त्याच्या चिंतनाने अज्ञान दूर होते. 'मी देह आहे' ही भावना म्हणजे अज्ञान। भगवंताच्या अनुसंधानाने देहबुद्धी गळून पडते.

अज्ञानामुळे माणसाला मी अपूर्ण आहे असे वाटते. आपली अपूर्णता घालवण्यासाठी माणूस अमुक हवे किंवा अमुक नको असे मागत रहातो. या वृत्तीला वासना म्हणतात. भगवंत पूर्णरूप व सत्स्वरूप आहे. अपूर्णाने पूर्ण हवे असे म्हटले की पूर्ण त्या अपूर्णाला आपल्यात सामावून घेते. अपूर्ण अपूर्ण रहात नाही. त्याची वासना शिल्लक रहात नाही. भगवंताच्या चरणी मनाला गुंतवले तर ते तन्मय होते.

सामान्य माणसाची धन्यतेची कल्पना आणि संतांची धन्यतेची कल्पना यात मूलभूत फरक आहे.

भाग्यवंत म्हणो तया। शरण गेले पंढरीराया।

असे तुकाराम महाराज म्हणतात. तर समर्थांच्या दृष्टीने

अंतरापासोनी वैराग्य। तेचि जाणावे महद्भाग्य।

तर शंकराचार्यांनी धन्याष्टकम् नावाचे स्वतंत्र प्रकरणच लिहिले आहे. जो आत्मरंगी रंगेल तोच धन्य!

वेदान्तवाक्येषु सदा रमन्तः। देहादिभावं परिवर्जयन्तः।
आत्मानमात्मनि अवलोकयन्तः। कौपीनवन्तः खलु भाग्यवन्तः।

बाह्य गोष्टींवर भाग्य किंवा धन्यता अवलंबून नसतेच. मनातील सर्व वासना रामरूपात विसर्जित व्हायला. सर्व इंद्रियांना रामाचा ध्यास लागावा. एकदा अशी गोडी लागली की भक्त भगवंतरूप होऊन जातो. आणि मी रामरूप आहे असा बोध झाला की मग देहबोध शिल्लक रहात नाही. दृश्य जगातील सुखकारक वाटणाऱ्या सर्व गोष्टी अंतिमतः दुःखपर्यवसायी आहेत. मात्र मन रामस्वरूप झाल्यावर निर्विचार स्थिती प्राप्त होते. विषयचिंतनाची जागा ईशचिंतन घेते.

शरीरं सुरूपं तथा वा कलत्रम्
यशश्चारुचित्रं धनं मेरुतुल्यम्।

या सर्व गोष्टी जीवन धन्य होण्यासाठी पुरेशा नाहीत. आपल्या हितासाठी जे सदैव जागरूक असतात असे साधक धन्य आहेत.

देहाच्या पलीकडे मी ला अस्तित्व आहे हे समजले तरच देहभाव कमी होईल. मृत्युने केवळ देह जातो. देहभावना जात नाही. ती तशीच रहाते आणि म्हणूनच जन्ममरणाचे फेरे मागे लागतात. संसारातून मुक्त होता येत नाही. मनामध्ये जर ईश्वराचेच प्रेम निर्माण झाले तर देहाविषयीची अहंता कमी होते. पुनःपुनः श्रवणाने तल्लीनता प्राप्त होऊ शकते. देहाचे बंध शिथिल होऊ शकतात.

मात्र हे श्रवण किंवा देवधर्माच्या गोष्टी वरवरच्या, तात्पुरत्या असल्या तर त्याला उत्कटतेचा स्पर्श होत नाही. आणि त्या धन्यतेला पात्र होत नाहीत. चित्तवृत्ती ईश्वरचरणी तल्लीन होईल तरच धन्य म्हणता येईल.

© www.madhaveeraghuveer.com

Date 2.12.13

मना वासना वासुदेवी वसो दे।
मना कामना कामसंगी नसो दे।
मना कल्पना वाउगी ते न कीजे।
मना सज्जना ~~सध्या~~ सज्जनी वस्ति कीजे॥१२८॥श्री

<u>अर्थ</u>- सज्जना मना! आपल्याला भगवंत हवा अशी वासना ठेवायला हरकत नाही. पण कामवासना तृप्त करण्याची वासना ठेवू नकोस. त्याचप्रमाणे वासनातृप्तीच्या नादी लागून भरमसाट कल्पना करू नकोस. हे सारे साधण्यास संतांचा सहवास कर.

<u>स्पष्टीकरण</u> - जोपर्यंत आपण अविद्येच्या अंमलाखाली वावरत असतो तोपर्यंत आपल्या मनात वासना येणारच. वासना जर येणारच असेल तर ती भगवंताबद्दलची असावी. काट्यानेच काटा काढावा त्याप्रमाणे भगवंताबद्दलच्या वासनेने इतर साऱ्या वासना निर्मूल कराव्यात. या प्रक्रियेमध्ये भक्तिमार्गाचे मर्म सापडते.

कोणतीही वासना तृप्त करण्यासाठी कर्म करावे लागते आणि कर्म करायचे म्हटले की जगाशी संबंध येतो. जगाचा उपयोग करून आपली वासना कशी तृप्त करून घ्यावी यासाठी माणूस कल्पना करत सुटतो. त्यामुळे त्याच्या मनाला स्वस्थता मिळत नाही.

हे सर्व टाळण्याकरता माणसाने संतसमागम करावा. आपली वासना भगवंताला निवेदन करावी. आणि मग मनाने स्वस्थ व्हावे.

संतांच्या सहवासात वासनेचा त्याग करण्यासाठी संघर्ष करावा लागत नाही. संत आपला आत्मविश्वास वाढवतात. त्यामुळे पारमार्थिक वाटचाल सुकर होते. लहान मुलाला जसा आईचा आधार तसा साधकांना संतांचा आधार असतो. कर्ता बदलला की कर्म बदलते. संतांच्या संगतीत कर्त्याचे रूपांतरण होते. कर्ता पवित्र झाला की आपोआप कर्मे पवित्र होऊ लागतात. कल्पना वासना व कामना यांना चांगले वळण लागते. येथे

समर्थ 'व'चा अनुप्रास साधण्यासाठी राघवाऐवजी वासुदेव हा शब्द वापरतात. कारण त्यांच्या मनात राम आणि कृष्ण हे द्वैत नाही.
असे एका अभंगात ते म्हणतात.

समर्थांनी या श्लोकात वासनांना परमार्थामध्ये कसे बुडवावे याचे साधन प्रत्यक्षपणे सांगितले आहे. पर्यायाने सांगितलेले, लक्षणेने सांगितलेले, ध्वन्यर्थाने सुचवलेले सगळ्यांच्या लक्षात येतेच असे नाही. सर्व वेळी ते उपयोगी पडेल असेही नाही. म्हणून येथे समर्थ स्पष्टपणे आदेश देतात.

समर्थ स्वतः रामोपासक आहेत. परंतु सांप्रदायिक दुराग्रह त्यांच्या ठायी नाही. सामान्यांसाठी कृष्णचरित्र अधिक आकर्षक आहे. त्याच्याविषयी चटकन जिव्हाळा वाटतो. म्हणून इथे वासना ठेवायची असेल तर ती कृष्णाविषयी असावी असे समर्थ स्पष्टपणे सांगतात.

काय करावे हे सांगितल्यावर काय करू नये ते सांगितले तरच आदेशाला पूर्णता येते. म्हणून पुढे सांगतात. माणसाच्या हवे-नकोपणाला आसक्तीचे, विषय लोलुपतेचे स्वरूप येऊ नये. सर्वच हवे नकोपणे ही फार कठीण गोष्ट आहे. देह आहे तोपर्यंत भूक लागणारच. पण भूक योग्य ते अन्न मागते. भाजी भाकरी मिळाली तरी शांत होते. चिवडा-लाडू, भजी मागणे ही खरी भूक नाही.

यासाठी वासना कामना कल्पनांना चांगले वळण लागणे आवश्यक आहे. नैसर्गिक प्रेरणा जेव्हा सुसंस्कार घेतात तेव्हा माणसाच्या उन्नतीचा मार्ग मोकळा होतो. त्यासाठी हे मना! तू सज्जन हो आणि सज्जनांच्या संगतीत रहा. म्हणजे चांगले संस्कार होतील आणि सुधारशील. संतांच्या संगतीचा लाभ व्हावा यासाठी मनाला सज्जनतेचा स्पर्श असलाच पाहिजे.

सुंदर स्वच्छ, पवित्र मंदिरात भक्तांच्या मनावर चांगला परिणाम होतो. पण खिसेकापूंना त्या पावित्र्याचे काय? त्यांचे लक्ष तिसरीकडेच असते.

classmate
Date 3.12.2013
Page

मतिकारणे संगती सज्जनाची।
मती पालटे सुमती दुर्जनाची।
रतीनायिकेचा पती नष्ट आहे।
म्हणोनी मनातीत होऊनि राहे॥१२८॥ श्रीराम॥

अर्थ - सज्जनांच्या म्हणजे संतांच्या संगतीने दुष्टबुद्धीच्या माणसाची बुद्धि बदलून ती शुद्धबुद्धि होते. म्हणून अखेर उत्तम गती हवी असेल तर संतसहवास करावा. कामवासना जीवनाची नासाडी करते. यासाठी माणसाने मनाच्या ताब्यात राहू नये.

स्पष्टीकरण - संतांच्या दृष्टीने माणसांचे वर्ग दोन-एक शुद्धबुद्धी आणि दुसरा दुष्टबुद्धी। माणसाची सुधारणा करण्यास त्याच्या बुद्धीमध्ये फरक करावा लागतो. ती मुळापासून पालटण्यासाठी संतसहवास करावा. बुद्धी शुद्ध झाली की विचार शुद्ध होतात. माणूस आतून शुद्ध होतो. आणि त्याला उत्तम गती प्राप्त होते.

~~संगती~~ चांगली माणसे भ्रष्ट कशामुळे होतात? तर पैसा, कामवासना यामुळे. माणूस आपले सगळे शहाणपण विसरतो, आणि कांचन व कामिनीच्या ~~बाब~~ बाबतीत लाचार होतो.

याच्यावर नियंत्रण राहण्यासाठी धर्माने नीतिची बंधने घातली आहेत. धर्माच्या नीतिच्या चौकटीत राहून काम वासना भोगायची आहे. कामवासना जिंकण्यासाठी मनाला भगवंताकडे गुंतवून त्याची आनंद भोगण्याची कल्पनाच बदलणे हा उत्तम उपाय आहे. देहातून सुख घेण्याची वृत्ती ~~[illegible]~~ बदलली की आनंद भोगण्याची कल्पना बदलते वृत्तीच्या पलीकडे राहून तिच्याकडे पाहणे याला मनातीत होणे असे म्हणतात.

संतांच्या संगतीत जीवन बदलू शकते. वाल्याचा वाल्मीकी होऊ शकतो. परंतु कधी कधी संतांच्या संगतीत राहून माणसे कोरडी रहातात. कधी कधी स्वतःला त्यांच्या बरोबरीचे समजून उन्मत्तही होतात. संत सहज उपलब्ध झाले की त्यांचे महत्व कळत नाही. देहू व आळंदी येथे संतांना त्रास देणारे लोकही पुष्कळ होते.

संतांच्या सतत सहवासात राहून त्यांचे नातेवाईक बदलत नाहीत. असे तुकाराम महाराज म्हणतात. संतांच्या नातलगांना संतांविषयी प्रेमापेक्षा हक्काचा भाव जास्त असतो. सत्संगदेखील मानवावा लागतो. त्यासाठी दृष्टी साधकाची असावी लागते नाहीतर ते संतांनादेखील आपल्यासारखेच सामान्य मानतात अशा परिस्थितीत प्रगती किंवा परिवर्तन होत नाही.

सद्गतीसाठी सत्संगती धरावी. भगवंत आपल्या भक्ताचा किंवा सद्गुरु आपल्या शिष्याचा अंतकाळ सांभाळतात. तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात् । असे भगवंतांचे आश्वासन आहे. संतांच्या संगतीत माणसाच्या बुद्धीत पालट होतो. सद्बुद्धी होणे हीच संतांची कृपा आहे.

मन विषयाधीन असते आणि शरीर सुखासीन असते. कुसंगतीत बुद्धिभेद होतो आणि वाईटाचे समर्थन करण्याची वृत्ती दृढ होते. निंद्य गोष्टींना मान्यता मिळते. Glorification.
कर्ण, दुर्योधन, दुःशासन, धृतराष्ट्र या सर्वांना एकमेकांचा कुसंग असल्याने श्रीकृष्णाची कोणतीच गोष्ट त्यांना पटेना.

तिसऱ्या चरणात कामविकाराला रतीनायिकेचा पती म्हटले आहे (मदन) तो भल्याभल्यांना साधनेपासून दूर नेतो. विश्वामित्र - मेनका, रावण, कर्ण दुर्योधन. भारतीय स्वातंत्र्याच्या काळात एक मोठा भारतीय नेता एका इंग्रज स्त्रीच्या आहारी गेला. आणि भारताची फाळणी झाली. या कामाने जर बुद्धि प्रभावित झाली तर स्वैराचाराची तत्त्वज्ञाने निर्माण होतात. हा काम दुष्ट, दुरात्मा, नष्ट, चांडाळ आहे. घातक- फसवा आहे. तो सुखाळाच हित भासवतो.

या कामाच्या तावडीतून सुटण्याचा मार्ग म्हणजे मनाच्या अतीत होऊन राहणे. म्हणजे कोणत्याही वृत्तींचे तरंग उठणार नाहीत अशी स्थिती होणे. या स्थितीत हवे-नको संपते आणि मन पूर्ण निर्विकार होते. मनाचा वापरच थांबतो.

ज्याप्रमाणे वाचताना चष्मा वापरतो. फिरण्यासाठी स्कूटर वापरतो नंतर बाजूला ठेवून देतो. तसा कर्म करण्यासाठी मनाचा वापर करावा. म्हणजे कर्मासाठी आवश्यक ते चिंतन करावे पण कर्म पूर्ण झाल्यावर त्याचा विचार वा परिणामांची काळजी करत बसू नये.

©www.madhaveeraghuveer.com

मना अल्प संकल्प तोही नसावा।
मना सत्य संकल्प चित्ती वसावा।
जनी जल्प वीकल्प तो ही तजावा।
रमाकांत येकांत काळी भजावा॥ १३०॥ श्रीराम॥

<u>अर्थ</u> - मना, जे अपूर्ण व आकुंचित आहे त्याबद्दल निश्चय नसावा. त्याच्या उलट जे पूर्ण व विशाल आहे त्याबद्दल निश्चय मनामध्ये बाळगावा. उगीच बडबड करू नये. संशयाला जागा देऊ नये. एकांतात बसून भगवत्‌चिंतन करावे.

<u>स्पष्टीकरण</u> - उपनिषदांमध्ये ब्रह्मस्वरूपाला सत्य अथवा भूमा म्हटले आहे, तर या दृश्य जगाला असत् अथवा अल्प म्हटले आहे. समर्थ म्हणतात - सच्चिदानंद ईश्वर तेवढा संपूर्ण सत्य असल्याने त्याला आपले मन चिकटवावे, असे केले की मग भगवंताचेच संकल्प उठतील. दृश्य जगाला मन चिकटले तर स्वार्थाचेच संकल्प उठतील. त्याने आपण स्वल्प म्हणजे आकुंचित बनतो. आकुंचितपणामध्ये समाधान मिळणे शक्य नसते.

वायफळ बोलण्याने माणसाची फार मानसिक शक्ती खर्च होते. व्यवहारात बोलल्याशिवाय चालणार नाही. पण गरजेपेक्षा अधिक न बोलण्याने व्यवहार बिघडणार पण नाही. त्याचप्रमाणे विवेकाला धरून असणारा संशय योग्य असतो. परंतु संशयी वृत्तीने निर्माण केलेला संशय मनाच्या स्थिरतेला हानिकारक असतो. म्हणून जल्प व विकल्प टाळावा.

जीवनात कोणतेही मोठे काम पार पाडण्यास एकांतचिंतन आवश्यक आहे.

नरासी येकांत मानिला अवघ्या आधी केले त्याला।
यावेगळे वडीलपणाला ठावची नाही॥

एकांतात मन जितके एकाग्र होऊ शकते तितके ते लोकांनात होऊ शकत नाही. आणि एकाग्रतेशिवाय मनाचे ज्ञानार्जनाचे सामर्थ्य वाढत नाही. या कारणाने थोर माणसे अर्थात साधुसंतदेखील जीवनातील काही काळ तरी एकांतात घालवतात. समर्थांचे सगळेच थोर होते त्यामुळे एवढा लोकसंग्रह करून त्यांनी आपला एकांत कधी सोडला नाही.

इथे अल्पसंकल्प म्हणजे क्षुद्र संकल्प. म्हणजेच इंद्रियसुखाच्या पातळीवरील वासना. अनेकदा परस्परविरोधी संकल्प हे माणसाला दमवतात. म्हणून संकल्पविरहित अवस्था प्राप्त करून घ्यायची आहे. पूर्ण निर्विचार राहणे शक्य नाही. कोणता ना कोणता संकल्प जर चित्तात रहाणारच असेल तर समर्थ सत्यसंकल्पाला परवानगी देतात. अहं ब्रह्मास्मि। सोऽहम् किंवा चिदानन्दरूप: शिवोऽहम् शिवोऽहम्॥ हे सारे सत्यसंकल्पच आहेत. या सत्यसंकल्पाचा दाता भगवंतच आहे. त्यामुळे मी चांगला संकल्प केला असा अभिमानही गळून पडतो.

समर्थ व्यर्थ बडबड आणि संशयी वृत्ती सोडून देऊन एकांतात भजन करायला सांगतात. साधकाने प्रयत्नपूर्वक एकांताचा अभ्यास करावा. त्याने मनाला सूक्ष्मता येते. समर्थ म्हणतात -

शिष्या येकांती बैसावे। स्वरूपी विश्रांतीस जावे।
तेणे गुणे दृढावे। परमार्थ हा॥

Empty mind

मन अगदी रिकामे रहाणे कठीण असेल तर त्याला काही चांगला उद्योग लावून द्यावा. मनाने सत्यसंकल्प करावा. चांगले विचार करावेत, चांगल्या संबंधी विचार करावेत. ईश्वराच्या लीलांचे, संतांच्या चरित्राचे, सदुपदेशाचे चिंतन करावे.

परस्परांमधील अपसमज चारचौघात बोलून दाखवू नये. कारण बोचले असेल तर त्याविषयी प्रत्यक्ष त्या व्यक्तीशीच विचारावे. पण कोणाचीही त्याच्या मागे निंदा करणे टाळावे. मनात नेहमी चांगलेच विचार येण्यासाठी एकांतसेवन करावे. जेव्हा जेव्हा एकांतवास मिळेल तेव्हा ईशस्मरण करावे. मन हे विषयाच्या ओढीने संकल्प विकल्प करत असते. त्या मनाला ईशभजनाच्या खुंटीला टांगून ठेवावे.

एकांतामध्ये एकाग्रता वाढते. इंद्रिये शांत रहातात. स्वाभाविक मनही मोकळे राहू शकते. एकांत जो जो सवयीचा होत जाईल तो तो मनाची एकाग्रता वाढत जाईल. आणि ते भजनात रमू लागेल.

Date 6-12-2013

भजाया जनी पाहतां राम येकु।
करी बाण येकु मुखी शब्द येकु।
क्रिया पाहतां उध्दरे सर्व लोकु।
धरा जानकीनायकाचा विवेकु॥७३॥ श्रीराम॥

अर्थ- खरोखर पाहिले तर भक्ति करण्यास योग्य असा श्रीरामासारखा दुसरा देव जगात नाही. एकबाणी व एकवचनी तर तो प्रसिध्दच आहे. त्याच्या लीलाचरित्राचे नीट अवलोकन केले तर सर्वांचा उध्दार होतो. अशा त्या रामचंद्रांच्या चरित्राचा आदर्श प्रत्येकाने समोर ठेवावा.

स्पष्टीकरण- माणूस ज्याचे अनुकरण करतो तसा बनत जातो. उपासनेमध्ये हाच प्रकार दिसून येतो. उपास्यदेवतेच्या चरित्राचे व गुणसमुच्चयाचे अहोरात्र चिंतन घडल्याने उपासकाच्या आचरणाला आणि व्यक्तिमत्वाला बरोबर तसेच वळण लागते. मानवी जीवनाचा आदर्श म्हणजे श्रीरामचंद्र.

जीवन वरच्या पातळीवर नेण्यासाठी विवेकाची अत्यंत गरज असते. आणि विवेक जागृत होण्यासाठी संत सहवास उपयोगी पडतो. त्याचप्रमाणे भगवंताच्या लीलाचरित्राचा चिंतनशील अभ्यासही उपयोगी पडतो. संतांचा सहवास घडणे स्थलकाल परिस्थितीवर अवलंबून असते. परंतु भगवंताच्या चरित्राचा अभ्यास करणे आपल्या हातात असते. म्हणून तसे करुन आपला उध्दार करुन घ्यावा.

येथे समर्थांनी तीनदा येकु हा शब्द वापरला आहे. तो वापरताना समर्थांच्या मनात कुठलीही सांप्रदायिकता वा कट्टरता नाही. किंवा कडवट एकेश्वरवादही नाही. नाहीतर समर्थांनी हनुमंताची देवीची किंवा गणेशाची मंदिरे उभारलीच नसती. किंवा विविध देवतांच्या आरत्या रचल्या नसत्या. इथे समर्थ तीनदा येकु म्हणतात ते रामचंद्रांच्या एकपणी, एकवचनी आणि एकपत्नी या गुणवैशिष्ट्यांसाठी!

श्रीरामचंद्र एकपत्नी होते. रामचंद्रांनी भगवती सीतेचा त्याग केला म्हणून आक्षेप घेणारी मंडळी हे लक्षात घेत नाही की त्यांनी पुन्हा नंतर दुसरा विवाह केला नाही.

© www.mohanveeragiri.com

त्या काळी राजेलोकांनी अनेक विवाह करण्याची पद्धतही होती. वसिष्ठ मुनींनी तसा सल्लाही दिला होता. महाराज दशरथांचेही तीन विवाह झाले होते. अश्वमेध यज्ञ हा सपत्नीक करायचा असतो. पण प्रभु रामचंद्रांनी आपले एकपत्नीत्वाचे व्रत सोडले नाही. आणि या त्यांच्या एकपत्नीत्वासाठी पहिला येकु आहे.

दुसरा शब्द त्यांच्या (येकु) एकवचनी स्वभावाबद्दल आहे. त्याला समर्थ मुखी शब्द येकु असे म्हणतात. ज्या रघुवंशात श्रीराम जन्मले तिथे शब्द फिरवण्याची परंपरा नाही. एकदा शब्द दिला म्हणजे दिला. गोस्वामी तुलसीदास–

रघुकुल रिति सदा चली आई
प्राण जाई पर बचन ना जाई ॥

शब्दांची फिरवाफिरवी करून रामांना वनवासात जायचे टळता आले असते. किंवा चित्रकूट पर्वतावर रामाला जेव्हा भरत बोलवायला आला तेव्हा लोकाग्रहास्तव राज्याभिषेकही करून घेता आला असता. पण रामांनी पितृवचन पाळले.

एकबाणी म्हणजे धनुष्यावर एकदा बाण लावला म्हणजे नेम लागलाच पाहिजे हे उपलक्षण आहे. यावरून एक गोष्ट साधण्यासाठी जे करावयाचे तेच नेमके आणि योग्य रीतीने केले जाते हा गुण एकबाणी या विशेषणातून सुचवला आहे. त्यातूनच हमखास यशस्वी होणाऱ्या कार्यासाठी आपण 'रामबाण' हा शब्द वापरतो.

फार थोर व्यक्तीचे थोरपण सामान्य मापाने मोजून चालत नाही. राज्यत्याग, शूर्पणखेची विटंबना, सुवर्णमृगाच्या मागे लागणे, सीतेच्या विरहाने शोकाकुल होणे, वालीवध, सीतात्याग इ० प्रसंग रामचंद्रांच्या थोरवीचे अनेकविध पैलू प्रगट करणारेच आहेत. पण हे नीट समजून घेतले पाहिजे म्हणून समर्थ विवेक शब्दाचा उपयोग करतात.

समर्थ अनित्य अशा संसाराचा त्याग करून नित्य-स्वरूप अशा ज्ञाननायकाचा विवेक करायला सांगतात म्हणजे जीवनात रामाचीच निवड करावी. त्याचाच ध्यास घ्यावा. त्याच्या सारखेच वागण्याचा प्रयत्न करावा. राम म्हणजे मूर्तिमंत धर्म.

राम गावा राम घ्यावा । राम जीविचा विसावा ॥

बरी चांगला अंतरी गोड आहे।
तयालागी कोणितरी शोधताहे॥



विचारूनि बोले विवंचूनि चाले।
तयाचेनि संतप्त ते ही निवाले।
बरें शोधिल्यावीण बोलो नको हो।
जनी चालणे शुद्ध नेमस्त राहो॥१३२॥ श्रीराम॥

अर्थ - जो माणूस नेहमी विचार करून बोलतो आणि विवेक वापरून चालतो, त्याच्या सहवासाने संसारात त्रस्त झालेली माणसे मनाने शांत होतात. माणसाने सर्वांगीण विचार केल्याशिवाय बोलू नये. आणि त्याचे वागणे अगदी शुद्ध व शिस्तबद्ध असावे.

स्पष्टीकरण - माणसाचे अंतरंग त्याच्या बोलण्याचालण्यातून प्रगट होते. माणसाच्या आचार उच्चारांना त्याच्या विचारांची पार्श्वभूमी असते. जो माणूस प्रत्येक पाऊल टाकताना नीट विचार करतो, त्याच्या बोलण्याचालण्यात एक मनोहर सुसंगती असते तो स्वतः स्वस्थचित्त असतोच पण त्याच्या सहवासात येणाऱ्या दुःखी माणसांनाही विश्रांती व समाधान लाभते. इतरांना अत्तर लावणारा स्वतःही सुगंधित होतो. ज्याचे बोलणे अत्यंत विवेकशील आणि वागणे शुद्ध, नियमित असते असा माणूस स्वतःही विश्रांतीसुख भोगतोच पण इतरांनाही मनाची स्वस्थता मिळवून देतो.

या श्लोकातून समर्थांचे समर्थपण प्रगट होते. त्यांच्या अनुभव-क्षेत्राची विशालता लक्षात येते. त्यांनी केलेल्या आदेशातील नेमकेपणा पटतो. या श्लोकामध्ये ज्याला भलेपणा मिळवायचा असेल त्याच्या जीवनाचे व्यवस्थापन सांगितले आहे.

जीवन सुखा समाधानाने जावे असे सर्वांनाच वाटते. जीवनामध्ये संताप होण्याचा प्रसंग येऊ नये आणि दुसरा कुणी संतप्त असेल तर त्याला शांत कसे करावे हे जाणून घ्यायचे असेल तर हा श्लोक उत्तम मार्गदर्शन करतो.

'विचारूनि बोले' चे स्पष्टीकरण तिसऱ्या ओळीत व 'विवंचूनि चाले' चे स्पष्टीकरण चौथ्या ओळीत आहे. विचारूनि बोले याचेही दोन अर्थ आहेत. १. विचार करून बोल आणि २. तज्ज्ञांचा किंवा शास्त्राचा विचार घेऊन बोल

जो जनामध्ये वागे । परि जनावेगळी गोष्टी सांगे
ज्याचे अंतरी ज्ञान जागे । तोचि साधु ॥

जेव्हा केव्हा बोलायचे, लिहायचे असेल तेव्हा ते नीटपणे साधक बाधक विचार करून बोला. तज्ज्ञांची मते नीट पारखून, शास्त्रवचने शोधून, थोरांच्या वाक्याचा आधार घेऊन मगच लिहावे किंवा बोलावे. लिहिण्याइतकेच बोलणेही महत्त्वाचे आहे. खरे म्हणजे बोलणे हेच जास्त महत्त्वाचे आहे.

विचार करून आणि विचार धरून बोलले म्हणजे ते सत्याच्या अधिक जवळचे व हितकारक ठरते.

Glorification

रामायण महाभारतावर लिहिलेले आधुनिकांचे लिखाण हे शास्त्राला धरून नाही. त्यातून दुष्ट तर्कांचा, असत्याचाही कित्येकदा पुरस्कार केला जातो. हा लेखकांचा स्वैराचार आहे. हे 'बरे शोधिल्यावीण' असे बोलणे असते. यातून वैयक्तिक आणि सामाजिक जीवनातले अस्वास्थ्य तेवढे वाढत जाते. वातावरण संतप्त होत जाते. काही लोक स्वार्थाने त्यातच आपली पोळी भाजून घेतात - (दादोजी कोंडदेव)

पुढचा मुद्दा 'विवेकूनि चाले' हा आहे. कृती करण्यापूर्वी नेहमी सावध असावे. ज्या गोष्टीचा पश्चात्ताप करावा लागेल असे शक्यतो माणसाच्या हातून घडता कामा नये. जो जो माणसाचे अधिकारपद उंच आणि व्यापक तो तो त्याने सावध रहाण्याची दक्षता अधिकाधिक घेतली पाहिजे.

वाचामुखे

पूर्वी राजांना राजर्षिंचा धाक/दरारा होता. त्यांच्या सल्ल्याने राज्यकारभार केला जायचा. आधुनिक युगात खेड्यांमध्ये पंचमंडळी गावचा कारभार चालवतात. ती सुसंस्कृत/प्रतिष्ठित असावी, असा संकेत आहे.

शुद्ध - नेमस्त - व्रतवैकल्ये, पूजा-पाठ सोवळे ओवळे या सर्व प्रकरणात माणसाने नेमस्तपणा धरावा. मध्यममार्ग आचरावा. मात्र मुळात हे वागणे शुद्ध, सदाचारी, निर्मळ असावे.

अनाचारस्तु मालिन्यं अत्याचारस्तु मूर्खता ।
विचाराचारसंयोगः स सदाचार उच्यते ॥

वर्षानुवर्षे न धुतलेली धावळी/कद हे जसे सोवळे नाही तसेच रस्त्यात हिंडून आलेली पादत्राणे घरात घालणे ही सुधारणा नाही. वर्तनात सात्त्विकतेला प्राधान्य असावे.

© www.madhaveeragiveer.com

मागुतींची ओळखण । एक तयाचे लक्षण।
जो विवई विरक्त पूर्ण । अंतरापासुनि ॥



ज्ञानमार्ग –

हरीभक्त वीरक्त विज्ञानरासी।
जेणे मानसी स्थापिले निश्चयासी॥
तया दर्शने स्पर्शने पुण्य जोडे।
तया भाषणे नष्ट संदेह मोडे॥१३३॥ श्रीराम॥

अर्थ – जो भगवंतावर उत्कट प्रेम करतो वैराग्यसंपन्न असून ज्याने भगवंताचे पुष्कळ अनुभव घेतले आहेत. आणि स्वस्वरूपावर जो निश्चितपणे आरूढ झाला आहे अशा पुरुषाचे दर्शन घेतले असता आणि त्याचा स्पर्श झाला असता आपले पुण्य वाढते. त्याच्या भाषणाने आपल्या मनातील दुष्ट संशय नाश पावतात.

स्पष्टीकरण – संतांचा सहवास केल्याने हमखास परमार्थ साधतो हे समजले पण हे संत असतात तरी कसे? ज्याचे भगवंतावर निःसीम प्रेम आहे तो संत. संत विरक्त असतो. संतांचे मन भगवंतामध्ये गुंतल्याने इतर वस्तूबद्दल तो उदासीन असतो. हीच विरक्ती! संतांपाशी भगवत-अनुभवाच्या राशीच्या राशी असतात. हीच त्यांची श्रीमंती! पण अशा भगवंताच्या अनुभवाच्या ऐश्वर्याने भारावलेला संत आधी भेटणे कठीण. तो भेटला तर त्याच्यावर श्रद्धा बसणे कठीण आणि श्रद्धा बसली तरी त्याचा निकट सहवास घडणे कठीण असते. संतांच्या अंगी विलक्षण मानसिक शक्ती असते. त्यांच्या दर्शनाने, स्पर्शाने आणि भाषणाने आपल्या मनावर तत्काळ परिणाम घडतो. संतांपाशी जे भगवंताविषयी ज्ञान असते तेच ज्ञान सामान्य माणसांनाही असते. पण त्यात एक मूलगामी फरक असतो. भगवंताचे स्वरूप अतींद्रिय आहे आणि आपण मात्र इंद्रियांच्या कक्षेत वावरतो. त्यामुळे आपल्या ज्ञानाला निश्चितपणा नसतो. याच्या उलट संत अंतर्मुख होऊन अतींद्रियाच्या कक्षेत शिरतात. आपण जशी दृश्य वस्तू पहातो. तसे संत अदृश्य आत्मवस्तु साक्षात अनुभवतात. दृश्य वस्तुबद्दल जशी आपण निश्चिती बाळगतो तशी ते आत्मवस्तुबद्दल बाळगतात. संतांचे हे प्रधान लक्षण मानावे.

हरिभक्त हा ज्ञाननिधी असतो. त्याच्याजवळ ज्ञानविज्ञान

तुरेपूर असते. इथे समर्थांनी विज्ञान शब्द वापरला आहे. यात ज्ञान म्हणजे अध्यात्मज्ञान आहेच. गीतेत १३ व्या अध्यायात ज्ञानाची १८ लक्षणे सांगितली आहेत. अमानित्व, अदंभित्व ही सर्व ज्याच्या ठिकाणी असतात तो ज्ञानराशी. परंतु असे झालेले ज्ञान टिकणे कठीण. हे ज्ञानाचे टिकणे अंतःकरणाच्या शुद्धतेवर अवलंबून आहे. यासाठी समर्थांनी हरिभक्त आधी विरक्त आणि नंतर ज्ञानराशी असतो असे म्हटले आहे.

विरक्त किंवा वैराग्य ही अंतःकरणाची स्थिती आहे. जवळच्या संग्रहावरून त्याचे परिमाण ठरवता येणार नाही. एखादा अकिंचन भिकारी कदाचित विरक्त नसेल परंतु ऐश्वर्यसंपन्न असलेला जनक राजा विरक्त होता. अगदी शुकाचार्यांनी सुद्धा ज्याचे शिष्यत्व पत्करावे असा त्याचा अधिकार होता. समर्थांचे समकालीन श्री रंगनाथस्वामी निगडीकर हे सत्पुरुष होते परंतु विरक्त नव्हते. भारी कपडे, अलंकार, उमदा घोडा हे सर्व त्यांच्याजवळ असायचे. त्यामुळे विरक्त हा शब्द वरवरच्या अर्थाने वापरणे उचित होणार नाही. आपली मापे प्रामाणिक असतात असे नाही.

हरिभक्ताचे आणखी एक लक्षण म्हणजे त्याचा निश्चय दृढ असतो. धरसोड, चंचलपणा त्याच्यापाशी नसतो. अशा हरिभक्ताच्या संगतीत माणसाला बरे वाटते. त्याला भेटल्याने, त्याच्या स्पर्शाने मन शांत होते, वृत्तीला प्रसन्नता मिळते. त्याने चार वाक्ये जरी बोलली तरी मनाचा संदेह मावळतो. श्रद्धा बळावते, बुद्धि स्थिरावते.

मात्र यासाठी हरिभक्ताच्या संगतीत जाणाऱ्याचे मन सरळ असले पाहिजे. तो प्रांजळ आणि विनयी असला पाहिजे. अहंकारी असता कामा नये. नाहीतर पाण्यात अखंड भिजूनही सुसरीच्या पाठीला मऊपणा येत नाही. ती तशीच खडबडीत कठोर रहाते, तसे त्याचे होते.

नसे गर्व अंगी सदा वीतरागी।
क्षमा शांति भोगी दयादक्ष योगी।
नसे लोभ ना क्षोभ ना दैन्यवाणा।
इहीं लक्षणीं जाणिजे योगिराणा ॥१३९॥ श्रीराम॥

अर्थ - ज्याच्या अंगी कसलाही अभिमान नाही, जो सर्वदा वैराग्य पालन करतो. जो क्षमाशील व शांत रहातो, जो मनापासून दयावान असतो, ज्याचे ध्यान स्थिर झालेले असते, ज्याला कशाचाही लोभ नसतो, ज्याचे मन कधीही क्षुब्ध होत नाही आणि जो कधीही दीनवाणा असत नाही. हो योगियांच्या राजाची लक्षणे समजावीत.

स्पष्टीकरण - संतांचे संतपण कशात असते? तर त्यांच्या आमूलाग्र बदललेल्या मनाच्या अवस्थेमध्ये असते. अनुसंधानाच्या कलेमध्ये तो पारंगत असतो. अनुसंधान परिपक्व दशेला पोहोचल्याने तो सदासर्वकाळ अखंडपणे भगवंताशी तदाकार रहातो. आणि भगवंताहून क्षणभर देखील मनाने बाजूला न सरणारा भक्तच योगिराज या पदवीला प्राप्त होतो. अशा योगिराजाचे बोलणे-चालणे थोडे लोकविलक्षण असणारच. म्हणून पुढील लक्षणे त्याच्या अंगी प्रकर्षाने आढळतात. त्याच्या अंगी अहंकार उरत नाही. व्यवहारात वागताना तो 'मी' ची भाषा वापरतो. परंतु त्यामागे देहबुद्धीच्या आकुंचितपणाचा व अज्ञानाचा मागमूस सुद्धा नसतो. मनातून तो संपूर्णपणे वैराग्यसंपन्न असतो. त्याच्या सहवासात काही काळ घालवल्यास त्याची संपूर्ण विरक्ती ध्यानात येते. दया, क्षमा आणि शांती हे तीन गुण म्हणजे संतजीवनाचे रमणीय अलंकारच आहेत. त्यातूनच त्यांचा लोकसंग्रह वाढतो. त्यांचे अंतःकरण शुद्ध असल्याने अज्ञानी व पापी माणसांचाही तिथे निभाव लागतो. संत सदा समाधानी असतात. भगवंताने ज्या स्थितीत मला ठेवले आहे तीच उत्तम स्थिती आहे असे ते मानतात. त्यांना कशाचाही लोभ नसतो. भीति नसते, चिंता नसते. त्यामुळे आपोआपच क्षोभ ही नाहीसा होतो. आपला मालक त्रैलोक्यनायक आहे अशा श्रद्धेने तो कधी दीनवाणा नसतो.

देवच कर्ता

गुरुदेव रानडे स्वरूपानंद देवालयी

ज्याचा देह कोणत्याही अवस्थेत असला तरी त्याचा आनंद जसाच्या तसा टिकून असतो.

आपण आपल्या भावाने कोणाकोणाला योगी, सत्पुरुष, महाराज ठरवतो! लोकविलक्षण वेषभूषा, वाढलेल्या दाढीजटा, गंधाचे टिळे, माळांचे वेढे, कीर्तनप्रवचनातील रंगढंग, मोठा वैभवी मठ, हजारोंची जेवणावळ असणारे महोत्सव, मनातले ओळखणे, भूत-भविष्य सांगणे, रोग घालवणे, अद्‌भुत रीतीने कुंकू, प्रसाद, भस्म काढून हातात देणे, संततिसंपत्तीची इच्छा पूर्ण करणे, संकटातून सोडवणे इ० पाहून आपण साधू ठरवतो. हे म्हणजे रत्नाचा तोल करताना वखारीतला काटा वापरण्यासारखे आहे.

या गोष्टी कोणाजवळ असतील तर त्याला फार तर तंत्रज्ञ समजावे. त्याचे शुल्क त्याला सामोरे द्यावे. पण त्याला साधु, महात्मा, योगी मानू नये. 'योगियांच्या खुणा योगी जाणे' असे म्हणतात. यासाठी समर्थांसारख्या अधिकारी पुरुषाचेच मार्गदर्शन घ्यावे.

निरहंकारी असणे हे प्रमुख लक्षण आहे. हसे-परहसे तो स्वतःची ख्याती वाढवत नाही. ताठा, गर्व, मद तिथे नसतो. तो वीतरागी म्हणजे आसक्तीच्या पार गेलेला असतो. तो पूर्ण अनासक्त असतो. विषयोपभोगाची अभिलाषाच नसते. तो क्षमा व शांती यांचा उपभोग घेतो. त्याची चित्तवृत्ती सदैव प्रसन्न व शांत असते. तो क्षमाशील व सहनशील असतो. पण तो अगतिक, दुर्बल, कायर नसतो. याचे मन शांत असते. त्यामुळे तो निरुपायाने सहन करत मनात चरफडत रहात नाही तर तो क्षमाशीलतेचे सुख भोगतो.

क्षमा, शांती हे वैयक्तिक सद्‌गुण आहेत. व्यक्तीजीवनाचे ते आदर्श आहेत. हा व्यष्टिधर्म आहे. आणि तो तसाच राहिला पाहिजे पण आपण उलट करतो. सामाजिक पातळीवर, राष्ट्रीय पातळीवर आपण सोशिक, दयाळू, शांत, क्षमाशील आहोत. पण त्याच्यामुळे आमचे योग्य अधिकारही कुबाडले जातात, आमच्या देशाचे छकले उडतात, स्वार्थी, उन्मत्त लोक क्रूरपणे वागतात हे आमच्या ध्यानी येत नाही. सामाजिक व राष्ट्रीय पातळीवर कठोरपणे वागायला हवे.

© www.madhaveeraghuveer.com

पण आपण वैयक्तिक पातळीवर मत्सराने, सूडबुद्धीने वागतो. बांधामुळे गेलेल्या वीतभर जागेसाठी आयुष्यभर भांडत बसतो पण दुसऱ्या देशाने गिळंकृत केलेल्या फार मोठ्या भूभागाकडे आपण थंड, मुर्दाड नजरेने पहात रहातो. परंतु संत असे नसतात. ते वैयक्तिक मानहानीचा विचार करत नाहीत. पण राष्ट्र घडवण्याचे काम मात्र चोख करतात. आणि क्षमाशील रहाण्याचा आनंद पूर्णपणे उपभोगतात.

दयाशीलता व अखंड दक्षता ही सत्पुरुषाची योगसाधना आहे. रंजल्या गांजल्यांसाठी त्यांच्या मनात दयाभाव असतो. उन्हाळ्यात तहानेने तडफडणारे गाढव पाहून नाथांचे अंतःकरण द्रवले. गंगेची कावड त्याच्या मुखात गेली. संतांची दया ही निरपेक्ष व व्यापक असते.

सत्पुरुष हा दक्ष असतो. आवश्यक गोष्टी वेळच्यावेळी आणि योग्य प्रकारे करत असतो. वेंधळेपणा, गबाळेपणा, चेंगटपणा यांना तिथे थारा नसतो. आळशी माणसे आपला नाकर्तेपणा लपवण्यासाठी परमार्थाची ढाल वापरतात. असे सत्पुरुष कर्तव्याला ओझे मानत नाही. शारिरिक कष्टांना कंटाळत नाही. श्रमाने कधी वैतागत नाही. विहितकर्म टाळत नाही. परमार्थासाठी तो सदैव दक्ष असतो.

सत्पुरुष निर्लोभी असतो. तो उपाधी वाढवत नाही. त्याला संग्रहाची हौस नसते. तो स्वाभाविकपणे निश्चिंत असतो. साहजिकच त्याला कोणताही क्षोभ नसतो. समाजाने अनेक प्रकारचा छळ करूनही ते क्षुब्ध होत नाहीत. चीड, संताप, भय, उद्वेग तिथे संभवत नाहीत. संत प्रतिकूल परिस्थितीतही शांत रहातात. परमेश्वराचे अक्षोभ्य हे नाव त्यांना पूर्णपणे शोभते.

संत आत्मानंदात धुंद असतात. जगाचे पाश त्यांना रोखू शकत नाहीत. त्यांचा डौल सामान्य नसतो.

आम्ही काय कुणाचे खातो रे। तो राम आम्हाला देतो।

धरी रे मना संगती सज्जनाची।
जेणे वृत्ति हे पालटे दुर्जनाची।
बळे भाव सद्‌बुद्धि सन्मार्ग लागे।
महा क्रूर तो काळ विक्राळ भंगे॥१३५॥ श्रीराम॥

अर्थ - अरे मना! तू संतांची संगत धर. संतांच्या संगतीने दुर्जनाची मनोवृत्ति पालटून जाते मनोवृत्ती पालटल्याने त्याच्या मनात नको असले तरी भगवंताबद्दल आस्तिक्यनिष्ठा निर्माण होते, त्याची बुद्धि शुद्ध बनते आणि तो सन्मार्गगामी होतो. असे झाल्यावर मग त्याला महाभयंकर व महाक्रूर काळाचे भय उरत नाही.

स्पष्टीकरण - शिक्षण, ग्रंथवाचन, विद्वानांचा सहवास, प्रवास या उपायांनी माणसाचे जागेपणाचे मन सुधारते. परंतु माणसाची वासना तेवढ्याने सुधारत नाही. वासना मनाच्या खालच्या थरात वास्तव्य करते. तिथे पोहोचण्याचा उपाय म्हणजे संतसंगति होय. संतांची बुद्धी म्हणजे मूर्तिमंत सद्‌बुद्धि होय. वृत्तिनिरोध किंवा योग या दोन मार्गांनी ती आपल्या ठिकाणी प्रकट होऊ शकते. संतसहवासाने भक्ताच्या मनात भगवंताबद्दल आस्तिक्यनिष्ठा निर्माण होते. मी जितका खरा आहे तितका तरी देव खरा आहे अशी श्रद्धा असायला हवी. असे झाले तर भगवंताला जे आवडेल तेच तो आचरतो व भगवंताला शोभतील असेच विचार अंतर्यामी बाळगतो. ज्याने मनाने, देहाने व वाणीने भगवंताला प्रियअसेल तेच केले असेल त्याला मृत्युचे भय रहात नाही.

संत साधकाची वृत्ती तयार करतात. संतांच्या सहवासात राहून त्यांची स्पंदने, त्यांचे अणू, त्यांचे विचार आत्मसात करावे. मनाची जडणघडण सत्संगतीतच शक्य आहे. विज्ञानाने आता हे सिद्ध केले आहे की आपल्या भोवतालचे आकाश विचारांच्या तरंगांनी भरलेले आहे. श्वास आत घेताना आपण वातावरणातील तरंग आत घेत असतो तर श्वास बाहेर सोडताना आपल्या मनातील तरंग वातावरणात सोडत असतो. सतत संतांच्या सहवासात राहिल्याने त्यांनी उच्छ्वासावाटे बाहेर टाकलेले पवित्र विचारतरंग आपण ग्रहण करू शकतो. त्याने आपल्या वृत्तीत पालट होऊ शकतो. जैन साध्वी प्रीतिसुधाजी म्हणतात -

संतांना चार दिवस तुमच्या घरी रहायला बोलवा. ते चार दिवसात तुमचे घर साफ करतील. तुमच्या घरातील दोषांची बाहेर चर्चा न करता ते तुमचे घर सुधारतील.

संतांच्या सहवासात श्रेयस - प्रेयस, खरे - खोटे, योग्य - अयोग्य सार - असार यांचा अचूक निवाडा होतो. याला च समर्थ वृत्ति पालट म्हणतात. संतांजवळ मन मोकळे करा. ते तुम्हाला अचूक सल्ला देतील. सुग्रीव, अंगद यासारख्या वानरांचे जीवन श्रीरामांनी बदलून टाकले. संत सहवास म्हणजे स्वर्गीय आहे. तिथे दुःखाचा लवलेश नसतो. संतांच्या सहवासात मृत्यूचे भय रहात नाही. काळ हा क्रूर वाटत नाही. मृत्यु हा जीवनाचा अटळ भाग आहे हे ध्यानात येते. 'मरणात खरोखर जग जगते' हे कळू लागते. मरणाचे भय उरत नाही.

फुलांच्या संगतीने मातीलाही सुगंध लाभतो. सत्पुरुषांच्या संगतीने मनुष्याच्या अंतःकरणातील सद्भाव वाढतात. चांगले काय ते बुद्धीला पटते. बुद्धि सत्याचा निश्चय करू लागते. सन्मार्गाने जाण्याची, सदाचरणाने वागण्याची प्रेरणा मिळते. आणि हे सर्व विनासायास, सहजपणे घडते.

माणसे सत्य सोडतात, ते कोणत्यातरी भयापोटी. क्रौर्य किंवा पळपुटेपणा दोन्ही भय या भावनेचेच आविष्कार आहेत. संतांच्या संगतीने माणसाच्या ठिकाणी निर्भयपणा येऊ शकतो. अत्यंत क्रूर असा विक्राळ काळही जणू सोडून पडतो. म्हणजे मृत्युचेही भय वाटत नाही. दैवी संपत्तीचे हे पहिले आणि प्रधान लक्षण आहे - अभय!

© www.madhaveeraghuveer.com

भये व्यापिले सर्व ब्रह्मांड आहे।
भयातीत ते संत आनंत पाहे।
जया पाहता द्वैत काही दिसेना।
भय मानसी सर्वथाहि असेना॥७३६॥ श्रीराम॥

अर्थ - आपले विश्व सारेच्या सारे भयाने ग्रासलेले आहे. पण अनंत सद्वस्तु मात्र भयाच्या पलीकडे आहे. तिचे दर्शन घेतले असता द्वैत मुळीच उरत नाही. त्यामुळे मनामध्ये किंचितही भय उरत नाही.

स्पष्टीकरण - विश्वामध्ये अनेकपणा आढळतो. मूळ सद्वस्तु मात्र एकच एक आहे. या विश्वातील प्रत्येक वस्तु अंतवंत आणि परिच्छिन्न आहे. मूळ सद्वस्तु अनंत आहे. जेथे अनेक अंतवंत वस्तु असतात तिथे एक वस्तु दुसरीला मर्यादा घालते. या मर्यादेतून भय उत्पन्न होते. म्हणून सद्वस्तु जरी भयमुक्त असली तरी या विश्वातील अंतवंत वस्तूंच्या बाजारात सर्वत्र भय भरून राहिले आहे. जिथे अनेकपणा किंवा द्वैत असते तिथे भय आहे. परंतु दृश्याचा भेद करून जर आपण मनाने सद्वस्तुपाशी पोहोचलो तर तिच्याशी एकरूप होऊन जातो. आणि एकरूप झाल्यावर भय कुठल्या कुठे नाहीसे होते.

एकदा द्वैत स्वीकारले की भयाची अनेक कारणे निर्माण होतात. मृत्युचे भय, चोरीचे भय, आजाराचे भय, वृद्धापकाळाचे भय, विरहाचे भय, बदनामीचे भय इ. द्वितीयात् वै भयं भवति। असे श्रुति म्हणते. या जगात भौतिक सुख देणारी प्रत्येक गोष्ट भयप्रद आहे. भर्तृहरी —

भोगे रोगभयं कुले च्युतिभयं वित्ते नृपालात् भयम्।
मौने दैन्यभयं बले रिपुभयं रूपे जराया भयम्।
शास्त्रे वादभयं गुणे खलभयं काये कृतान्तात् भयम्
सर्व वस्तु भयान्वितं खलु नृणां विष्णोः पदं निर्भयम्।

निर्भयपणाची एकमेव जागा म्हणजे भगवंत होय. संत भयातीत असतात. ते अद्वैताचा आनंद लुटतात. सगळीकडे त्यांना परमात्मा नटलेला दिसतो. ∴ भयाचे कारणच उरत नाही.

हे विश्वचि माझे घर। ऐसी ज्याची मती स्थिर।
किंबहुना चराचर। आपणचि जाहला॥ — ज्ञानेश्वरी.

'आत्माराम' मध्ये समर्थ म्हणतात -

जी मी मानवी किंकर । येकायेकी जालो विश्वंभर ।
संदेह तुटला थोर । यातायातीचा ॥

सगळ्या संतांनी अद्वैतबोध प्राप्त करून घेतल्यामुळे भौतिक जगतातील द्वैताच्या भीतीने त्यांच्या चित्ताला कधीही स्पर्श केला नाही. परंतु ज्याची देहबुद्धी प्रबळ आहे असा मनुष्य वस्तुचा उपभोगही नीट घेऊ शकत नाही. त्यामुळे सामान्याला निर्भय होता येत नाही. जिथे जिथे द्वैत आहे, भिन्नता आहे, वेगळेपणा आहे तिथे भय आहे.

आपल्याला एकट्याला करमत नाही म्हणून आपण द्वैत गोळा करतो. त्याने आरंभी थोडे बरे वाटते. पण हे बरे वाटणेच माणसाला मोहात पाडून विवेकभ्रष्ट करते. आणि मग सर्व जीवन भयाने ग्रस्त होते. त्यावर तात्पुरते उपाय शोधले जातात. पण ती वरवरची मलमपट्टी ठरते. तत्त्वाचे ज्ञान हाच त्यावरचा खरा उपाय आहे. संतांच्या उपदेशानेच जिज्ञासा तृप्त होते.

© www.madhavaraghuveer.com

जिवा श्रेष्ठ ते पष्ट सांगोनि गेले।
परी जीव अज्ञान तैसे चि ठेले।
देहबुद्धीचे कर्म खोटे टळेना।
जुने ठेवणे मीपणे आकळेना॥१३०॥ श्रीराम॥

अर्थ - आतापर्यंत कितीतरी थोर ज्ञानी पुरुष अज्ञानी जीवांना अगदी स्वच्छपणे आत्मज्ञान सांगून गेले. परंतु जीवाचे अज्ञान तसेच राहिले. अविद्येतून उदय पावणारी वासना तृप्त करण्यासाठी घडणारे सकाम कर्म जीवांना काही सोडता येत नाही. अर्थात देहाहंकारामुळे अनादि आत्मस्वरूप काही केल्या अनुभवास येत नाही.

स्पष्टीकरण - अज्ञानी पुरुषांच्या तुलनेने आत्मज्ञानी पुरुषांची संख्या फारच कमी आढळते. पण तरीसुद्धा ज्ञानी पुरुष आपले ज्ञान काही झाकून ठेवत नाहीत. अज्ञानी माणसांना त्या ज्ञानाची खरी किंमत कळली नाही किंवा वाटली नाही तरी सुद्धा ज्ञानी महात्मे अत्यंत निष्कामपणे लोकांना आपले ज्ञान सांगत राहिले. त्यांच्या सांगण्यामध्ये त्यांनी कोणताही आडपडदा ठेवला नाही. पण तरीसुद्धा बहुसंख्य लोक अडाणी राहिले. समजुतीच्या घोटाळ्यामुळे देहाला आत्म्याचे गुण चिकटले जातात आणि 'मी देहच आहे' अशी ठाम भावना होते.

देह आत्म्याशिवाय जिवंतपणे वावरू शकत नाही व आत्मा देहाशिवाय प्रपंचाचा खेळ खेळू शकत नाही.

आत्मा म्हणजे चैतन्य किंवा पुरुष आणि देह म्हणजे प्रकृति आहे. हे अनादि जोडपे आहे. Without her he can not manifest and without him she can not exist.

परंतु सामान्यांना हे समजत नाही व देहातून सुख घेण्यासाठी सारी धडपड चालते. देहातून कितीही सुख घेतले तरी जीवाची तृप्ती काही होत नाही. आणि सुखासाठी चालणारी धडपड काही संपत नाही.

आनंदाचा साठा माणसाच्या अंतःकरणातच आहे. तो अनादि, न संपणारा आहे. पण आपले सारे लक्ष बाहेर म्हणजे देहाकडे गुंतल्याने आपले हक्काचे सुख आपल्या ताब्यात येत नाही

आपले खरे स्वरुप आपलेच असून अनुभवास येत नाही.

या श्लोकात श्रेष्ठ म्हणजे साधु संत असा अर्थ घेतला तर आजपर्यंत खरोखर संतांनी जीवाला जे काही सांगायचे ते स्पष्टपणे सांगितले आहे. दुसरा श्रेष्ठचा अर्थ म्हणजे हिताची अथवा कल्याणाची गोष्ट म्हणजे 'श्रेयस'

ब्रह्म सत्य आणि जगत् मिथ्या असे आतापर्यंत कितीतरी संतांनी सांगितले तरी देखील वाईट गोष्टी घडतच आहेत. धर्मभूमी म्हणून गौरवल्या जाणाऱ्या भारतवर्षाची इतकी अधोगती का होत आहे? मग साधु संतांनी स्वतःकडे वाईटपणा घेऊन (कटू) जी स्पष्टोक्ती केली त्याचा काय उपयोग झाला?

जोपर्यंत देहबुद्धी आहे तोपर्यंत सत्य माहिती असले तरी ते आचरणात येणार नाही. देहबुद्धी माणसाला इंद्रियांच्या पातळीवर जगायला भाग पाडते. देहबुद्धी ही माणसाला सत्य स्वीकारु देत नाही. ज्या कर्मामुळे माणसाला पुन्हा जन्म घ्यावा लागतो ते कर्म खोटे असे समर्थ म्हणतात. खरे कर्म माणसाला जन्म मरणाच्या फेऱ्यातून सोडवते. हे मोक्षधन किंवा अद्वैत संपत्ती आपला जुना ठेवा आहे. उपनिषदकालापासून अनेक ऋषींनी आपल्याला या संपदेची आठवण करून दिली आहे.

विश्वात दिसणारे अनंत पदार्थ, अनंत जीव हे खरे तर परब्रह्मापासूनच वेगवेगळे आकार घेऊन येतात. तीच ऊर्जा, तेच चैतन्य सर्वत्र आहे. देहबुद्धीमुळे आपला घोटाळा होतो. तो टाळण्यासाठी आत्मबुद्धी प्राप्त झाली तर जुने ठेवणे कळेल.

नाठाळ आळशी मुलगा परीक्षेच्या दिवसातही अभ्यास करत नाही. आई त्याला कळकळीने सांगत असते पण त्याला ते पटत नाही. तशी आज आमची अवस्था झाली आहे. त्याला आळसात सुख वाटते आम्हाला विषयाचा मोह सुटत नाही इंद्रियसुखापलीकडे काही चांगले, हिताचे आहे हे पटत नाही आमची देहबुद्धी फार उत्कट आहे. देहबुद्धीने जखडलेला मनुष्य काही चांगले करु शकत नाही.

© www.madhaveeragiweer.com

भ्रमे नाडळे वीत ते गुप्त जाले।
जिवा जन्मदारिद्र ठाकूनि आले।
देहेबुद्धिचा निश्चयो ज्या टळेना।
जुने ठेवणे मीपणे आकळेना॥१३॥

अर्थ - आपलेच धन गायब ~~झाले~~ झाले असून आपल्या भ्रांतीने ते आपल्याला सापडत नाही. त्यामुळे आपल्याला जन्मभर दारिद्र्य सोसावे लागते. देहबुद्धी अत्यंत प्रबळ असल्याने अनादि आत्मस्वरूप काही केल्या अनुभवास येत नाही.

स्पष्टीकरण - आपला आत्मा हा आनंदाचा मूळ झरा आहे. पण ही जाणिव लोपणे म्हणजे अज्ञान होय. भ्रम म्हणजे भ्रमण करणे आणि भ्रम म्हणजे भलतीच समजूत. आनंदमय आत्म्याचा विसर पडल्यावर जीव त्याच्या शोधात ~~जीव~~ सतत भ्रमण करतो. आणि माझे सुख दृश्यात आहे या कल्पनेने जीव दृश्यवस्तू गोळा करण्यात पुरुषार्थ मानतो. हे दोन्ही भ्रमच आहेत. घट्ट बनलेल्या देहबुद्धीतून जीवनातील सारी दुःखे निर्माण होतात. त्याला हिताचे आणि अहिताचे काय ते कळत नाही. तो पुन्हा पुन्हा जन्म घेत रहातो त्याला समर्थ जन्मदारिद्र्य म्हणतात. देहबुद्धीमुळे स्वतःला जीव समजून माणूस पुनर्जन्माचे दारिद्र्य स्वीकारतो आणि आत्मस्वरूपाची ही पुरातन संपदा गमावतो.

देहबुद्धीच्या प्रभावामुळे 'तुझे आहे तुजपाशी परि तू जागा चुकलासी' अशी आपली अवस्था होते. बुद्धिप्रामाण्यवाद, बुद्धिवाद, अंधश्रद्धा निर्मूलन, विचारस्वातंत्र्य, स्त्रीमुक्ती आंदोलन या भ्रामात्मक कल्पनांमुळे माणसाच्या वाट्याला जन्मदारिद्र्य आले. अनेक आधुनिक विचारप्रवाह हे देहबुद्धीची उपासना करणारेच आहेत. नट-नट्या, क्रिकेटियर, भ्रष्ट पुढारी हे सर्व देहबुद्धी असणाऱ्या माणसाला आकर्षित करतात. समर्थ म्हणतात -

देह मी ज्या वाटे नरा। तो जाणावा आत्महत्यारा।
देहाभिमाने येरझारा। भोगिल्याचि भोरी॥५.६.५५

वस्तुतः चार योग, चार वर्ण, चार आश्रम ही जगातील आदर्श समाजव्यवस्था आहे. पण भारतामध्ये ही कालबाह्य ठरत आहे आणि पाश्चिमेची बुरसटलेली पण तथाकथित (So called) समाजव्यवस्था आम्ही आंधळेपणाने स्वीकारतो.

© www.madhaveeragnuveer.com

सृष्टीमध्ये विविधता आहे. सर्वच सृष्ट पदार्थात ती आहे अचेतनात आहे तशी सचेतनातही आहे. त्या विविधतेचे मूल्यांकन प्रकृति, परिस्थितीप्रमाणे वेगवेगळे होते. त्यातून निर्माण होणारी विषमता कधी कधी फार जाचक होते. व त्यातून संघर्ष, अस्वास्थ्य निर्माण होतात. भारतीय संस्कृतीने या विविधतेचा समतोल रहावा, विविधतेच्या आश्रयाने असणारे सामर्थ्य एकाच ठिकाणी एकवटू नये उलट निरनिराळ्या शक्ती विकेंद्रित रहाव्यात, सर्वांना आपले हित साधता यावे. प्रत्येकाला समाधान लाभावे. कुणी उपेक्षित राहू नये, कुणी लुबाडला जाऊ नये, आक्रमक होऊ नये म्हणून एक विशिष्ट समाजव्यवस्था निर्माण केली. त्यात चार वर्ण, चार आश्रम, चार पुरुषार्थ, कर्म, योग, भक्ती आणि ज्ञान असे चार मार्ग यांचा समावेश केला आणि दीर्घकालपर्यंत समाज ऐश्वर्यशाली, संपन्न, सुस्थिर, संतुष्ट आणि समाधानी राहील अशी व्यवस्था केली. हे ठेवणे जुने असेल तरी शिळे नाही, कुजके नाही, सडलेले नाही आणि नाही, तिरस्कारार्ह नाही.

दुर्दैवाने गेल्या अनेक शतकांच्या पारतंत्र्यामुळे जाणून किंवा नेणून भ्रष्ट झालेल्या भ्रांत बुद्धीला हे पटत नाही. संपत्ती जवळ आहे, पुण्य आहे, भव्य-उदात्त संस्कृतीचे धन हाताशी आहे, ते सर्व सुखाचे साधन आहे. पण ते तसे आहे हे भ्रमाने आपण जाणून घेत नाही. त्यामुळे धर्मश्रीमंतांच्या उदरी येऊनही संपत्तीचा ठेवा कुठे आहे हे निश्चित न समजल्याने जन्मदारिद्र्य भोगावे लागावे तशी आपली स्थिती झाली आहे. दाराशी आलेल्या कामधेनूला कोणी भाकड गाय समजला चिंतामणी कोणाला गारगोटी वाटली. कल्पवृक्षाखाली बसून कुणी संकटाचीच कल्पना केली तर दोष त्याचाच आहे. सर्व अनुकूलता असून दुर्दैवाच्या रूपाने त्याची शिक्षा आपण भोगत आहोत. देहबुद्धी सोडल्यावाचून आपल्यात सुधारणा होणार नाही. जुने ठेवणे हिताचे असून दिसत नाही. न रुपेल नाही. प्रगट आहे पण त्याकडे बघण्याची आपली दृष्टी सरळ नाही.

पुढे पाहतां सर्व ही कोंदलेसे।
अभाग्यास हे दृश्य पाषाण भासे।
अभावे कदा पुण्य गाठी पडेना।
जुने ठेवणे मीपणे आकळेना॥१३३॥ श्रीराम॥

अर्थ - खरे पाहिले तर आत्मतत्त्व सर्व ठिकाणी संपूर्ण भरलेले आहे. पण भाग्यहीन माणसाला भगवंताची सगुण मूर्ती केवळ पाषाण आहे असे वाटते. भगवंत आहेच ही भावना नसल्याने पुण्यसंचय घडत नाही. देहाहंकारामुळे अनादि आत्मस्वरूप काही केल्या अनुभवास येत नाही.

स्पष्टीकरण - आत्मानंद दृश्य विश्वाचे मूलद्रव्य आहे. याचा अर्थ सजीव निर्जीवात, चराचरात, सगुण-निर्गुणात एका आनंदावाचून अन्य पदार्थ नाही.. हे जर खरे तर भक्त ज्या पाषाण मूर्तीच्या रूपाने ईश्वराची आराधना करतात त्या मूर्तीमध्येही परमानंद असलाच पाहिजे. पण तो आनंद पहाण्याची पात्रता ज्याला नाही त्याला केवळ पाषाणच दिसतो.

षड्ऐश्वर्यगुणसंपन्न जो आहे तो भगवान ऐश्वर्य, धर्म, यश, श्री, वैराग्य, ज्ञान हा गुणसमुदाय आहे. ज्याच्यापाशी भगवान तो खरा भाग्यवान! आणि ज्याच्यापाशी भगवान नाही तो भाग्यहीन. भगवंत आहेच अशी निश्चित धारणा असणे हा भाव. जिथे भाव नाही तिथे पुण्यसंचय नाही.

या जगाकडे पहाण्यासाठी संत वाङ्मयाचा संस्कार होणे आवश्यक आहे. त्याला विनोबा ईशावास्य दृष्टी म्हणतात. भगवंत सर्वत्र भरलेला आहे. त्याला पहाण्याची दृष्टी आपल्याजवळ हवी. ज्याच्याजवळ ही दृष्टी नाही त्याच्या दृष्टीने हे जगत पाषाण आहे. देवळातील मूर्ती देखील त्यांना पाषाणच वाटते. सर्वत्र परमात्मा न दिसणे ही वस्तुस्थिती नसून मानसिक रुग्णता आहे.

पुण्यकर्म घडण्यासाठी अंतःकरणात सद्भावना, श्रद्धा असावी लागते. प्रेम, वात्सल्य, भावना, करुणा यांनी जीवनामध्ये मांगल्य निर्माण होते. पातिव्रत्य, मातृभक्ती, राष्ट्रनिष्ठा, गुरुकृपा हे शब्द विज्ञाननिष्ठ नसतील पण त्यामुळे मानवी जीवन सुंदर होते. अहंकारामुळे मनुष्य या संकल्पना नाकारतो आणि आपल्या जुन्या ठेव्याला मुकतो.

ब्रह्मार्पणं ब्रह्म हवि.

अनेक प्रकारच्या विविधतेने नटलेले हे विशाल ब्रह्मांड म्हणजे ब्रह्मच आहे. विचार करणाराही ब्रह्म आणि ज्याचा विचार करायचा तेही ब्रह्मच. पण अभाग्याला, करंट्याला, अज्ञान ओपासून त्यातच रमणाऱ्या पामराला मात्र वास्तवतेचे हे भान येत नाही. तो हे सर्व जड मानतो, पाषाण मानतो उपभोगाचे एक साधन मानतो.

कशावरही भाव नसलेले अश्रद्ध नक्की स्वतःच्या आणि इतरांच्या कल्याणाची हानी करत असतात.

आत्मवत् सर्वभूतेषु यः पश्यति स पश्यति।

हे ब्रह्माच्या व्यापकतेवर आधारलेले तत्त्वज्ञान त्यांच्या पचनी पडत नाही. अविभक्तं विभक्तेषु किंवा विनश्यत्सु अविनश्यन्तम् पहाण्यासाठी जी सात्त्विकता आवश्यक आहे त्याचा यांच्याकडे अभाव असतो.

शास्त्रवचनांवर, संतवचनांवर विश्वास ठेवायचाच नसेल, अंतःकरणात शुद्ध भाव जागवायचा नसेल तर काहीही चांगले घडणे शक्यच नाही. त्यांना हिताचा, आत्मकल्याणाचा मार्ग दिसणारच नाही आणि म्हणूनच समर्थ इथे म्हणतात.

" अभावे कदा पुण्य गाठी पडेना।"

आपले आपल्यालाच पहायचे असते. पण त्यासाठी आरसा स्वच्छ व समतल असावा लागतो. आरशाची काच समतल नसली, त्यात उंचसखलपणा असला, मळ साचून तेलकटपणामुळे तो पकला झाला असला तर आरशात दिसणारी प्रतिमा जशी दिसायला पाहिजे तशी दिसत नाही. त्यासाठी रासायनिक चूर्ण, औषधी द्रव्याने तो काढावा लागतो. स्वच्छ करावा लागतो.

आपल्या अंतःकरणाचेही तसेच आहे. यमनियमांनी ते समतल होते आणि ध्यानपूजनादि साधनांनी स्वच्छ होते. मग अहं ब्रह्मास्मि चा साक्षात्कार होतो आणि नंतर सर्वं खल्विदं ब्रह्म अनुभवास येते.

साधना ही साधना आहे, सिद्धी नव्हे. प्रतिबिंब दिसते ते आरशात. आरसा स्वच्छ करणाऱ्या औषधी चूर्णात ते दिसत नाही. ब्रह्मज्ञानापर्यंत नेऊन पोहोचवणाऱ्या साधनांकडेही त्याच दृष्टीने बघायला हवे. हा विवेक केला की मूर्तीला पाषाण मानण्याचा करंटेपणा हातून घडणार नाही.

Date 11.12.13
Page 241

ज्याचे त्या चुकले प्राप्त नाही।
गुणे गोविले जाहले दुःख देही॥
गुणावेगळी वृत्ति ते ही वळेना।
जुने ठेवणे मीपणे आकळेना॥१७०॥ श्रीराम॥

अर्थ - आत्मस्वरूप ज्याच्या त्याच्या मालकीचे आहे. परंतु ते गमावल्यासारखे झाल्याने ज्याचे त्याला मिळत नाही. जीव त्रिगुणांमध्ये अडकल्याने त्याला देहात दुःख भोगावे लागते. बरे, त्याची वृत्ती गुणांच्या कक्षेतून बाहेर पडत नाही. अर्थात देहाहंकारामुळे अनादि आत्मस्वरूप काही केल्या अनुभवास येत नाही.

स्पष्टीकरण - प्रकृति ही त्रिगुणात्मक आहे. सजीवांच्या रचनेत असे दिसून येते की मूळची स्वतंत्र असलेली चेतना / चित्कला म्हणजेच आत्मा त्रिगुणाने देहाशी बांधल्यासारखी होते. प्रतिबिंब रूपाने देहात रहाणारा आत्मा स्वतःला परिच्छिन्न जीव समजतो. त्यामुळे त्याला देहाची सुख दुःखे भोगावी लागतात. मूळचे व आपल्या मालकीचे स्वातंत्र्य तो गमावून बसतो.

प्रकृती ही शक्तीरूप असल्याने ती गतिमान असते. वृत्तीच्या रूपाने ती आपले अस्तित्व प्रगट करते. आपण तिच्याशी समरस होऊन वहावत जातो. कारण आपल्यावर त्रिगुणांचा अंमल आहे. पण आपण देह नाही, मन नाही, वृत्ती नाही असे भान कायम राखून जर वृत्तीला वेगळेपणाने पहाण्याचा प्रयत्न केला तर देहात राहून देहाला वेगळेपणाने पहाता येईल. मात्र त्यासाठी सूक्ष्म देहावर ताबा यावा लागतो. कारण सूक्ष्म देह हा वृत्तीमय आहे. सूक्ष्मदेहावर ताबा मिळवण्याची कला सद्गुरुंकडून शिकावी.

वस्तुतः आत्मस्वरूपावर आपला जन्मसिद्ध हक्क आहे. पण श्रद्धेच्या अभावामुळे आणि देहबुद्धीच्या प्रभावामुळे आपल्याला आत्मस्वरूपाचा अनुभव प्राप्त होत नाही. त्रिगुणात्मक देहाशी तादात्म्य पावल्यामुळे मनुष्य त्रिगुणात अडकतो. रज व तम त्याला त्रास देतात. म्हणून गीता त्रिगुणातीत व्हायला सांगते. माऊलींनी हरिपाठात म्हटले आहे.

त्रिगुण असार निर्गुण हे सार। सारासार विचार हरिपाठ।

त्रिगुण ही माया आहे. तिने आत्मस्वरूपाला असे झाकून टाकले आहे की माणसाला आत्मस्वरूपाचे विस्मरण होते.

classmate

Date ____

Page ____

ईश्वर हा सर्व प्राणिमात्रांच्या हृदयात वास करतो. त्या हृदयस्थ ईश्वराचे वर्णन नारायणोपनिषदाने फार सुंदर केले आहे. ती भाषा प्रत्ययकारी आहे. हृदयातल्या दहराकाशात, निळ्या मेघातून तळपणाऱ्या तेजस्वी आणि नीवारशूकाप्रमाणे सूक्ष्म अशी एक ज्योत सुवर्णप्रकाशाने तेवत असते. त्या ज्योतीमध्ये परमात्मा वास करतो.

तस्याः शिखाया मध्ये परमात्मा व्यवस्थितः।

प्राणिमात्र्यांच्याच काय पण भूतमात्रांच्या, वस्तुजातांच्या संबंधात हे सत्य आहे. या वस्तुस्थितीचा केवळ साक्षात्कार करून घ्यायचा असतो. पण तेच घडत नाही. म्हणूनच समर्थ म्हणतात - जयाचे तया चुकले प्राप्त नाही। तुकाराम महाराज - तुझे आहे तुजपाशी परि तू जागा चुकलासी कारखेन कळसा अन् गावाला वळसा ही म्हणही तत्त्वतः हाच अर्थ सांगते. अगदी व्यावहारिक, इंद्रियगम्य वस्तूच्या बाबतीत असाच अनुभव येतो. नीट ठेवलेली वस्तु नेमकी सापडत नाही.

ब्रह्म मायेने झाकले आहे. पुरुष प्रकृतीच्या पाशात गुंतलेला आहे. ईशोपनिषदामध्ये ही म्हटले आहे. सत्याचे मुख सोन्याच्या झाकणाने झाकलेले असते. चांगला बुद्धिमान माणूसही या मायेच्या प्रभावातून दूर होऊ शकत नाही. त्रिगुणांचा पडदा त्याच्या ज्ञानशक्तीला कुंठित करतो. सत्यापेक्षा त्याच्या झाकणाचेच आकर्षण जास्त वाटते. पॅकिंगच्या मोहात अडकून आतील उत्कृष्ट वस्तू पहायचे राहूनच जाते.

मनुष्य आत्मज्ञानापासून दुरावतो तो असा! ज्ञानाची साधने असलेली इंद्रिये, मन बुद्धी ही सत्त्वरजतमांनी व्यापलेली रहातात. म्हणून दूषित असतात. ती सत्याचे यथार्थ ज्ञान करून देऊ शकत नाही त्यातून केवळ दुःखच वाट्याला येते. सत्याचे दर्शन घेण्यासाठी केलेले प्रयत्न अनेकदा वायाच जातात. त्यासाठी भगवंताचीच करुणा भाकावी प्रार्थना करावी आणि दयाळूपणे हे झाकण काढून टाकायला सांगावे आणि आम्हाला सत्याचे दर्शन घडवावे. पण ही प्रार्थना करताना श्रद्धा, नम्रता नसेल. अहंकाराने प्रार्थनेचे महत्त्व समजले नसेल तर मग आपलीच जुनी ठेव आपल्याला गवसत नाही.

© www.madhaveeraduveer.com

म्हणे दास सायास त्याचे करावे।
जनी जाणता पाय त्याचे धरावे।
गुरु अंजनेवीण ते आकळेना।
जुने ठेवणे मीपणे ते कळेना ॥१४७॥ श्रीराम॥

अर्थ - श्रीसमर्थ असे म्हणतात की आत्मज्ञानी पुरुष शोधावा आणि त्याच्या चरणी लीन व्हावे. त्याच्या सेवेचे कष्ट करावे. आपले आत्मस्वरुप हस्तगत होण्यासाठी सद्गुरुने दिव्यदृष्टी द्यावी लागते. देहाहंकारामुळे आत्मस्वरुप काही अनुभवास येत नाही.

स्पष्टीकरण - खरे ज्ञान जिवंत असते. त्याच्या अंतर्यामी ते असते त्याच्या मुखातून ते ग्रहण करण्यात दोन मोठे फायदे असतात. जिवंत ज्ञान जिवंत शब्दाच्या द्वारा मनापासून ग्रहण केल्यास ते चटकन आत्मसात होते. तर जिवंत ज्ञान आनंदमय पुरुषा-कडून घेतल्यास थोड्या श्रमानेच थोड्या अवधीत पुष्कळ ज्ञानसंचय करता येतो हा दुसरा फायदा! ज्ञानी पुरुषाचा मुक्त सहवास मिळणे खरोखर भाग्याची गोष्ट समजावी. समाजात प्रत्येक पिढीत ज्ञानी पुरुष असतात. त्यांचा शोध घेऊन त्यांच्या सहवासात रहावे हा समर्थांचा आग्रह आहे.

दृश्य जगाचा शोध घेणाऱ्या विज्ञानामध्ये देखील संशोधनाच्या काही खुब्या असतात. त्या शिकण्यासाठी अनुभवी विज्ञानपंडितांपाशी रहावे लागते त्या मानाने आत्मस्वरुपाचा शोध अधिक सूक्ष्म असतो. त्यात आपल्या अंतर्यामी दिसणारे वृत्तिमय जगत अभ्यासावे लागते. त्याचे संशोधन करणे अधिक कठीण आहे. त्या संशोधनातील खुब्या खरोखर सद्गुरुशिवाय कोणीही दाखवू शकत नाही. आत्मस्वरुप पहाण्याची नवी दृष्टी देण्याचे काम सद्गुरु करतात.

सायास म्हणजे सेवा आणि पाय धरणे म्हणजे प्रणिपात. इथे भगवद्गीतेमधील श्लोक आठवतो.

तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया।
उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः।

सद्गुरु जर अनुकूल नसतील तर बाकीचे सर्व उपाय व्यर्थ ठरतात. सद्गुरुंना शरण जाणे हाच खरा साधनमार्ग आहे.

सद्गुरुवाचोनि सापडेना सोय। धरावे ते पाय आधी आधी।

सद्‌गुरु अविनाकडे पहाण्याची नवी दृष्टी देतात. गुरु अंजनेविण ते आकळेना याचा अर्थ काही लोक असा लावतात की हनुमंताला गुरु केल्याशिवाय जुने ठेवणे प्राप्त होणार नाही. अंजनीचा पुत्र म्हणून अंजने म्हटले आहे.

नुसती प्रवचने ऐकून शब्दज्ञान प्राप्त होईल पण सद्‌गुरुंच्या सहवासामध्ये प्रत्यक्ष अनुभूती घेता येईल. सद्‌गुरुंचे अनुभवसंपन्न बोल मोलाचे आहेत. शरणागती-शिवाय सद्‌गुरुंच्या वचनाचा अर्थ समजत नाही. अहंकार हा ज्ञानग्रहणातील मोठा अडथळा आहे.

ज्ञान देणारा सद्‌गुरु निःस्पृह, उदार, कनवाळू असला तरी ज्ञान घेणाराची पात्रता सिद्ध व्हावी लागते. आपले हित कल्याण उन्नती साधायची असेल तर जाणत्याचे पाय धरावे. त्यासाठी विनम्रतेने, जिज्ञासेने, विनयाने, पुन्हा पुन्हा प्रश्न विचारण्याने आणि आळस न करता केलेल्या सेवेने शिष्याची पात्रता सिद्ध होते. पाय हे शरीरावयवांमध्ये निकृष्ट तर डोके हे उत्कृष्ट - उत्तमांग! माझे हे मस्तकही तुमच्या पायांपेक्षा कमी योग्यतेचे आहे. अशी परमादराची भावना वंदनकर्त्याच्या मनात असायला हवी. बऱ्याचदा तशी ती नसते. तेव्हा नमस्कार हा केवळ उपचार ठरतो.

विशिष्ट रीतीने मंत्रसिद्ध केलेले अंजन डोळ्यात घालतात भूमिगत द्रव्य पाहण्याचे सामर्थ्य डोळ्यात येते. असे म्हणतात. तोच प्रभाव गुरुकृपेचा आहे. सत्यदर्शनासाठी गुरुकृपेची नितांत आवश्यकता आहे.

मनश्चेन्न लग्नं गुरोरंघ्रिपद्मे ततः किं ततः किं ततः किम्॥

जुने ठेवणे म्हणजे आपली परंपरा, धर्मशास्त्र, अध्यात्म, आपला अर्थकामाचा विचार, भारतवर्षामध्ये मान्यताप्राप्त असलेली समाजविषयक धारणा, आपले नीतिनियम, तत्त्वज्ञान, प्राचीन इतिहास, रामायण, महाभारत हे आपले वाङ्मय माणसाला पशुत्वाकडून देवत्वाच्या पदवीकडे पोहोचवणारे, नराचा नारायण करणारे, सर्वांची सोय करून हितापर्यंत नेणारे हे आपले जुने ठेवणे आहे.

© www.madhaveeraghuveer.com

कळेना कळेना कळेना ढळेना।
ढळे नाढळे संशयो ही ढळेना।
गळेना गळेना अहंता गळेना।
बळे आकळेना मिळेना मिळेना॥१४२॥ श्रीराम॥

<u>अर्थ</u> - माणसाने कितीही खटपट केली तरी त्याच्या मनातील संशय काही जात नाही. त्यामुळे काही केल्या परमात्मवस्तु कळत नाही. पुष्कळ प्रयत्न करुन माणसाची अहंता काही लोपत नाही. त्यामुळे आत्मवस्तु जबरदस्तीने हस्तगत करता येत नाही.

<u>स्पष्टीकरण</u> - श्रद्धा या शब्दाच्या विरुद्ध शब्द अश्रद्धा नसून संशय आहे. श्रद्धेने सद्वस्तुचे ज्ञान होते तर संशयाने ती आपणापासून दूर जाते. संशय उत्पन्न होणे हा एक विशिष्ट मनोरचनेचा धर्म आहे. ती मनोरचना जोपर्यंत कायम असते तोपर्यंत संशय आल्याखेरीज रहात नाही. तो न येण्यासाठी केलेले सर्व प्रयत्न वाया जातात. मनोरचना बदलून संशय निर्मूल झाला की सद्वस्तु चटकन हातात येते.

मी ज्ञाता, मी कर्ता अशी अहंपणाची भावना जीवाला सांत बनवते. परमात्मवस्तु अनंत आहे. सांत जीवाला त्या अनंत परमात्मवस्तुला गवसणी घालता येत नाही. देहबुद्धीच्या भूमिकेवरुन आत्मदर्शन होणे कठीण आहे. देहबुद्धी आणि तिची कन्या अहंता या दोघींना सद्गुरुंच्या चरणी ठेव दिल्याशिवाय आत्मदर्शनाचा मार्ग खुला होत नाही.

या श्लोकामध्ये 'ळ' या अक्षरावर अनुप्रास साधला आहे. एकूण १४ वेळा 'ळ' हे अक्षर आले आहे. श्रोत्यांच्या चित्तावर एखादी गोष्ट ठसवायची झाल्यास क्रियापदाची पुनरावृत्ती उपयोगी पडते. समर्थांनी हे तंत्र इथे वापरले आहे.

त्रिर्बध्द सुबध्द भवति असा एक नियम आहे. गाठ सुटू नये म्हणून एकावर एक अशा २-३ गाठी बांधतात. तसे सांगावयाचा विचार अधिक दृढ व्हावा म्हणून समर्थ त्याच त्याच क्रियापदाचा तीन तीनदा वापर करतात.

दुसरे असे की माणसाला कळत तर नाहीच पण आपल्याला कळत नाही हे देखील कळत नाही. यासाठी इथे तीन वेळा 'कळेना' या शब्दाचा प्रयोग केला आहे.

देहबुद्धीच्या प्राबल्याने मनामध्ये सतत संशय वाढत जातो. गीतेमध्ये भगवंत म्हणतात- संशयात्मा विनश्यति। व्यवहारामध्ये सुद्धा संशय बाळगल्यास औषधाचा गुण येत नाही. अहंकार सुद्धा इतका सूक्ष्म असतो की तो जाता जात नाही. अगदी सात्त्विक माणसाला सुद्धा त्याच्या सात्त्विकतेचा अहंकार असतो.

संशयामुळे मनुष्याला नीटसे कळत नाही आणि संशयाचे मूळ कारण अहंता आहे. आपली विद्वत्ता, बुद्धिमत्ता, निर्णयकौशल्य, चातुर्य, आकलनशक्ती, स्मरणशक्ती, कार्य-कुशलता यावर माणसाचा फार विश्वास असतो आणि त्यामुळे आपल्याला वाटते त्यापेक्षा वेगळे काही असू शकते सत्य आणि हितकारक असू शकते हे त्याला पटतच नाही.

सत्याचे ज्ञान होण्यासाठी बुद्धीचा धसमुसळा हट्ट उपयोगी पडत नाही बुद्धीला भावनेचे, तर्काला थोरांच्या मान्यतेचे, विवेकाला विश्वासाचे पाठबळ असावे लागते. तरच सत्य, हित यथार्थपणे समजते. अन्यथा प्रयोगाबरोबर चाचपडत, वैतागत जीवन कंठावे लागते. जबरदस्तीने आत्मज्ञान मिळत नाही. दासबोधामध्ये समर्थ म्हणतात.

देहबुद्धी केली बळकट। आणि ब्रह्म पाहो गेला धीट।
तो द्वयाने रोधिली वाट। परब्रह्माची॥

आणखी एका ठिकाणी उपहासात्मक भाषेत म्हणतात.

कोरडे घेऊनिया दारा। म्हणे मज संन्यासी करा॥

© www.madhaveeraghuveer.com

अविद्यागुणे मानवा ऊमजेना।
भ्रमे चुकले हीत ते आकळेना।
परीक्षेविणे बांधले दृढ नाणे।
परी सत्य मिथ्या असे कोण जाणे॥१६३॥श्रीराम॥

अर्थ - अविद्येच्या प्रभावाने माणसाला खरे काय ते ध्यानात येत नाही. त्याच्या बुद्धीला भ्रम झालेला असतो म्हणून तो मार्ग चुकतो. परिणामी त्याला आत्महित साधत नाही. एका माणसाने खरी खोटी पारखून न करता मोहोर कमरेला बांधली ते नाणे खरे की खोटे काय सांगावे? जीवनात तसेच घडते.

स्पष्टीकरण - वस्तूचे यथार्थ ज्ञान नसणे हे अज्ञानाचे स्वरूप आहे. ज्या वस्तूमध्ये जे गुण नाहित ते त्याच्या ठिकाणी आहेत अशी समजूत माणूस करून घेतो. या समजुतीला भ्रम असे म्हणतात. भ्रमामुळे ज्या वस्तूंना जी किंमत द्यायला नको त्या वस्तूंना ती किंमत दिली जाते. येथेच माणसाचे चुकते आणि या चुकीपायी माणसाला आपले हित करून घेता येत नाही.

एका माणसाने सोन्याची समजून एक मोहोर कडोसरीला बांधली. पण ती खोटी निघाली तेव्हा त्याची फसगत झाली. ज्या वस्तूपासून आत्महित होत नाही अशा वस्तु माणूस गोळा करतो.

अध्यात्मविद्या ही भगवंताची विभूति आहे. त्यामुळे माणसाचे जीवन आमूलाग्र बदलते. भौतिक विद्यांच्या अभ्यासाने बौध्दिक तहान भागेल, दोन वेळा जेवायला मिळेल पण त्याच्या वृत्तीत बदल होणार नाही. या भौतिक विद्यांना संत अविद्या असे म्हणतात. कारण भौतिकातील प्राविण्याने अहंकार वाढत जातो. तो प्रपंचामध्ये अधिकाधिक गुंतत जातो. मनावर जर रज तमाचे आवरण असेल तर भौतिक विद्येचा इंद्रियांच्या विषयतृप्तीसाठि दुरुपयोग होऊ शकतो. उदा० ज्ञानाचे साधन म्हणून वैज्ञानिकांनी दूरदर्शनचा शोध लावला. प्रत्यक्षात मात्र केवळ करमणुकीसाठी सवंग प्रमाणात केला जातो. देहबुद्धी हाच सर्वात मोठा भ्रम आहे. या भ्रमामुळे हितकारक गोष्टी लक्षात येत नाहीत. ज्याच्यामुळे वासना वाढेल, बंधन वाढेल अशाच गोष्टी हिताच्या वाटतात. हा भ्रमाचा भयानक परिणाम आहे. प्रत्येकाला सुख हवे असते पण दुर्दैवाने माणूस सुखाच्या

भौतिक विद्या

प्राप्तीसाठी दुःखदायक गोष्टींवर अवलंबून असतो. निवड चुकल्याने फार मोठे दुःख वाट्याला येते.
वकीलाचा भरवसा वाटतो आपल्या माणसांचा नाही.
नातेवाईकांचा " " भगवंताचा नाही.
वृद्धाश्रमाची खात्री वाटते मुलासुनेची नाही.
धृतराष्ट्राला दुर्योधन जवळचा वाटला श्रीकृष्ण नाही.
माणसाला विषयसुख खरे वाटते आत्मसुख नाही.
खोटे नाणे जर व्यवहारातही चालत नसेल तर भगवंताच्या दरबारात कसे चालेल? भ्रमामुळे खरे आणि खोटे, सार व असार, नित्य-अनित्य यांच्या सीमारेषा अस्पष्ट होत जातात. ज्या वस्तू हिताच्या नाहीत त्यांचा संग्रह करण्यात माणसाला भूषण वाटते. इंद्रियसुखासाठी माणूस अनिश्चित गोष्टींना कवटाळतो.

रोग आहे पण त्याचे दुःख ज्याला जाणवत नाही तो रोगी बरा होण्यातला नाही असे ज्याने उच्चे वैद्यकशास्त्र सांगते.

आपण ज्याला शास्त्र म्हणतो तो प्रामाणिकांच्या दीर्घकालीन अनुभवांचा संग्रह असतो म्हणून आपले वागणे हे शास्त्राच्या कसोटीला उतरणारे नसेल तर ते अयोग्य आहे. त्यासंबंधीचा विचार पुन्हा नव्याने केला पाहिजे एवढी तरी जाणीव मनुष्यास व्हायला हवी.

तस्मात शास्त्र प्रमाणं ते

न तपासता स्वीकारलेले खोटे नाणे शेवटी स्वतःचाच तोटा करते. खोटी नोट - बँक - आडवे तिडवे प्रश्न विचारतात. म्हणून पारखून घ्यावे खोटी नोट खऱ्यासारखीच दिसते. सत्य मिथ्याचे नसेच होते जे सत्य आहे ते परत नाही व जे मिथ्या आहे ते उमगत नाही. परिणामी हित लाभत नाही. त्यासाठी सावध राहिले पाहिजे.

जगी पाहता साच ते काय आहे।
अती आदरे सत्य शोधूनि पाहे।
पुढे पाहता पाहता देव जोडे।
भ्रमे भ्रांति अज्ञान हे सर्व मोडे॥१४४॥श्रीराम॥

अर्थ - जगामध्ये खरे काय आहे याचा विचार करावा. अगदी मनापासून अंतिम सत्याचा शोध घ्यावा. असा शोध घेता घेता ईश्वरदर्शन होते. ते दर्शन झाल्यावर माणसाचे अज्ञान, भ्रम, भ्रांती सारे नाश पावतात.

स्पष्टीकरण - माणूस अज्ञानी असला तरी त्याला आपल्या अज्ञानीपणाची जाणिव असते. म्हणजेच त्याला आपल्या अज्ञानाचे ज्ञान असते. या ज्ञानवृत्तीच्या बळाने तो अज्ञानाचे मूळ शोधून काढतो. खऱ्याचा शोध घेतल्यावाचून त्याला चैन पडत नाही. मात्र समर्थांचे सांगणे असे आहे की, हा खऱ्याखोट्याचा विचार तेवढ्यापुरता असू नये. व्यवहारापुरता मर्यादित करू नये. आपल्या जीवनाला ओलांडून त्याचे क्षेत्र वाढवता वाढवता सबंध जगाला व्यापून टाकावे. आपल्या सकट सबंध जीवनाचे व जगाचे सत्य शोधून काढता काढता अखेर परमात्मदर्शन घडते. पाण्यावर जमलेले शेवाळ बाजूला केल्यावर त्याखालचे स्वच्छ पाणी दिसते त्याप्रमाणे दृश्याचे आवरण विवेकाने बाजूला केल्यावर सच्चिदानंद सद्वस्तु स्वयं-प्रकाशाने प्रगट होते. हेच भगवंताचे दर्शन होय. ते झाल्यावर भ्रम भ्रांती सहजपणे नष्ट होतात. एकदा ज्ञान आल्यावर रहा म्हटले तरी अज्ञान राहू शकत नाही.

सत्याची प्रामाणिक तहान लागली की भौतिक सुखाचा त्याग करायला मनुष्य तयार होतो. परंतु सत्याचा मार्ग काट्याकुट्याचा, कठीण असतो. तुकाराम महाराज म्हणतात.

परमार्थ नव्हे तेलुरांच्या गोष्टी।

सत्याच्या शोधासाठी अनेक दिव्यातून जावे लागते. वैज्ञानिकांनाही शोध लावताना खडतर जीवनाला सामोरे जावे लागते. मात्र वैज्ञानिक सत्याचा शोध बाहेरच्या जगात घेतात तर संत सत्याचा शोध अंतरजगतात घेतात. संतांना एकदा भगवत्प्राप्ती झाली की त्यांची भ्रम, भ्रांती अज्ञान नाहीसे होते.

© www.madhaveeraghuveer.com

परंतु वैज्ञानिकांनी शोध लावले तरी त्यांच्यावर भ्रम, भ्रांती, अज्ञानाचे पालक पटल कायम असते.

संत सत्याशी एकरूप होतात. सत्य आणि भ्रम एकत्र नांदू शकत नाही. सत्याच्या प्राप्तीसाठी सातत्याने श्रमावे लागेल. त्यासाठी अंतःकरणात सत्याविषयी ओढ असावी लागते. शास्त्रवचनांविषयी आदर असावा लागतो.

सत्यापर्यंत पोहोचायचे असेल तर घाई गडबड चालणार नाही. उत्कट भावाने धैर्य धरून साधना केली पाहिजे. अर्थं वा साधयेत देहं वा पातयेत। हा आग्रह असायला हवा. बुद्धि शुद्ध असेल, भावना उत्कट असेल, भाव प्रामाणिक असेल तर प्रत्येक पाऊल देवाच्या जवळ नेते आणि प्रत्येक पावलागणिक भ्रांति, भ्रम, अज्ञान उणावत जातात शिथिल पडतात, गळून जातात.

© www.madhaveeraghuveer.com

देह बुद्धी केली बळकट । आणि ब्रह्म पाहो गेला धीट ।
तो दृश्याने रोधिली वाट । परब्रह्माची ॥



सदा विषयो चिंतिता जीव जाला।
अहंभाव अज्ञान जन्मासि आला।
विवेके सदा सस्वरूपी भरावे।
जिवा ऊगमी जन्म नाही स्वभावे॥१४५॥ श्रीराम॥

अर्थ - अनात्म वस्तूचे सदैव चिंतन केल्यामुळे जीवपणा प्राप्त झाला. अज्ञान आणि अहंभाव बरोबर घेऊन जीव जन्मास येतो. आत्मानात्मविवेकाच्या योगाने या जीवाला सतत आत्मस्वरूपात लीन करावे. स्वस्वरूप जीवाचे मूलस्थान आहे. तिथे जन्माचा संबंध नाही.

स्पष्टीकरण - जगाच्या रचनेत आत्मा व अनात्मा अशा दोन वस्तु आढळतात. वास्तविक आत्मवस्तु आनंदाचे उगमस्थान आहे. पण चुकीच्या समजुतीने जीव अनात्मवस्तुच्या मागे लागतो. त्यांच्याशी तो मनाने बांधला जातो. अनात्मवस्तूंना विषय म्हणतात. विषयांच्या भोगांत पराधीनता असते. भोग भोगण्यासाठी जीवाला स्वतःच्या व दुसऱ्यांच्या देहावर, वस्तूंवर, इंद्रियांवर, स्थलकालावर अवलंबून रहावे लागते. त्यामुळे जीव संकुचित बनतो. या आकुंचितपणाचे प्रगट स्वरूप म्हणजे अज्ञान व अहंकार होय. सामान्य माणूस जन्माला येतानाच अहंकाराचे बीज घेऊन जन्माला येतो. त्याची वाढ होऊ लागली की देहाचा अहंकार न कळत उदय पावतो. तिथे अज्ञानाची पार्श्वभूमी असते.

अज्ञान बुद्धीमध्ये वास करते. ती बुद्धि देहबुद्धी असल्याने अतिशय आकुंचित असते. आकुंचितपणाहून बाजूला सरल्याशिवाय ब्रह्मदर्शन शक्य नाही. ब्रह्म म्हणजे जे सर्वांहून बृहद् म्हणजे मोठे आहे ते! तेच स्वस्वरूप होय. आकुंचितपणा नाहीसा करण्यासाठी अभ्यास करायला हवा. त्यासाठी विवेक-वैराग्य हवे. विवेकाने मन दृश्यातून काढून घ्यायचे. वैराग्याने मन सूक्ष्म बनते. ज्या प्रमाणात मन सूक्ष्म बनते, त्या प्रमाणात ते स्वस्वरूपाचे उत्कटतेने चिंतन करू लागते. अखेर ते स्वस्वरूपात लीन होऊन जाते. मन नाहीसे झाल्यावर जीवाचे अस्तित्व उरत नाही. मग त्याला जन्ममरणाचा संबंध कोठला?

शास्त्रामध्ये शरीराचे चार स्तर सांगितले आहेत.

१. स्थूल शरीर - हे पंचभौतिक असून, पाच ज्ञानेंद्रिये व पाच

कर्मेंद्रिये यांनी ते बनले आहे. २. सूक्ष्म शरीर - हे वासनात्मक असून अंतःकरणपंचकात मन, बुद्धी, चित्त ~~अहंकार~~ जे विषयचिंतन करतात तेच सूक्ष्म शरीर ३. कारण शरीर - जीवाचे आत्मस्वरूपासंबंधीचे अज्ञान हेच कारण शरीर व ४. महाकारण शरीर · म्हणजे जीवाला आत्मस्वरूपासंबंधी होणारा सोऽहं बोध!

जीवदशेसाठी विषयचिंतन आवश्यक आहे. ज्या दर्जाचे विषयचिंतन असेल त्या दर्जाचे शरीर प्राप्त होते. अशा प्रकारे जीव जन्म मरणाच्या चक्रात अडकतो.

या चक्रातून सुटण्यासाठी समर्थ विवेकाने स्वस्वरूप चिंतन करायला सांगतात. विषयचिंतनाची जागा आत्मचिंतन घेईल. आपण आपल्या मूळ स्वरूपाचे चिंतन केले म्हणजे आपल्याला जन्म मृत्यू नाही हे लक्षात येईल. जीवाचा उगम म्हणजे मूळ निर्गुण आत्मस्वरूप! स्थूल देह व सूक्ष्म देह यांच्याशी तादात्म्य पावल्याने जीवदशा आहे. उगमाकडे जाणे म्हणजे गंगेने गोमुखाकडे जाणे. उगमापाशी पाणी नेहमीच शुद्ध असते. पुढे वेगवेगळे प्रवाह त्यात मिसळतात व पाणी दूषित होते. गंगोत्रीची गंगा व काशीची गंगा यात फरक आहे. आत्मस्वरूप अत्यंत शुद्ध असते जीवदशा प्राप्त झाल्यावर जीवाला अशुद्धता येऊन सुख दुःख प्राप्त होते. देहतादात्म्य व विषयचिंतन यामुळे जीवाला पुन्हापुन्हा जन्म घेऊन वासनातृप्ती करून घ्यावी लागते. वासना संपल्यास म्हणजे विषयचिंतन संपल्यास जीवाला जन्म घ्यावा लागत नाही.

अज्ञानाने अहंभाव धारण करून जीव बहिर्मुख होतो. परंतु स्वस्वरूपाच्या चिंतनाने तो अंतर्मुख होऊन उगमाचा शोध घेतो. सृष्टीच्या मुळाशी विश्वाच्या आरंभी जे काही शांत, अद्वैत, शिव अनिर्वचनीय, अखंड, एकरूप असे जे काही होते ते ब्रह्म! तिथे सारे स्वच्छ, निर्मळ, शांत, सात्विक, पवित्र आहे. वेगळा असा जीवभाव नसल्याने जन्महि नाहि मरणहि नाही.

दिसे ते नासे।
यद् दृष्टं तद् नष्टम्



दिसे लोचनी ते नसे कल्पकोडी।
अकस्मात आकारले काळ मोडी।
पुढे सर्व जाईल काही न राहे।
मना संत आनंत शोधूनि पाहे॥१४८॥श्रीराम॥

**अर्थ** - इंद्रियांना प्रतीत होणारे दृश्य जग अनंत काळपर्यंत काही टिकणारे नाही. आकारास आलेल्या सर्व वस्तु काळ पाहता पाहता नाहिशा करतो. इतकेच नव्हे तर प्रलयाच्या समयी सर्व दृश्य विश्व नाहीसे होणार आहे. त्यापैकी काही शिल्लक उरणार नाही म्हणून हे मना, तू अनंत सद्वस्तुचा शोध घे..

**स्पष्टीकरण** - इंद्रियांना प्रतीत होणारे दृश्य जग सत् व असत्, आत्मा व अनात्मा, पुरुष व प्रकृति, ब्रह्म व माया यांचे मिश्रण आहे. त्यापैकी पहिले अनंत व दुसरे अंतवंत आहे. जे अंतवंत आहे ते सर्व पंचमहाभूतात्मक असल्याने केव्हा नाश पावेल याचा नेम नसतो. पंचमहाभूतामधून आकाराला आलेल्या दृश्याला पुन्हा पंचमहाभूतामध्ये विलीन करणाऱ्या शक्तीला काळ असे म्हणतात. एक काळ असा येईल की दृश्य विश्वातील काहीही शिल्लक रहाणार नाही. परंतु सद्वस्तु अशी आहे की ती जशीच्या तशी रहाते. तिथे पंचमहाभूतांचा, नाशवंताचा काहि संबंध नाही. सृष्टी पूर्वी। सृष्टी चालता। सृष्टी अवघी संहारता। शाश्वत देव तत्वता। आदि अंती॥ दास. ६.६.४८

यद्दृष्टं तद् नष्टम्। हा वेदांचा सिध्दांत आहे. या जगामध्ये जे जे आकाराला येते ते सारे नष्ट होते. राम कृष्णांसारख्या अवतारांनादेखील देहत्याग करावा लागला.

दिसे भासते ते सारे विश्व नाशवंत।
वर्धमान ते ते चाले मार्गि रे क्षयाच्या॥
पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा॥

जे आकाराला येण्यापूर्वी नव्हते आणि आकार नाहिसा झाल्यावर असणार नाही ते जेव्हा आणि जितका वेळ आकाराच्या स्थितीत असते तेव्हा तरी खरे का मानायचे? म्हणून समर्थ सत्याचा शोध घ्यायला सांगतात.

जे सर्वकाळ असते त्याला वेदांत सत्य असे म्हणते.
नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः॥ २.१६

© www.madhaveeraghuveer.com

आकाराला ओबेले दिसते त्यातही किती बदल होत असतात. शिवाय आपल्या डोळ्यांना मर्यादा आहेतच. विज्ञानामध्ये नेत्रभ्रम (Illusion) नावाची संकल्पना आहे. पृथ्वी ही सूर्याभोवती फिरते आहे हे विज्ञानाने सिद्ध केले असले तरी आपल्याला तसे जाणवत नाही. उलट चंद्र सूर्यच फिरत आहेत असेच आपल्याला वाटते.

आपल्यामध्येही लहानपणापासून कितीतरी बदल झाले तरी आपण म्हणतो मी तोच आहे.

जे जे दिसते ते संपणार आहे.

ग्रीष्मामध्ये भूमी कोरडी, रखरखीत, रुक्ष दिसते. मृगाची पहिली सर कोसळली की ओली होते. मृद्गंध सर्वत्र दरवळतो. आणि काही दिवसातच नाना प्रकारच्या अंकुरांनी सृष्टी हिरवीगार होते. ही हिरवळ सुद्धा विविधतेने भरलेली असते. त्यात काटेरी झुडपे असतात. विषारी वनस्पती असतात. वड-पिंपळासारखे महावृक्षांचे कोंब असतात. गुरांना मानवणारे गवत असते. माणसाला रुचि देणारी भाजी असते. सुंदर रंगाची फुले असतात. आकर्षक आकाराची पाने असतात. शेते नटतात. पिके डुलू लागतात. २-४-६ महिने हे ऐश्वर्य टिकते मग वनस्पती वाळू लागतात. हे सुकलेले उडून जाते आणि पुन्हा उजाडलेले रान पावसाची प्रतीक्षा करीत ओठंगून राहते.

सर्व सृष्टीचे आणि तिच्यातील भूतमात्राचे असेच होते. कृमी कीटकांचे आयुष्य काही क्षणात संपते. पशु पक्ष्यांचे आयुष्य काही वर्षे तर माणसाचे आयुष्य शंभर वर्षांचे असते. महावृक्ष पाचसहाशे वर्षे जगतात. तर मोठाले डोंगर नद्या, पर्वत हजारो वर्षे टिकून राहतात. पण प्रत्येकाला कधीतरी नष्ट व्हायचेच आहे. सृष्टीचे स्वरूप हे असे नाशवंत असल्याने विचारवंतांनी विषयाभिलाषा आणि इंद्रियांची सुखे यात न गुंतता आपले आयुष्य अनंताचा शोध घेण्यात व्यतीत करावे. कारणी लावावे.

संत - शाश्वत, नेहमी असणारे, सत्वस्तु
अस् धातुचे व. का. धा. वि.

फुटेना तुटेना चळेना ढळेना।
सदा संचले मीपणे आकळेना।
तया एकरूपासि दूजे न साहे।
मना संत आनंत शोधूनि पाहे॥१७०॥ श्रीराम॥

अर्थ - सद्वस्तु फुटत नाही, तुटत नाही, चळून पावत नाही, ती सदैव सर्व ठिकाणी व्यापून आहे खरी पण मीपणामुळे आहे असे कळत नाही. ती अगदी एकच एक असल्याने तिला अन्य काही खपत नाही. अरे मना, त्या अनंत अशा सद्वस्तुचा शोध घे.

स्पष्टीकरण - फुटणे-तुटणे इ० आकाराला आलेल्या वस्तुचे गुणधर्म आहेत. पंचमहाभूतातून आकार निर्माण होतात. सद्वस्तु पंचभूतांच्या अतीत आहे. म्हणून तिला दृश्याचे कोणतेही गुणधर्म स्पर्श करू शकत नाहीत. ती अतींद्रिय व अव्यक्त आहे.

पंचमहाभूतांपैकी सर्वात सूक्ष्म असणारे आकाश सर्व ठिकाणी व्यापून असते. मग आकाशाहून सूक्ष्म असणारी सद्वस्तु सर्वांना व्यापून राहते यात नवल नाही. तिचा अनुभव येण्यासाठी मीपणा बाजूला करायला हवा.

या सद्वस्तुहून अन्य वस्तु नाही. जे जे काही आहे पणाच्या रूपाने अनुभवास येते ते ते सर्व सद्वस्तुतून निर्माण होते. तिच्यातच जगते व तिच्यातच लय पावते. आपण ज्याला अचेतन समजतो त्यात देखील चैतन्य वास करते. पण ते पाहण्यासाठी लागणारी सूक्ष्म ज्ञानदृष्टी आपल्याकडे नसल्यामुळे आपण चैतन्याचा विलास बघू शकत नाही.

मुख्य देवाचे वर्णन करताना पुढे १८८ व्या श्लोकात तुटेना फुटेना कदा देवराणा असे म्हटले आहे. तर दासबोधात.

जे चळेना ना ढळेना। जे तुटेना ना फुटेना।
जे रचेना ना खचेना। परब्रह्म ते॥

असे म्हटले आहे. आकाराच्या बाबतीत तुटणे, फुटणे, चळणे, ढळणे घडू शकते. परब्रह्म निराकार, निर्विकार आहे. ते 'सदा संचले' म्हणजे सतत व्यापून भरले आहे. वेदांतशास्त्रानुसार एका परब्रह्माखेरीज दुसरा कोणताही पदार्थ अस्तित्वात नाहीच. आधुनिक पदार्थविज्ञानाला देखील हे मान्य करावे लागते. पदार्थविज्ञानानुसार हे संपूर्ण

©www.madhaveeraghuveer.com

जगत् हा एकच पदार्थ आहे. त्याला ते Unbroken Wholeness of the Universe असे म्हणतात. आपण आकारामुळे पदार्थांना भिन्न भिन्न नावे देतो. पण त्यातील तत्त्व एकच आहे. चूल, रांजण, बोळके, माठ, परळ, नीर कौले हे आकार भिन्न असले तरी त्यात मातीच भरली आहे.

परब्रह्माला द्वैत सहनच होत नाही. आपण खंडित दृष्टीने पाहतो म्हणून त्यात विविधता दिसते. जर अखंड दृष्टी ठेवली तर अभेद अनुभवास येईल.

सर्व सृष्ट पदार्थ नश्वर, क्षणभंगुर असले तरी त्याच्या मुळाशी असलेले शुद्ध तत्त्व - म्हणजेच सत्य किंवा ब्रह्म ते आपल्या सर्वव्यापक, अखंड रूपात सदासर्वदा सर्वत्र भरून राहिले आहे. त्याला विकार नाही, तुटणे फुटणे नाही.

पाण्यावर तरंग उठतात. सोसाट्याच्या वादळीवाऱ्याने त्यांना महाभयानक अशा लाटांचे स्वरूपही येते. त्याच्या तडाख्याने अगदी विशालकाय नौकाही उलट्या होतात. तीरावरची घरेदार उध्वस्त होतात. पण त्या कोणत्याही स्थितीत पाण्याच्या पाणीपणात काही अंतर पडत नाही. लाटा निर्माण होतात, विरतात, शांत होतात पण पाणी जसेच्या तसे असते. $H_2O$

कितीमोठ्या होऊ शकणाऱ्या परिघाच्या मध्याशी जसा निश्चित आणि न पालटणारा मध्यबिंदू, केंद्रबिंदू असतो तसे विश्वाच्या मुळाशी असलेल्या सत्याचे आहे. त्रिज्येच्या अपेक्षेने परिघ आकारतो तसे अहंच्या अपेक्षेने विविधता साकारते.

नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः।

असे गीतेने वर्णन करून सांगितले आहे. पंचमहाभूत त्याच्यापुढे निष्प्रभ आहे. त्यामुळे त्यांचा काही प्रभाव चालत नाही. उपनिषदामध्ये म्हटले आहे ---

निराकार आधार ब्रह्मादिकांचा।
जया सांगता सीणली वेदवाचा।
विवेके तदाकार होऊनि राहे।
मना संत आनंत शोधूनि पाहे॥१४८॥ श्रीराम॥

अर्थ - अनंत सद्वस्तु आकाररहित असली तरी ती ब्रह्मादि देवांना आश्रय आहे. तिचे वर्णन करता करता वेदवाणी थकली. आत्मानात्मविवेक करून त्या सद्वस्तुशी एकरूप होऊन जावे. अरे मना! त्या अनंत सद्वस्तुचा तू शोध घे.

स्पष्टीकरण - आपल्या विश्वाची रचना नामरूपात्मक आहे. नाम म्हणजे सामान्य आणि रूप म्हणजे विशेष. स्थलकालाच्या मर्यादेत वावरणारे विशेष साकार असतात. पण त्या विशेषांना व्यापणारे सामान्य स्थलकालाची मर्यादा मागे टाकून रहाते ते निराकार असते. सर्व सामान्यांना व्यापून उरणारे महासामान्य म्हणजे ईश्वर निराकारच असतो. मग त्या ईश्वराचा आरंभ असणारी सद्वस्तु निराकारच असते यात नवल नाही. स्वतः निराकार असणारी सद्वस्तु ब्रह्मादि देवांचे अधिष्ठान आहे. सर्व देव तेथून प्रगटतात व अखेर तेथेच लीन होतात.

माणसाची भाषा सगुणाचे वर्णन करू शकते. ईश्वर निराकार असला तरी सगुण असल्यामुळे माणूस त्याचे वर्णन करण्यासाठी भाषा वापरू शकतो. परंतु सद्वस्तु निर्गुणही आहे व निराकारही आहे. म्हणून मानवी भाषेने तिचे वर्णन करता येत नाही. आणि करायचेच मात्र तर नेति नेति असे नाही - पणाने करावे लागते.

सद्वस्तुचे वर्णन करता येत नाही, तिची कल्पनासुद्धा करता येत नाही हे खरे असले तरी आपल्या आतबाहेर ती व्यापून असल्याने विवेक वापरून अनात्म वाटा सारून तर तिच्याशी एकरूप होता येते. आणि समर्थांचा तोच आग्रह आहे. परब्रह्म हाच मुख्य देव असून त्याच्या अधिष्ठानावरच ब्रह्मा, विष्णू आणि महेश उत्पत्ति, स्थिती आणि लयाचे कार्य करत असतात. परब्रह्म हा शब्द कधीच उष्टा होत नाही कारण मुखाने कोणालाच त्याचे वर्णन करता येत नाही. असे भगवान रामकृष्णदेव म्हणत.

© www.madhaveeraghuveer.com

मात्र विवेकाने त्याच्याशी एकरूप होता येते. त्याच्याशी एकरूप होणे हाच परब्रह्म जाणण्याचा एकमेव मार्ग आहे. विवेकाने अनात्म वस्तूंचे चिंतन बंद करून परमात्म्याशी एकरूप होता येते. मात्र त्यासाठी आपले विचार, स्वभाव वागणे यात आमूलाग्र परिवर्तन घडविणे आवश्यक आहे. जीवनाला एक शिस्त लावून घ्यावी लागेल.

अंतरनिष्ठ तितुके तरले। अंतरभ्रष्ट तितुके बुडाले।
बाह्याकारे भरंगले। लोकाचारे ॥ दासबोध ॥

परब्रह्म हे अवाङ्मनसगोचर आहे. वेद ही परमेश्वराची जनकल्याणासाठी अवतीर्ण झालेली अपौरुषेय अशी दिव्य वाणी, पण वेदालाही ब्रह्माचे वर्णन समाधानकारकरीत्या करता आले नाही. वर्णन करण्यासारखी गोष्ट सीमित असते आणि वर्णन करणारा त्या वस्तूपासून वेगळा असतो. परंतु ब्रह्म निःसीम, अनंत, निर्गुण, निराकार, अखंड, एकरस आहे. सर्व देवता, नक्षत्रे, द्रव्ये, सजीव-निर्जीव असे सर्व वस्तुजात हे सर्व त्या ब्रह्माच्या आधारावरच नांदत आहे.

मायावाद, विवर्तवाद, परिणामवाद, चिद्विलासवाद अशी किती नावे दिली, वचनांचे कीस काढले, शब्दांचे खिसे शोधले, काथ्याकूट केला तरी शेवटी निश्चित काही सांगता येत नाही एवढेच निष्पन्न होते. ते केवळ अनुभवास यावे लागते.

असे बोटाने दाखवू तुकाचे अनुभव गुरूच्या मुखा।

गाढ झोपेच्या अनुभवासारखे हे आहे. शास्त्रकारांनी निद्रेला ब्रह्मानंदसहोदर म्हटले आहे. सामान्यतः प्रत्येक मनुष्य रोज गाढ झोपेचा अनुभव घेत असूनसुद्धा तिच्या स्वरूपाचे निश्चित वर्णन करू शकत नाही. ब्रह्मानंदाचे तसेच आहे. निद्रेचे सुख अनुभवायचे असेल तर आरोग्यशास्त्राचे नियम पाळून जीवन जगावे लागते. ब्रह्मानंदाच्या अनुभवासाठी साधना करावी लागते.

निद्रा ] जे सहजप्राप्त असायचे त्या विषयातही (निद्रा) इतकी
निसर्गतः ] दक्षता घ्यावी लागते तर ब्रह्मज्ञानाच्या प्राप्तीसाठी आपल्या जीवनक्रमात, इंद्रियांच्या प्रवृत्तीत, अंतःकरणाच्या धारणेत आमूलाग्र परिवर्तन घडायला हवे. त्यासाठी अनंत शोधण्याआधी संत शोधावा असा ध्वनि काढता येईल अशी शब्दरचना केली आहे.

© www.madhaveeraghuveer.com

जगी पाहता चर्मचक्षी न लक्षे।
जगी पाहता ज्ञानचक्षी न रक्षे।
जगी पाहता पाहणे जात आहे।
मना संत आनंत शोधूनि पाहे ॥१४९॥ श्रीराम॥

अर्थ- सद्वस्तु चर्मचक्षुंनी पाहता येत नाही. ज्ञानचक्षुंनी मात्र ती पाहता येते. ते पाहणे असे और आहे की पहायला गेले असता पाहणेच हरपते. मना, त्या अनंत सद्वस्तुचा शोध घे.

स्पष्टीकरण- परमात्मवस्तु सर्व ठिकाणी व्यापून आहे. पण आपल्या इंद्रियांना ती अनुभवास येत नाही. पंचभूतात्मक देहात निर्माण झालेली इंद्रिये पंचमहाभूतांचेच आकलन करु शकतील. परमात्मा हा सूक्ष्मांचा राजा असल्याने इंद्रियांना त्याच्यापर्यंत प्रवेशच मिळत नाही. बुध्दीने तो आकलन होत नाही. परमात्म वस्तूचे आकलन होण्यासाठी आत्मबुध्दी पाहिजे. तिथे त्रिपुटी मावळते. द्रष्टा हा दृश्याशी एकरुप होऊन जातो. तो वेगळा उरतच नाही. म्हणून आत्मवस्तुचे दर्शन घ्यायला गेला तिच्यातच विलीन होऊन जातो. पाहणाऱ्याबरोबर पाहणेही नाहिसे होते.

इंद्रियांचा उपयोग पंचभौतिक स्थूल जगताच्या ज्ञानासाठी आहे. त्याने आत्मवस्तुचे ज्ञान होणार नाही.

अस्थिच्या देही मांसाच्या डोळा। पाहेन म्हणे ब्रह्माच्या गोळा।
तो ज्ञाना नव्हे आंधळा। केवळ मूर्ख॥

समर्थ जेव्हा ज्ञानचक्षु शब्द वापरतात तेव्हा त्यांना सूक्ष्म मन किंवा सूक्ष्म बुध्दी अपेक्षित आहे. अंतःकरणपंचक म्हणजे ज्ञानचक्षू. सततच्या ब्रह्मचिंतनाने मनाला आणि बुध्दीला एक प्रकारची सूक्ष्मता प्राप्त होते. चर्मचक्षुंनी परमात्मा जाणता येत नाही पण सूक्ष्मबुध्दीने परमात्मस्वरुपाची धारणा करता येते.

जाणो जाता। मोडे हाव। इंद्रियांची॥

जगी पाहता ज्ञानचक्षी न रक्षे। हा जो दुसरा चरण आहे त्याचा अर्थ फार गहन आहे. त्याचे दोन तीन अर्थ करता येतील.

१. ज्ञानदृष्टीने परमात्म्याला पहायला गेल्यास परमात्म्याचे रक्षण करता येत नाही म्हणजे परमात्मा स्वतःला वाचवू शकत नाही.

२. ज्ञानदृष्टीने पाहणारा स्वतः परमात्मस्वरुप होऊन जातो. म्हणजे तो स्वतःचे रक्षण करु शकत नाही. स्वतःला वाचवू शकत नाही.

श्रोत्रस्य श्रोत्रं मनसो मनो यद्वाचो ह वाचं स उ प्राणस्य प्राणः।
चक्षुषश्चक्षुरतिमुच्य धीराः प्रेत्यास्माल्लोकादमृता भवन्ति॥

तो परमात्म्यामध्येच लीन होतो.
3. ज्ञानदृष्टीने परमात्मा पाहू गेल्यास पाहणारा आणि पाहण्याची क्रिया या दोन्हीचे कोणीहि रक्षण करू शकत नाही. आणि म्हणूनच तिसऱ्या चरणामध्ये पाहणे जात आहे असे म्हटले आहे. याचा अर्थ पाहण्याची क्रिया निघून जाते शिल्लक राहत नाही. इंद्रिय तदाकार झाल्याने पाहणाराहि विलीन होऊन जातो. अशा अवस्थेत कोण कोणाला पाहणार? ज्याची स्वतःला संपवायची तयारी आहे त्याने सत्याचा शोध घ्यावा. हा शोध पूर्ण झाल्यावरच तुकाराम महाराजांनी ज्ञानदृष्टीने आपले मरण स्वतः पाहिले. समर्थ अनंताचा शोध घ्यायला सांगतात.
डोळे ज्याला पाहू शकत नाहीत परंतु डोळ्याला पाहण्याचे सामर्थ्य ज्याच्यामुळे लाभले ते ब्रह्म आहे असे तू जाण. असे केनोपनिषद सांगते. उपनिषदाच्या या सिद्धांताचा अनुवादच समर्थांनी पहिल्या दोन ओळीत केला.
जो अनंत शोधावयाचा आहे तो या चर्मचक्षुंनी दिसण्यासारखा नाही. डोळे इथे उपळसणासारखे आहेत. मन आणि बुद्धी ही ज्ञानसाधने डोळे, नाक, कान या इंद्रियांपेक्षा अधिक तीक्ष्ण, सूक्ष्म, व्यापक आहेत. पण त्यांनाही ब्रह्म समजावून घेता येत नाही. ही सर्व इंद्रिये मन, बुद्धी ब्रह्मापुढे पांगुळतात.
ब्रह्माला पाहू गेले तर पाहणेच संपून जाते. मिठाची बाहुली समुद्राचा तळ पाहू शकत नाही. तसे ब्रह्म पाहणाराचे होते. पाहणारा आणि पाहावयाची गोष्ट वेगळी असावी लागते. डोळ्यात घातलेले काजळ यामुळेच दिसत नाही.
चौथा पेला श्रवणाचे श्रवण घ्राणाचे जे घ्राण। रसने गोडपण विठ्ठल माझा।
वाचा जेणे उठी डोळा जेणे भेटी। इंद्रियांची राहटी विठ्ठल माझा।
प्राण जेणे चळे मन तेणे बोले। शून्याते वेगळे --- "
आनंदी आनंद बोधा जेणे बोध। सकळा आत्मा शुद्ध " "
मुळाचे निजमूळ अंकुराचे फळ। चोखा म्हणे निजफळ विठ्ठल माझा।

नसे पीत ना श्वेत ना शाम काही।
नसे वेक्त आवेक्त ना नीळ नाही।
म्हणे दास विश्वासता मुक्ति लाहे।
मना संत आनंत शोधूनि पाहे॥१५०॥श्रीराम॥

अर्थ- सद्वस्तु पिवळी नाही, पांढरी नाही, शामवर्ण नाही, निळी नाही. दृश्य नाही, अदृश्यही नाही. संतवचनावर श्रद्धा ठेवल्याने तिचे दर्शन होते. व मोक्षलाभ होतो. मना! सद्वस्तुचा शोध घे.

स्पष्टीकरण - माणूस आत्मदर्शनासाठी साधन करु लागला म्हणजे त्याची इंद्रिये, मन आणि बुद्धी अधिकाधिक सूक्ष्म होऊ लागतात. त्याला सूक्ष्म अनुभव येतात. याद‍ृष्टीने सूक्ष्म रंगांचे अनुभव महत्त्वाचे आहेत. त्रिगुणांच्या दृष्टीने सत्वगुणाचा पिवळा, रजोगुणाचा तांबडा, तमोगुणाचा काळा असे वर्णन आढळते. साधकाला रंगाचे सूक्ष्म अनुभव येऊ लागतात. तसेच मनाला सूक्ष्मता आल्यावर अदृश्य जगातील विविध दृश्ये दिसू लागतात. पुढे घडून येणाऱ्या घटनांचा अंदाज येऊ लागतो. या सर्व गोष्टी खऱ्या आहेत. पण परमात्मवस्तु या सगळ्याच्या पलीकडे आहे. तिथे दृश्याचा विटाळ नाही.

रंग-रुपाचे अतींद्रिय अनुभव येऊ लागले, निरनिराळे नाद ऐकू येऊ लागले किंवा प्रकाश दिसू लागला म्हणजे आपल्याला आत्मदर्शन घडले असे वाटते, पण हे खरे नाही. यांना मागे टाकून सूक्ष्मात शिरण्याचा अभ्यास करायला हवा. त्यासाठी आत्मदर्शी सत्पुरुषच उपयोगी ठरतो. सद्वस्तु अनंत असल्याने एका दृष्टीने तिची वाट अनंत आहे. फलाचीच काय पण तिच्या दर्शनाची इच्छा सोडून द्यायची असते. ही कला संत शिकवतात.

विशिष्ट रंग दिसणे, नाद ऐकू येणे, घ्राणेंद्रियांना गंध जाणवणे या गोष्टी प्राथमिक अवस्थेत साधकाला दिलासा देणाऱ्या आहेत. आपला प्रवास योग्य दिशेने चालू आहे याची खात्री पटून पुढच्या प्रवासासाठी प्रेरणा निर्माण व्हावी म्हणून मैलाच्या दगडांसारखे हे अनुभव आहेत. पण अनेकदा साधक या अनुभवानाच परमात्मा समजू शकतो. किंवा आपण फार उच्च दर्जाचे साधक आहोत असा अहंकार बाळगू शकतो. म्हणून समर्थ स्पष्ट करतात की परमात्मा कोणत्याही रंगाचा नाही.

© www.madhaveeraghuveer.com

परमात्म्याला कोणत्याही गुणाचा रंग नाही. तो त्रिगुणातीत आहे. साधकाने चक्र आणि रंग यात अडकू नये. परमात्मा या पलीकडे आहे. जी वस्तू दृश्य आहे, जड आहे, आकार असल्यामुळे स्पर्शाने जाणवते अशा वस्तूला रंग असतो. परमात्मा डोळ्याने दिसत नाही हाताने स्पर्श करता येत नाही. तो निराकार आहे. त्याला रंग असण्याचे कारण नाही. सगळे रंग हे नाशिवंत असल्याने परमात्म्याला रंग कल्पिल्यास तो नाशवंतामध्ये येईल. परमात्मा व्यक्त नाही नसेल तो अव्यक्तही नाही. संतांना त्याची अनुभूती येते तेव्हा तो अव्यक्त कसा असेल? संतांच्या दृष्टीने तर जग हे व्यक्त परमात्माच आहे तर परमात्मा म्हणजे अव्यक्त जगच आहे. आचार्य रजनीश म्हणतात – जग म्हणजे स्पर्श करता येणारा परमात्मा आहे. तर परमात्मा म्हणजे स्पर्श करता न येणारे जग आहे. रामाचे सगुण रूप निळे आहे पण इथे निर्गुणाची चर्चा चालू असल्यामुळे समर्थांनी तो परमात्मा निळा देखील नाही असे म्हटले आहे. दुर्गादेवींच्या आरतीत समर्थ म्हणतात.

त्रिभुवनी भुवनी पाहता तुज ऐसी नाही। चारी श्रमले परंतु न बोलवे काही। साही विवाद करता पडले प्रवाही। ते तू भक्तालागी पावसी लवलाही।

ज्ञानी मनुष्य वेदांच्या व शास्त्रांच्या सहाय्याने देवीला जाणू गेल्यास ती त्याला चकवते पण भक्त शरण येताच देवी क्षणात आपले रूप भक्ताला समजावून सांगते. तेव्हा शब्दज्ञानाने नाही तर श्रद्धेने त्या अनंताला शोधता येईल.

बुद्धीची झेप ब्रह्मापर्यंत पोहोचणारी नाही. तिचा आधार घेऊन ब्रह्माचे वर्णन करणे म्हणजे आंधळ्याने चित्राचे मूल्य ठरवणे किंवा बहिऱ्याने संगीताचा सुरेलपणा निश्चित करावा तसे आहे. ब्रह्म ही तर्काने कळणारी वस्तु नाही

© www.madhaveeraghuveer.com